TIGHT BINDING BOOK

UNIVERSAL LIBRARY
OU_192577
UNIVERSAL LIBRARY

# रुख रुख

(एका शिक्षकाची दैनंदिनी)

लेखक :

वा. शि. आपटे, एम्. ए.

प्रस्तावना-लेखक :

प्रिं. मो. वा. दोंदे

स्वाधीन साहित्य संस्था लि., पुणें २.

प्रकाशक:
दा. ना. मोघे, बी. ए.
कोल्हापूर.

मुद्रक:
प्र. ज. पाध्ये,
स्वाधीन मुद्रणालय,
१०१७ सदाशिव, पुणें २.

प्रथम आवृत्ति
१९४८

किंमत
दोन रुपये

सर्वाधिकार
सुरक्षित.

# " रुखरुख-" कसली?—

'रुखरुख' ही कांहीं कादंबरी नाहीं. परंतु कादंबरीचे व त्यांतल्या त्यांत वास्तववादी कादंबरीचे बरेच गुण आढळून येतील, अशी एक दैनंदिनी आहे. दैनंदिनी हा साहित्याचा प्रकार मराठीमध्यें क्वचित्च पाहावयास मिळतो. त्या दृष्टीनें लेखक श्री. वा. शि. आपटे यांच्या या प्रयत्नाबद्दल अवश्य अभिनंदन करावयास पाहिजे.

लेखक श्री. आपटे हे एक 'ध्येयवादी तरुण' आहेत, 'सत्प्रवृत्तिप्रेरित दृष्टिकोनांतून' जगाकडे पाहाणारे ते बुद्धिवादी लेखक आहेत. 'विचारांचें सौंदर्य व प्राकृतिक सौंदर्य' याची पूजा करणारे एक 'कलावादी साहित्यिक' आहेत. ते शिक्षक आहेत, व शिक्षकाच्या धंद्यांत ते ध्येयवादानें पडले, व "माझी फसगत झाल्यासारखें वाटतें," अशा विचारांनीं त्यांच्या मनाची चलबिचल झालेली दिसून येते. शिक्षकाच्या जीवनचरित्रांतील प्रत्येक क्षणाला येणाऱ्या कटुतम अनुभवामुळें, त्यांच्या विचारशील मनाला आघात सहन करावे लागले, व धंद्यांत सर्वत्र असंतुष्टता पसरलेली दिसून आली. पुढील काळांत 'शिक्षण हा संरक्षणाइतकाच महत्त्वाचा प्रश्न' होणार आहे, तरीसुद्धां या पेशांत शिरणाऱ्यांची 'दुरून डोंगर साजरे' या न्यायानें दिशाभूल होतां कामा नये, या सद्हेतूनेंच लेखक आपलें हृद्गत जगाला सांगून टाकीत आहे.

शिक्षकाची दैनंदिनी अत्यंत हृद्य असल्याशिवाय राहणार नाहीं. शिक्षक हा जीवनांतील प्रत्येक क्षण जिवंतपणानें जगत असतो. त्याच्या आयुष्यामध्यें एकही क्षण असा नसतो कीं, त्या क्षणाला तो आपण शिक्षक आहोंत, हें विसरूं शकतो. त्याच्या जीवनाच्या आरशामध्यें आयु-

च्यांतील सुखदुःखें प्रकर्षानें प्रतिबिंबित होतात. त्याच्या मनाला अनुभवाच्या आंदोलनाचे हेलकावे फारच जोरानें बसतात. याचें कारण म्हणजे विचारवंत शिक्षकाच्या मनाला क्वचित्‌च स्थैर्य प्राप्त होतें. विद्यार्थ्यांशीं आमरण कृतज्ञ राहण्याच्या आनंदाखेरीज, दुसरा आनंद त्याच्या वांट्याला फारसा कधीं येत नाहीं. यामुळेंच त्याच्या मनाची तळमळ शांत होत नाहीं, व ‘ मनाची रुखरुख ’ हीच खरोखर त्याची सहचारिणी झालेली असते.

श्री. आपटे आपली दैनंदिनी लिहीत असतात. शिक्षकाच्या आयुष्यांत नाना तऱ्हेचे अनुभव त्यांना आलेले आहेत. प्रत्येक अनुभवानें त्यांच्या मनांत कालवाकालव सुरू होते. प्रत्येक अनुभव म्हणजे शिक्षकाच्या आयुष्यांतील निरनिराळे दिङ्मूढ करणारे प्रश्नच त्यांच्या समोर उभे राहतात. त्या प्रश्नांना शिक्षकाच्या जीवनक्षेत्राच्या बाहेर फार मोठें स्वरूप असतें.

ज्या वेळेस शिक्षकासारखा प्रबुद्ध गृहस्थ दिवसाच्या अनुभवांची दैनंदिनींत नोंद करण्यास बसतो, त्या वेळेस तो अंतर्मुख झाल्याशिवाय राहात नाहीं. आपले चिमुकले अनुभव मानवी ज्ञानाच्या सूक्ष्मदर्शक भिंगांतून तो पाहूं लागतो, व त्या भिंगांतून दिसणारें स्वरूप विस्तारानें तो जनतेसमोर उभें करतो.

लेखकाला शिक्षकाच्या पेशामध्यें जीवन कंठित असतां अनेक बहुमोल अनुभव प्रत्ययास आले. त्यापैकीं सुमारें पंचवीस अनुभवांचीं पानें त्यानें आपल्या दैनंदिनीमधून निराळीं काढून पुस्तकरूपानें समाजासमोर सादर केलीं आहेत. प्रत्येक अनुभवानें मनाला रुखरुख लागली. ती रुखरुख घालविण्यासाठीं, त्यानें समाजासमोर सवाल टाकले आहेत. समाजानें सवालांना समाधानकारक उत्तरें दिलीं, म्हणजे शिक्षकाच्या जीवनांतील खांचखळगे भरून निघतील, अशी लेखकाची अपेक्षा आहे.

शिक्षकाचा पेशा सर्व पेशांमध्यें थोर आणि उदात्त आहे, हें या पेशाचे शत्रूसुद्धां नाकबूल करूं शकत नाहींत. शिक्षक हाच समाजाचा पुढारी असावयास पाहिजे. एवढें महत्त्वाचें स्थान शिक्षकाला समाजानें दिलें पाहिजे. आजमुद्धां थोड्याबहुत प्रमाणांत हें स्थान शिक्षकाला खेड्यापाड्यामध्यें लाभलेलें दिसून येतें. परंतु सर्वसाधारणपणें ही गोष्ट खरी कीं, समाजामध्यें शिक्षकाला पूर्वीचा दर्जा राहिलेला नाहीं. समाजाला तो आज एक हेटाळणीचा विषय झालेला आहे. ह्याचें मुख्य कारण एकच आणि तें म्हणजे शिक्षकांची आर्थिक दैन्यावस्था. दारिद्र्याच्या घरांत लाचारी हीच घराची मालकीण बनते. गरजवंताच्या जिण्यासारखी स्वाभिमान भक्षण करून टाकणारी दुसरी कोणतीही गुलामगिरी नाहीं. नुसत्या जगण्यासाठीं शिक्षकाला लाचारीनें वागावें लागतें, यांत समाजाची अधोगति आहे. शिक्षकाचें समाजांतील स्थान गेलें, याला समाज जबाबदार आहे. शिक्षकाला स्वार्थ-त्याग, समाज-सेवा, वगैरे अफूच्या गोळ्या देऊन समाजानें शिक्षकाला भ्रष्ट केला आहे.

नाहीं तर, आज शिक्षक १५ रुपये आणि २० रुपये या वेतनावर कसा राबविण्यांत येतो ? विश्वविद्यालयांतील विद्या संपादन केलेल्या शिक्षकास समाज ६० रु. आणि ७० रु. वर जगायला सांगतो ! ज्ञान-दानाचें कष्टाचें काम हयातभर केल्यानंतर निजधामास जाण्याच्या वेळीं त्याला सव्वाशें किंवा दीडशें रुपयांची शिदोरी बांधून देणाऱ्या समाजास हृदय आहे, असें कसें म्हणतां येईल ?

मालक अथवा धनी हृदयशून्य आहे, असें कळून चुकल्यानंतर, सेवकानें किती उशीर रक्त ओकित बसायचें ? शिक्षक हा मनुष्यप्राणी आहे. त्यानेंही थोडा अंगचुकारपणा केला, अथवा त्याच्या परिस्थितीनें त्याला तसें करावयास लावलें, तर अखिल समाजानें त्याला खाऊन टाकण्यास कां धांवावें ?

आपल्या चरितार्थासाठीं शिक्षकाला इतर वेळांत एकादा जोड धंदा करावा लागला, अथवा शिकवणी करण्याचे काबाडकष्ट करावे लागले तर त्यावर एकदम तुटून पडण्यांत काय अर्थ आहे? शिकवीत असतां तो थकला, त्याला दूध, स्टेशनरीचें दुकान घालावें लागलें, श्रीमंतांच्या शिकवण्या मिळविण्यासाठीं उलाढाली कराव्या लागल्या, तर तो कसा गुन्हेगार ठरतो?

त्याजबरोबर या सगळ्या उठाठेवी करतांना त्याला मानहानि किती सहन करावी लागते, इकडे समाज लक्ष देतो का?

या बाबतींत लेखकानें एका श्रीमंताच्या मुलीच्या शिकवणीबद्दलची गोष्ट दिली आहे. ती अतिशयोक्तिपूर्ण वाटत असली, तरी त्यांतील मर्म लक्षांत ठेवण्यासारखें आहे. नाकाशीं सूत धरलेलें आहे, अशा रोग्याला तपासण्यापूर्वी डॉक्टर तीस रुपये फीची अट बेमुर्वतखोरपणानें घालूं शकतो. परंतु तो डॉक्टर एकाद्या शिक्षकानें शिकवणीची फी तीस रुपये मागितली तर गुरगुरूं लागतो!

लेखकानें खाजगी शाळांसंबंधानें केलेली तक्रार अयोग्य नाहीं. शिक्षणाचें क्षेत्र अमर्याद वाढल्यामुळें शिक्षण संस्थांमध्यें ध्येयवाद राहाणें अशक्य झालें आहे. एकादी व्यक्ति ध्येयवादी राहूं शकेल; परंतु संस्थेला ध्येयवाद टिकवणें शक्य राहिलेलें नाहीं. शिक्षण-संस्थांचे चालक जर गिरणीचे मालक होऊं लागले आहेत, व शाळेचा 'लॉक् आउट्' करा, अशी भाषा जर चालक म्हणूं शकतो, तर शिक्षक गिरणी-कामगारांचें अनुकरण करित आहेत, आणि अनिष्ट असा ट्रेड् युनिअॅनिझम् आणित आहेत, अशी तक्रार करण्यांत काय अर्थ आहे? 'लॉक् आउट्' शब्द उच्चारणाऱ्या चालकांनीं शिक्षकांच्या 'संप' शब्दाला हरकत घेण्यांत काय हंशील आहे? अशा चालकांनीं बदलीसदली सारख्या कारणांचा फायदा घेऊन अनीतीचें वर्तन केल्यास, नवल तें काय?

सर्व शिक्षण सरकारनें आपल्या ताब्यांत घ्यावें. खाजगी संस्थांच्या द्वारें शिक्षणाच्या प्रांतांत सरंजामपद्धति राहूं देऊं नये. हल्लींच्या संस्था—अपवाद सोडून—फ्यूडल् लार्डस् बनलेल्या आहेत. ही सरंजामपद्धति नष्ट होणें अवश्य आहे. लो. टिळक, आगरकर, चिपळूणकर, गोखले, परांजपे, हे संस्थेला ध्येयवादी बनवूं शकतात. हजारो शिक्षणसंस्था निघाल्या असतां वाटेल त्या चालकाला ध्येयवाद राखतां येणार नाहीं.

सर्वच चालक वाईट आणि सर्वच शिक्षक चांगले, असे प्रतिपादण्याचा हेतु नाहीं. शिक्षक सदोष नसतात असें कोण म्हणेल? शिक्षकांमध्यें-सुद्धा कोत्या वृत्तीचे शिक्षक असतात. वाट चुकून आलेले इसम असतात. उदात्त विचारांना पारखे झालेले असतात. हेवा, मत्सर, अकर्तव्यता, वगैरे साध्या मनुष्यामध्यें आढळून येणारे दुर्गुण शिक्षकांच्यामध्येंही असतात. शिक्षकां-शिक्षकांमध्यें संघटनेचा, सहकार्याचा अभाव कांहीं थोडाथोडका नसतो. शिक्षकांची लायकी पुष्कळच वाढावयास पाहिजे, हें कोणीही नाकबूल करणार नाहीं. कांहीं वेळेला शिक्षक अगदीं निष्क्रिय बनलेला दिसून येतो, यांत शंका नाहीं. परंतु या गोष्टी बऱ्याचशा इतरत्रही आढळून येतात. शिक्षकाच्या धंद्यांत शिक्षणाची आवड असलेलीं, बालकां-बद्दल प्रेम वाटणारीं असामान्य बुद्धीचीं माणसें फारशीं सांपडत नाहींत. त्यामुळेंच शिक्षणाचें उपवन प्रफुल्लित झालेलें दिसत नाहीं.

लेखक म्हणतात तें बरोबर आहे, कीं शिक्षणखातें विशिष्ट राज्ययंत्रासाठीं वापरणें अयोग्य आहे. शिक्षण हें खऱ्या लोकशाहीसाठीं आहे. प्रो. अर्नेस्ट बार्कर आपल्या 'The Citizen's Choice' या ग्रंथांत म्हणतात कीं,. "This to me is the highest form of democracy, when a few people, freely thinking its different thoughts, freely expresses them by different parties, freely debates them in a freely elected parliament, and freely reconciles them by the free interplay and co-operation of parties

–government and opposition, cabinet and anti-cabinet–in such a parliament." शिक्षक अशा लोकशाहीसाठीं आपलें जीवित अर्पण करीत आहे. यासाठींच लोकशाहींतील शिक्षक झगडत आहे. त्याचा झगडा समाजाविरुद्ध व विशिष्ट समाजरचनेविरुद्ध आहे. त्यासाठीं त्यानें चळवळ उभारली आहे. तो वैचारिक क्रान्ति करणार आहे.

पंचेचाळिस हजार प्राथमिक शिक्षकांचा लढा–कीं ज्या लढ्यामध्यें जातीला, धर्माला, मताला अथवा पक्षाला हात घालतां आला नाहीं–हा केवळ पांच दहा रुपयांच्या पगारवाढीसाठींच नाहीं. तो सामाजिक क्रान्तीचा दूत आहे. त्यानें इतिहास घडवलाच. त्याप्रमाणें भवितव्यही घडवित आहे.

प्रस्तुतची दैनंदिनी अनेक दृष्टींनें प्रबोधक आहे. लेखकाच्या जिवाला रात्रंदिवस लागलेली रुखरुख हजारों नव्हे, लक्षावधि ज्ञात-अज्ञात शिक्षकांना लागून राहिलेली ही रुखरुख म्हणजेच Divine discontent आहे. हें उन्नतीचें लक्षण आहे. नव्या जगाच्या प्रसूतिवेदना आहेत. 'रुखरुखी' मधूनच नवचैतन्य उत्पन्न होईल. 'रुखरुख' हेंच नव-शिक्षकाचें समाजाला आव्हान आहे.

परळ, मुंबई
२४–३–१९४७

मो. वा. दोंदे

# ओळख

माझी ओळख करून देण्याची मी आपली अनुज्ञा मागतो. एक अगदीं साधा प्राथमिक शाळा मास्तर आहे मी. मॅट्रिकपर्यंतचं माझं शिक्षण स्वतःच्याच पायांवर उभा राहून मी पार पाडलें. जीवनाशीं झुंजताना अनेक अडचणींच्या मार्गातूनच जावें लागलें. लहानपणीं आईबापांच्या सुखाला पारखा झालों. कधीं मामाकडे तर कधीं मावशीकडे राहून अभ्यास केला. त्या वयांतले माझे अनेक अनुभव सांगण्यासारखे आहेत पण वैशिष्ट्यपूर्ण नाहींत. तसे अनुभव पुष्कळांना येतात. कादंबऱ्या-गोष्टींत वाचले असतील तुम्ही ते.

डायरी लिहिण्याची मला सवय बऱ्याच लहान वयापासून आहे. माझ्या एका शिक्षकांनींच ही लावली. माझ्या जीवनांत आलेले शिक्षण विषयक व शाळामास्तरच्या आयुष्यांतले कांहीं अनुभव मी माझ्या डायरींतल्या पानावरून तुमच्या पुढे मांडणार आहे. कांहीं प्रसंग जे महत्वाचे वाटले ते तसेच लिहिले आहेत. कांहींवर टीका केली आहे. कधीं नुसती टीकाच आहे. तेव्हां प्रसंग विशेष महत्वाचे न वाटल्यावरुन लिहिले नाहींत.

सारं लेखन अतंत्र आहे. हा कुणाला दोष वाटल्यास वाटो. मी मुद्दामच सारे अतंत्र लिहिले आहे. " खऱ्या जीवनांत, वास्तव कलेंत तंत्राचा अभाव हाच मुख्यतः दिसून येतो " असें मी कुठेंसें वाचलें आहे. आवडेल कदाचित असें लिहिणें निदान कांहींना. माझ्या डायरींतलाच हा भाग असल्यामुळें कथानक असें फारसें नाहींच. कांहीं साध्या अगर विशेष घटना आहेत इतकेंच. शिक्षकाचें जग लहान. तिथें पात्रेंही थोडींच आहेत. जें सांगितलें, लिहिलेलें आहे, तें आहे खरेंच; पण कुणाही व्यक्तीशीं मुद्दाम साधर्म्य कल्पून टीका केलेली नाहीं. सत्याचा भास आहे, सत्यच नव्हे. तुमचें चित्र यांत असण्याचा भास तुम्हाला होईल पण तें तुमचें चित्र नाहीं. "काल्पनिक पात्रें आहेत या कथानकांतील " असें कायदेशीरपणें व औपचारिकपणें सांगावेंसें

वाटतें. यांतील कांहींही कुणी स्वतःकडे लावून घेऊं नये. माझ्यावर विश्वास ठेवायला हरकत नाहीं.

कांहीं विचार माझे आहेत, कांहीं कुठल्या पुस्तकांच्या वाचनानें किंवा मित्रांच्या संभाषणांत स्फुरलेले आहेत. अर्थात् सारेच माझे नाहीं हे नको का मला कबूल करायला ? या विचारांत विशेष व्यापकपणा, शास्त्रीयपणा किंवा तज्ज्ञता आढळून येणार नाहीं.

मी तशी अपेक्षाही ठेवली नाहीं. माझ्यासारख्या मॅट्रिक माणसाची कुवत पण तितकी नाहीं. माझे मित्र वामन शिवराम आपटे एम्. ए. बी. टी. यानींच मला वेळोवेळीं मदत केली आहे. माझ्या लिखाणांतील शुद्धलेखनाच्या चुका दुरुस्त करण्यापासून इतर कांहीं महत्त्वाच्या चुका दुरुस्त्या करण्यापर्यंत त्यांनींच काम केलें आहे. त्यांचे आभार मानले पाहिजेत मला. प्राथमिक शिक्षकाला जे विचार सुचणार नाहींत, असे वाटेल तुम्हाला—तेथें खुशाल समजा—कीं ते विचार श्री. आपटे यांच्यामुळें मला सुचले आहेत.

एक पंचविशीच्या आंत असलेला तरुण शिक्षक मी. अद्याप अविवाहित आहे व स्वच्छंद आहे. पण जीवनाकडे पहाण्याचा माझा दृष्टिकोन सत्प्रवृत्ति प्रेरित आहे. मी सौंदर्यवादी आहे. कलावादी आहे. सत्प्रवृत्ति बुद्धिवाद व सौंदर्यपूजा ही माझ्या आयुष्यांत महत्त्वाची त्रयी मानतों. आणि आजवर एकदांही या त्रयींपासून मी ढळलेलों नाहीं. पापी मोहाचे व बुद्धिसंमोहाचे तसेंच सौंदर्याकडे पाठ फिरण्याचे प्रसंग अनेक आले. त्यांतील कांहीं पुढें मांडले आहेत. त्यांतही मी टिकाव धरूं शकलों आहे.

मानवीहृदयांतील सत्प्रवृत्तीचें सौंदर्य मला श्रेष्ठतम वाटतें. पण विचारांचें सौंदर्य आणि प्राकृतिक सौंदर्यही मनाला आकर्षक करतें. निसर्गनिर्मित सौंदर्य मनसोक्तपणें मी लुटलें आहे. स्त्रीसौंदर्याकडेही मी कलावन्ताच्या नजरेनें पाहूं शकतों. आयुष्यांत अनेक सुंदर मुली निकटच्या परिचयवर्तुळांत येऊन गेल्या. पण खरा चित्रकार आपल्या मॉडेलसाठीं पुढें बसणाऱ्या नग्न स्त्रीकडे ज्या निर्विकार मनानें पहात असतो त्याच निर्विकारमनानें मीं

त्यांच्याकडे पाहिलें आहे, त्यांच्याशीं वागलों आहे. माझ्या कोणत्याही कृतीला सौंदर्यपूजेशिवाय दुसरी दृष्टी नाहीं. अनैतिकपणाचा पुसट गंधही तेथें येणार नाहीं.

शिक्षकासंबंधीं लिहितांना मी आदरानें लिहिलें आहे. कुठें अभिनिवेश आहे, पण सत्याला धरून आहे तो. प्रचारार्थ कांहींतरी लिहिलेलें नाहीं. अपलाप, अपदर्शन, अपप्रचार व प्रलाप या सर्व अपकारापासून लेखणी अदूषित व पवित्र ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. कुठें उद्वेग किंवा कडवट-पणा असला तरी तो क्षणिक टिकणारा आहे.

कुणी म्हणतील, "मास्तरकींत आतांशीं कुठें चारपांच वर्षे गेलीं आहेत तुमचीं. तुमचें वय पंचवीस तीस. संसार नाहीं केला. जगाचा अनुभव घेताचा. आणि पुस्तक कसलें लिहितां ? आणखी या मास्तरकींत जाऊं द्या १० वर्षे व मग सांगा जरा अधिकारवाणीनें." छे—याच्या अगदीं उलट मत आहे माझें. या धंद्यांत मोठ्या ध्येयवादानें मी पडलों आणि माझी फसगत झाल्यासारखी वाटते. शिक्षकाविषयीं प्रथमदर्शनीं माझीं मतें कोणतीं होतीं व आणखी पंचवीस वर्षांनीं तीं काय होतील हें मला तौलनिक कळायला पाहिजे असेल तर माझ्या आयुष्यांतला हा पूर्वार्ध आतांच हाता-वेगळा केलेला काय वाईट ? या धंद्यांत नवीन येणाऱ्या होतकरू शिक्षकांना तरी या धंद्याची नीट कल्पना येईल.

शिवाय असें नाहीं कां ? श्रीमान दोंदे यांच्या अविश्रांत श्रमानें संघटनचातुर्यानें असामान्य बुद्धिमत्तेनें शिक्षकवर्ग जागा होऊं लागला आहे. त्याला स्वतःचें महत्त्व, स्वतःच्या अडचणी समजतील आणि मोठ्या समाजाचेंही लक्ष माझ्या पुस्तकानें मला शिक्षणाकडे खेचतां येईल. उद्यांच्या स्वतंत्र हिंदुस्थानांत शिक्षण हा प्रश्न संरक्षणाइतकाच महत्त्वाचा होणार आहे !

पण या महत्त्वाच्या धंद्यांत असंतुष्टता फार आहे. मी स्वतः असंतुष्ट आहे. समाधानाची आणि सुखाची भावना एकच आहे. ती म्हणजे विद्या-र्थ्यांच्याबद्दल. चांगले आणि वाईट अनेक विद्यार्थी माझ्या हाताखालून

गेले. मी मॅट्रिक असल्यामुळें मला वरचे वर्ग सातवीचे व स्पेशलचे वर्ग मिळाले. मुलें प्रौढ असलीं तर त्यांच्या मनांवर संस्कार करण्यांत विशेष मौज वाटते. गुरुशिष्यांमधील बौद्धिक व्यवहार सुकर व मनोरंजक होतो. अगदी छोट्या मुलांच्या म्हणजे ६ ते ८ वर्षांच्या मुलांना वळण लावण्यांतहीं मौज आहे. पण तें समाधान एकतर्फी असतें. त्या मुलांना आपण त्यांच्यासाठीं काय काय करतों आहों याची फारशी तपशीलवार जाणीव नसते. त्याचें महत्त्वही त्यांना पटत नाहीं. उलट वरच्या वर्गांतून आपल्या सांगण्या-शिकवण्याचें थोडें फार तरी हित होतें.

शिक्षकाच्या पेशांत असतांना मुलांच्या सहवासांतला काळ सुखाचा असा माझा अनुभव आहे. त्या विद्यार्थांशीं मी आमरण कृतज्ञ राहीन.

माझी ही चिन्तनिका, ही दैनंदिनी अनेक सुखद क्षणांनीं भरून गेली आहे. यांतील मौलिकता आणि गुणदोष यांच्या परीक्षणाचें काम मी माझ्या शिक्षकबंधूवर व वाचकवर्गावर सोपवितों.

शेवटीं विनंती म्हणून एकच करावयाची आहे. शिक्षण विषयक अनेक प्रश्नावर सामान्य शिक्षकालाही जी रुखरुख लागून राहिली आहे, जी रग सोसावी लागत आहे, त्यावर कुणी कांहीं उपाय सुचवील व ते अमलांत आणील तर लिहिण्याचें सार्थक होईल.

× × ×

## माझें शिक्षण

लहानपणची एक आठवण चांगली आहे माझी. शाळेचा भयंकर तिटकारा होता मला. मला धरून शाळेंत नेण्यासाठीं शाळेंतून दोन मोठ्या मुलांना आमच्या घरीं आमचे शिक्षक पाठवीत आणि तीं मुलें मला बकोटीस धरून किंवा उचलबांगडी करून घेऊन जात. शाळेंत जातांना मी रडे, आणि आई किंवा ताई मला बळेंबळेंच शाळेपर्यंत ढकलत.

आमचे मास्तर म्हणजे मला एक भयंकर प्राणी वाटत. किती उंच होते. पांढरा लांब कोट घालीत. पांढरा मोठा रुमाल डोक्याला गुंडाळीत. हातांत नेहमीं छडी असे. मांजरासारख्या पांढऱ्या लांब व विरळ मिशा होत्या त्यांच्या. बोलणें खवचट आणि शिकवणें क्रूर असे. ते आम्हांला गणित शिकवत. नवल नाहीं कीं मला गणित कधीं आवडलं नाहीं. गणित यावें असें वाटत असेल तर गणिताच्या शिक्षकावर प्रेम जडलें पाहिजे असा आपला माझा समज आहे.

आणि दुसरे एक मास्तर होते ते फार गरीब. वर्गांतल्या सहा तासांत दोन तास ते मन लावून शिकवीत. रीति समजावून देत. धडा वाचून समजून देत नाहीं आणि नंतर पुढचा धडा वाचा आणि सोडवा पुढची गणितें मी सांगितलेल्या रीतीनें असें म्हणून झोपीं जात. वर्गाच्या दिशेनें कुणी परका वा इन्स्पेक्टरसारख्या बावळट चेहऱ्याचा मनुष्य येतांना दिसला तर उठवा मला असें सांगून ठेवलें होतें त्यांनीं.

या दोन मास्तरांनीं माझी शिक्षणाची गाडी मराठी दुसरीपर्यंत आणून ठेवली. मी शिकवण्या ठेऊन पास होणारा विद्यार्थी आहें. शिकवण्या कां ठेवाव्या लागतात याची अनेक कारणें आणि शिकवण्यांचे अनेक बरे वाईट परिणाम मला ठाऊक आहेत.

दुसरींत गेल्यावर ती चढती आणि उतरती भांजणी बिलकुल डोक्यांत शिरेना. तिमाहींत व सहामाहींत मला अगदीं कमी म्हणजे ५।७ मार्क मिळाले. अहवालपत्रक वडिलांना दाखवतांना मला इतकें भय वाटत होतें कीं विचारूं नका.

वडिलांनीं माझ्या अहवाल पत्रकांतील मार्क पाहून एकदां खूप शिव्या देऊन घेतल्या. मारही दिला. पण तेवढ्यानें माझें गणित कसें सुधारणार ! शेवटीं वडिलांनीं मला गणित विषयाला शिकवणी ठेवायचें ठरविलें. आणि कर्मधर्मसंयोगानें माझ्या गणिताचे मास्तर मला गणित शिकवायला येऊं लागलें.

रोज संध्याकाळीं ५ वाजतां घरीं यायचे ते. ५ ते ६ संध्याकाळचे म्हणजे अगदीं खेळण्याची वेळ. शेजारची शांता आणि गोपाळ हुदडत असत आणि मानेवर खडा ठेऊन मी गणित करायला मास्तरापुढें एकाद्या उंदरासारखा पुस्तक कुरतडीत बसे. रोज ५ वाजतां ते उंचढंगाळे पांढरें भूत घरांत प्रवेश करी. त्याच्या कोंकणी करकरणाऱ्या वहाणा वाजल्या--कीं जरी अगदीं स्वैपाकघरांत मी आईच्या पाठीशीं असलों नाहींतर मागील दारीं तुळशीवृंदावनामागें लपलों असलों तरी ऐकूं येत—कीं माझ्या हृदयांत कांपरे भरे. " बाळ " म्हणून कठोर हांक मारीत आणि माझी काय छाती होती त्या हांकेला ओ न देण्याची! एखाद्या वेळीं ताईच्या मागें मी लपे-- परंतु " इंद्राय स्वाहा तक्षकाय स्वाहा " म्हणून गरजणाऱ्या होत्याकडून मंत्र ऐकतांच ज्या भीतीनें इंद्र आणि तक्षक हात जोडून गडबडून त्या ऋषीपुढें उभे राहिले असतील त्याच भीतीनें माझी ताई व मी बाहेरच्या खोलींत येऊन धडपडं. ताई मला तेथें सोडी. खाटकाच्या हातीं मेंढरू सोडून ती निसटे आणि माझा घाबराघुबरा जीव तेथें तळमळूं लागे.

एक दिवस ४॥ वाजतां खूप जोराच्या पावसास सुरवात झाली. देवाची खूप प्रार्थना केली मी कीं असाच जोराचा पाऊस येऊं दे पण माझ्या सारख्या दुर्भागी मुलाचे देव तरी कशाला ऐकतो? हळूंहळू विजांचें नर्तन थांबलें. ढगांची सरोष गर्जना बंद होत गेली. वारा मंदावला. पावसाच्या धारांचा जोर कमी झाला. गटारांतून जोरांत पाणी वहात होते. वाटलें गणिताच्या सगळ्या वह्या फाडाव्या. त्या कागदांच्या नावा करून त्या प्रवाहांत सोडाव्या आणि कोणती नाव किती पुढें जाईल याचें गणित करावें! रस्त्यांत चिखल झाला होता. डबक्यांत पडणाऱ्या पावसाच्या थेंबांनीं तरंग अन् बुडबुडे उठत होते. वाटलं या पावसांत भिजावं अन् आजारी पडावं. शिकवणीचा त्रास चुकेल तितकाच चारआठ दिवस. बोटाला चिंधी गुंडाळून किंवा पोट दुखल्याची सबब सांगून एखाद दिवस ब्रह्मपाठांतून निसटण्यापेक्षां असें आजारी पडणें बरे!

आज पाऊस पडला आहे. आज कसचे मास्तर येतात. त्यांची आई नाहींतर बायको खात्रीनें त्यांना सांगणार कीं ' कशाला जाता पावसाचे बाहेर ? ' कोंकणच्या कोऱ्या करकरीत वहाणा पावसांत कशाला भिजवताहेत मास्तर ! माडीवरच्या खिडकींत उभा राहून असा विचार करतों आहे तोंच दूरवर एक सोळा काड्यांची भली मोठी पांढरी छत्री दिसली. मी निरखून पाहिली. त्या छत्रीच्या खालीं गुडघ्यावर घेतलेल्या धोतराचा कांच्या आणि कोंकणी वहाणा असलेले दोन पाय स्पष्ट दिसले. मास्तरच ते, कांहीं शंकाच नव्हती.

आणि त्या दिवशींही शिकवणी झाली.

या गोष्टीला आतां २०।२१ वर्षें झालीं. लहानपणीं कोणत्या मुहूर्तावर मला शाळेंत घातलें कुणास ठाऊक. १०॥ वाजतां जेवून ११ वाजतां आज कित्येक वर्षे मी शाळेंत जात आहे आणि इच्छेनें वा अनिच्छेनें आणखी कित्येक वर्षे जावें लागणार आहे !

मला आत्मप्रौढीच्या भावनेनें वाटतें पूर्वीच्या क्रूर शिक्षकांपेक्षां मी किती लोकप्रिय आहें. मी बहुधा साऱ्या विद्यार्थ्यांना आवडतों. मी त्यांच्याशीं हंसून खेळून वागतों. किती त्यांची काळजी घेतों. प्रत्येक शिक्षकाला अगदीं असेंच वाटत असतें.

पण ह्या कल्पना अगदीं मृगजळें आहेत !

जुन्या जमान्यांतल्या शिक्षकांची कर्तव्यनिष्ठा, वक्तशीरपणा, शिस्त, वेळ पडल्यास शिक्षा करूनही विद्यार्थ्यांकडून अभ्यास करून घेण्याची हातोटी विद्यार्थ्यांबद्दल आस्था इत्यादि गुणांत आजचा शिक्षक खात्रीनें तुलनेंत कमी भरेल. याला शिक्षक कांहीं फारसा जबाबदार नाहीं. शिक्षकाचें महत्त्व आज अनेक बाजूनें कमी झालें आहे.

एका काळांत शिक्षक हा फक्त समाजाचा पुढारी होता. आतां तें पुढारीपण डॉक्टर वकील किंवा अशिक्षित देखील पण त्यागी कर्तव्यनिष्ठ समाजसेवक यांचेकडे गेलें आहे. शिक्षकाच्या मध्यस्थीशिवाय ग्रामाच्या

वाटा चोखाळण्याला उपलब्ध झाल्या आहेत. पोष्टल कोर्सेस आणि सेल्फ हेल्प टीचींग सुरूं आहेत. शाळांतही शिक्षणाच्या अशा पद्धती निघाल्या आहेत कीं जेथें ( सुपरव्हाइज्ड रीडिंग, डॉल्टन प्लॅन ) शिक्षकाचें महत्त्व कमी केलें गेलें आहे. पगार कमी झाल्यामुळें पैशाचें पाठबळावर अवलंबून असलेल्या इभ्रतीला शिक्षक मुकला आहे. बालकेंद्रित शिक्षण पद्धतीमुळेही शिक्षकाला स्थान राहिलेलें नाहीं. सारे शिक्षणविषयक प्रश्न चळवळी सुधारणा सरकार युनिव्हर्सिटी कडून शिक्षकांकडें म्हणजे वरून खालीं आलेल्या आहेत. लोकशाही धरून, खालून वर, नव्या कल्पना व विचार सांगितल्या जाणें आवश्यक आहे पण हें होत नाहीं.

या व अशा अनेक कारणामुळें शिक्षकांत कांहीं चमत्कारिक गंड निर्माण झाले आहेत. त्यांना त्याच्या अडचणी त्यांचे महत्त्व, व अडचणींवर येण्याचे, महत्त्व वाढवण्याचे मार्ग शोधणें अवघड झालें आहे. त्याच्या या धुक्यांत गुरफटल्यामुळें संघटनाही पायाशुद्ध पायावर होत नाहींत त्यांचा प्रभाव पडत नाहीं. पण हळुहळू ही परिस्थिती सुधारत आहे.

लहानपणची दुसरीं एक कडू आठवण आहे. मला इंग्रजी चौथींत दोन शिक्षक होते. एकांच्याबद्दल मला नितांत आदर आहे अजून. माझ्या ठिकाणीं जो सद्अंश आहे तो त्यांच्या शिकवणीमुळें शिल्लक राहिलेला आहे. जीवनाकडे पाहण्याची दृष्टी त्यांनीं मला दिली. त्यांच्या थोर आत्म्याला शतशत वंदनें.

दुसरे एक शिक्षक मात्र सामान्य मनुष्य. त्यांना पगार होता १८ रु. त्यांचा संसार होता मोठा आणि माणूस परिस्थितीनें गांजला म्हणजे वाटेल तें करायला तयार होतो. त्यांनीं प्रथम एक गाय व एक म्हैस पाळून दुधाचा जोड धंदा म्हणून सुरू केला पण त्यांत त्यांना तोटा आला. पुण्यामुंबईहून कांहीं किरकोळ स्टेशनरी आणि पुस्तकें आणून ते विकीत पण त्यांतही पुरेशी प्राप्ती होत नसे. या राजसमार्गांनीं जेव्हा उत्पन्नाला कांहीं फरक मिळत नाहीं तेव्हां ते शिकवण्या करूं लागले आणि हळूहळु या कामांत ते तरबेज झाले. एखाद्या

विद्यार्थ्याला ते नेमके आपल्या जाळ्यांत ओढीत. शिकवणी ठेवण्यासारख्या परिस्थितींत कोणाचे पालक आहेत याची त्यांच्या जवळ नोंद असे. त्या मुलाच्या ते मागे लागत. त्याला नानाप्रकारें छळत. परीक्षेत नापास करीत व घाबरवत. ह्या शिक्षकांचे व इतर शिक्षकांचे करारमदार ठरलेले असत. एकमेक एकमेकांना विद्यार्थी पुरवत, त्यासाठीं कमिशनें घेत, एकमेकांच्या विद्यार्थ्यांना पास करीत. पेपरही फोडीत. कांहीं ठिकाणीं शिकवण्यांत चढाओढ असे. वैयक्तिक द्वेष आणि हेवेदावे भयंकर होते. सकाळीं ४ पासून रात्रीं ११ पर्यंत पंक्तीमागून पंक्ती उठत. एककाळीं ५ पासून २० पर्यंत विद्यार्थी असत. ज्या वर्गाला ते शिक्षक शिकवत त्याच वर्गातले विद्यार्थी शिकवणीस असत. शिकवण्यांतील या दोषांना ते बळी पडले होते आणि त्याच्यांतील 'शिक्षक' मेला होता.

शिक्षक 'शिकवण्यां'चे भक्ष्य होतो याचें कारण निश्चितपणें दारिद्य आहे. कांहीं अगदीं हुशार किंवा अगदीं मठ्ठ किंवा आजार, रजा वगैरे कारणामुळे गैरहजर असलेला विद्यार्थी हे अपवाद सोडले तर शिकवण्या कुणाही विद्यार्थ्याला लागू नयेत. पण वरील शिक्षकांनीं मला शिकवणीसाठीं नाडलें होतें. वडिलांना ते एकदां भेटले आणि म्हणाले " तुमचा बाळू हुशार आहे--पण त्याच्याकडून ठोकून अभ्यास करून घ्यायला पाहिजे कुणीतरी. पाठवीत जा माझ्याकडे --" दोनचारदां वडिलांना तेंच तेंच त्यांनीं सांगितलें. व हा एकसारखा प्रचार त्यांच्या पथ्यावर पडला.

## आतां मी शिक्षक आहे !

आज मी शिक्षक झालों आहे आणि शिकवण्या करतों आहे. शिकवण्या अगदीं करूं नयेत, असें माझें स्पष्ट मत आहे पण जीवन वेतन मिळत असेल तर. प्रत्येक शिक्षकाला त्याच्या कुटुंबाचें पोषण होईल इतका पैसा मिळण्याची सोय असेल तर तो शिक्षकही शिकवण्या करणार नाहीं; त्यानें करूं नयेत. मी तर म्हणतों जीवन वेतन देऊन वर शिक्षकाला वृत्तिवेतन ( professional

allowance ) मिळावें. त्यानें आपलें ज्ञान अद्यावत् ठेवावें. त्याला एखादें वृत्तपत्र विकत घेण्यासाठीं, वाचनालयाचे सभासद होण्यासाठीं, कांहीं पुस्तक-संग्रह करण्यासाठीं, शैक्षणिक महत्त्वाचे प्रवास व परिषदांना जाऊन त्यांत भाग घेण्यासाठीं, एखादा भत्ता मिळणें जरूर आहे. आणि जोंवर अशा प्रकारची आर्थिक मदत संस्था अगर सरकार शिक्षकाला देत नाहीं तोंवर शिक्षकाच्या अवांतर उत्पन्नावर तीं बंधन घालूं शकत नाहींत. त्यांना तसा नैतिक अधिकारच नाहीं. डॉक्टरानें, वकीलानें किती पैसे मिळवावेत वा किती तास काम करावें यावर बंधन नाहीं, मग शिक्षकावरच कां ? त्याच्या ताकदीप्रमाणें तो श्रमेल. शाळेच्या वेळेंत तो बरोबर काम करतो आहे हें पहाणें शाळाव्यवस्थापकांचें काम आहे. तेथें त्याच्या हातून चुकारपणा होत असेल तर जरूर शिक्षकाला शिक्षा करावी. शिक्षकानें दुकान काढण्यास, दुभत्याचा, विमाएजंटाचा धंदा करण्यास, पुस्तकें लिहिण्यास, तशाप्रकारें वेळ व श्रम खर्च करण्यास व अधिक पैसे मिळवण्यास त्याला प्रत्यवाय नाहीं. पण प्रामाणिकपणें त्यानें शिकवण्या केल्या कीं मात्र तें गैर. हा कोठला न्याय ? वर सांगितलेले व्यवसाय सर्व शिक्षकांना साधत नाहींत. सर्व शिक्षकांना फक्त शिकवण्यांचाच राजमार्ग खुला आहे. वर्गातील शिकवण्याच्या त्याच्या कार्याशीं तो व्यभिचार करीत नाहीं एवढें शिक्षकानें लक्षांत ठेवावें.

शिकवण्यांमधील चढाओढ किंवा इतर अनिष्ट प्रकार नष्ट करण्यासाठीं जरूर प्रयत्न व्हावेत. स्वयंमानित निर्बंधांनीं व संघटनेनें ते दोष निघून जाणें अगदीं शक्य आहे.

शिकवण्यांचे दर, पगारमान, नोकरीच्या रजेच्या प्रॉ. फंडाच्या इतर सवलतीच्या अटी जर सर्व जिल्ह्यांत समान झाल्या तर कितीतरी गोष्टी सुकर होतील.

मी माझ्या एका विद्यार्थीनीला विचारलें, 'तूं कां शिकवणी लावलीस' तेव्हां ती म्हणाली, " वर्गांत भराभर अभ्यास होतो, तितक्या वेगानें समजत नाहीं मला आणि पुन्हा वर्गांत इतरांच्या देखत प्रश्न विचारण्याची लाज वाटते आई मला ! " या मुलीच्या म्हणण्यांत खात्रीनें तथ्य होतें.

माझा एक मित्र एका संस्थानिकाकडे शिकवण्यास जात आहे. त्याचा गमतीचा अनुभव इथें सांगण्याचा मोह अनिवार होतो आहे मला. त्या मित्राची अगाऊ परवानगी न घेतां मी तो इथें समाविष्ट करीत आहे. एका राजेसाहेबाकडे तो 'ट्यूटर' असे. सकाळीं तास दीडतास त्यानें शिकवावें असें ठरलेलें असे परंतु पंचवीस मिनीटें राजेसाहेब त्या ट्यूटरचें वाचन ऐकत आणि नंतर शिक्षकाला म्हणत,

' हें पहा, मी घोड्यावर रपेट करुन येतो. पुढलीं १० पानें वाचून ठेवा, "माझी" पाठ झाली पाहिजेत हं. '

शिक्षकानें वाचावींत धडधडा व राजांनीं ऐकावींत असा वाचनाचा अभ्यास चाले. पण पुढें पुढें वाचन ऐकणेंही राजेसाहेबांना जड जाऊं लागलें. त्यांनीं दोन शिक्षक नेमले. एक वाचण्यासाठीं व एक वाचलेलें ऐकण्यासाठीं ! असो.

वैयक्तिक म्हणाल तर शिकवणी करायला मला मुळींच आवडत नाहीं. माझ्या शाळेतल्या माझ्या वर्गातल्या मुलांची मी शिकवणी करणें म्हणजे तर मी महापाप समजतो. मी शिकवणींत त्यांना शिकवतो पण वर्गात दोनतीन तास माझे त्या वर्गावर असतांना, प्रत्येक विद्यार्थ्याला लक्षपूर्वक शिकवणें माझें कर्तव्य असताना मी तें करीत नाहीं असाच त्याचा अर्थ होतो. हा अर्थ निंदाव्यंजक आहे.

शिकवण्यांच्या बाबतींतील दोष फार वेगळ्या थराला गेले आहेत. पण शिक्षकांचा आर्थिक दर्जा सुधारणें, शिक्षणाची पद्धती बदलणें, शिक्षणांत एकंदरपणें ध्येयवाद निर्माण होणें, शिक्षक-शिष्य संबंध अधिक जिव्हाळ्याचे होणें अशा कांहीं गोष्टी झाल्याखेरीज हा अनिष्ट प्रकार कमी होणें मला तरी मुळीं शक्य दिसत नाहीं.

शिकवण्या करण्यांत मान नाहीं. दुसऱ्याच्या घरीं जाऊन शिकवणी करणें तर चांगलेंच अपमानकारक आहे. केवळ पैसे अधिक मिळतात म्हणून हें करायचे इतकेंच. शिकवण्या न करणाऱ्या शिक्षकांचा मान अधिक राहतो असा अनुभव आहे.

तरी देखील कधींकधीं शिकवण्या करण्याशिवाय शिक्षकाला गत्यंतर नसते ही गोष्ट मान्य केली पाहिजे आपल्याला.

*　　　*　　　*

## मी शिक्षक कां झालों

मॅट्रिकचा निकाल लागावयाचा होता. मी दोनचार ठिकाणीं नोकरी-साठीं अर्ज केले होते. दुय्यम शाळेतही केला होता आणि एका सरकारी कचेरींत कारकुनीसाठींही अर्ज केला होता. दुय्यम शाळांत नुसता मॅट्रीक क्वचितच घेतला जाऊं लागला आहे आणि कारकूनींत शॉर्टहॅन्ड टायपिंग वगैरे यावें लागतें. अर्थात् प्राथमिक शाळेंतील नोकरी मला मिळेल अशी मला बरीच उमेद होती.

या धंद्याबद्दल जरी आवड नव्हती तरी असें वाटत होतें कीं या धंद्यांत पडावें. येथें कांहींतरी करून दाखवितां येईल. आज या गोष्टीला चार-पांच वर्षें झालीं. मी कांहीं करून दाखविलें आहे असें मला वाटत मात्र नाहीं. या पेशांत शिरलों तेव्हां इतरत्र अपयश आलें म्हणून नव्हे तर हा पेशाच आत्मसात करायचा, चांगला शिक्षक म्हणून नांव मिळवावयाचें या इर्षेनेंच. आज मी ऐन २५।२८ च्या दरम्यान असून देखील थोडासा नाउमेद झालों आहे. माझ्या व्यवसायबंधूंची कार्यक्षमता व त्यांच्या हातून झालेलें कार्य यांचें व्यस्त प्रमाण पाहिलें म्हणजे असें कां हा प्रश्न मनांत येतो आणि मी गोंधळून जातो. मला नाहीं वाटत कीं याला शिक्षकच सर्वस्वी जबाबदार असेल.

मला नेमणूक झाल्याचें पत्र मिळालें. जरी मी मॅट्रिक होऊं घातलों होतों तरी मला स्केल व्ह. फा. चें मिळालें. मॅट्रिक पास झाल्याबरोबर माझ्याकडे इंग्रजीचा कोचिंग वर्ग ( अटॅच्ड क्लास ) देण्यांत आला. सात-वीचेही कांहीं तास होते. कोनापूर हें आमचें तालुक्याचें गांव. डी. एल्. बी. शाळा होती. गांव ४।५ हजार वस्तीचा होता. तेथें तीन एक वर्षें काम

केलें नंतर मी ती नोकरी सोडली आणि म्युनिसिपालिटीनें चालवलेल्या एका दुय्यम शाळेंत काम करूं लागलों. चार पांच वर्षें झालीं मी येथेंच काम करतों आहे.

जेव्हां या धंद्यात पडलों तेव्हां केवळ पोटार्थी म्हणून मी खात्रीनें पडलों नाहीं. माझे एक वृद्ध स्नेही मला म्हणत, "भिकाऱ्यांनीं व पोट-भरु लोकांनीं या धंद्यांत येऊंच नये. ज्यांना घरीं थोडीफार तरी उपजीविकेची सोय आहे अशांनीच या धंद्यांत यावें. पोटभरू किंवा खूप पैसे मिळवण्याची इच्छा करणारे इथें येतात आणि त्यामुळें शिक्षकाचा पेशा अपवित्र करतात."

एका दृष्टीनें त्यांचें म्हणणें मला पटलें परंतु नुसतें घरचें खाऊन लष्करच्या भाकरी भाजण्याचें कोण पत्करील? शिक्षक हा समाजाचा आदर्श पुरुष आहे. तो निश्चित असला पाहिजे. त्याला उद्यांची विवंचना समाजानें ठेवतां कामा नये. नाहींतर त्याच्या हातून जबाबदारीचें काम होणार कसें? हंसत मुखानें त्यानें वर्गांत प्रवेश तरी कसा करावा? प्रत्येक शिक्षक स्वतःच्या मांडीचें मांस काढून देणारा शिबी आहे कां? उखळांत स्वतःचें पोर कांडतांना रडूंही येऊं न देणारा श्रियाळ आहे कां? शिक्षक व दारिद्र्य ही जोडी शिक्षक मानतो. ती गोष्ट गृहीत धरूनच तो धंद्यांत येतो. त्याला ठाऊक असतें कीं त्याला या धंद्यांत उमाप पैसा कमावतां येणार नाहीं.

## शिक्षक समाजक्रांतीचा प्रणेता

पण याचा अर्थ स्वतःच्या घरचें खाऊन, केवळ त्याग करीत, संसार न करतां ही समाजसेवा त्यानें करावीं कीं काय? आदर्श म्हणून ठीक आहे पण व्यवहार्य नाहीं. शिक्षक कुठे इंजीनियर इतका पैसा मागतो--जरी त्याचें काम त्याच्या तोलाचें आहे? शिक्षक कुठें हजार पांचशें रुपये मागतो? तो केवळ

जीवनवेतन मागतो. मानव म्हणून जगण्याचे हक्क मागतो व त्यासाठीं झगडतो. यांत अपवित्रता मुळींच नाहीं. हें त्याचें झगडणें जीवनाच्या हक्कासाठीं आहे. या झगड्यांत अनेक साधनें तो वापरतो. कधीं त्या धंद्यांतून तो निघून जातो पण त्यापेक्षां तो ओळखतो कीं जीवनाच्या कुठल्याही क्षेत्रांत झगडण्याशिवाय जर गत्यंतर नाहीं तर याच ठिकाणीं कां झगडूं नये ! या झगड्यांत दुसऱ्याचें नुकसान व्हावें व आपला फायदा व्हावा असें त्याला वाटत नाहीं. कामगार वर्गांत जी जागृती नसते ती त्या शिक्षकांत असते. समाजक्रान्ती घडवून आणून त्याला जीवनाचे हक्क प्रस्थापित करावयाचे असतात आणि म्हणूनच शिक्षकांचा झगडा हा सत्याग्रह आहे असें प्रा. दोंदे अनेक वेळां म्हणत असतात.

हा शिक्षकांचा झगडा साऱ्या समाजाविरुद्ध आहे. एका विशिष्ट समाजरचनेच्या विरुद्ध आहे. जेथें जेथें पक्षनिष्ठ राजकारण आहे तेथें तेथें शिक्षकाला झगडावें लागेल. लोकशाही प्रधान राष्ट्रांत, जेथें बहुमतवाल्या-चेंच राजकारण चालतें तेथें शिक्षकांना भांडावें लागलें आहे. जेथें हुकूम-शहांच्या तंत्रानें शिक्षण चालवलेलें होतें तेथेंही शिक्षकांचे हाल झाले आहेत. जर्मनींतून आइन्स्टीन सारख्या अनेक जगद्वंद्य शिक्षकांना परांगदा व्हावें लागलें आहे. शिक्षकाला स्वतंत्रपणें मानाचें स्थान मिळायला समाजरचनेंत मूलगामीच बदल होणें जरूर वाटतें.

आणि तो बदल घडवून आणण्यासाठीं—ती समाजक्रांती करण्यासाठीं—शिक्षक विधायक आणि विध्वंसक सर्व साधनें वापरूं लागले तर त्यांत गैर काहीं नाहीं शिक्षक केवळ पोटासाठीं, पगारासाठीं धडपडतो आहे असें म्हणणें हें संकुचित दृष्टीचें निदर्शक आहे.

हिंदुस्थान हा खेड्याचा बनलेला आहे आणि प्राथमिक शिक्षक हा त्या खेड्यांतल्या शक्तीचा, यंत्राचा कणा आहे. हा सुदृढ असेल तर सारा गाव-गाडा नीट चालेल. शेतकीचें ज्ञान तो देईल, हिशेबाचें ज्ञान तो देईल, गांवचे झगडे तो सोडवील. गांवांत नवा प्रकाश, नव्या सुधारणा, नवें युग तो घडवून आणील.

जी सुधारणा सरकारला खेड्यापर्यंत पोहोंचवावयाची आहे ती सरकारला शिक्षकामार्फतच पोहोंचवितां येईल. सक्तीच्या मोफत सार्वत्रिक शिक्षणापासून, मद्यपानबंदीच्या, कुळकायद्याच्या अनेक सुधारणा तोच खेडेगांवांत अमलांत आणूं शकेल. शिक्षकाचें हें महत्त्व सरकारनें ओळखलें पाहिजे.

× × ×

## शिक्षणविषयक प्रेमाचा सार्वत्रिक अभाव

मुलासाठीं त्याच्या वाचनाची, निरीक्षणाची आणि सफरींची एक नवी योजना मी तयार केली होती. आणि ती आमच्या शाळेच्या मुख्याध्यापकांना दाखवली. अशा कांहीं नव्या गोष्टी त्यांना हव्याच असतात. त्यांत शाळेचें वैशिष्ट्य रहातें. इन्स्पेक्शनच्या वेळीं त्याचें प्रदर्शन करतां येतें. सैनिकानें केलेला पराक्रम सेनापतीला भूषण आणतो. तद्वत् हाताखालच्या शिक्षकाचे श्रम मुख्याध्यापकांना स्वतःच्या नांवावर विकतां येतात. असो. माझी योजना मी त्यांना दाखवली आणि नवल नाहीं कीं त्याना ती पसंत पडली. मी ती अमलांत आणण्यास प्रारंभ देखील केला.

पण त्यामुळें आम्हां शिक्षकमंडळींत थोडीशी खळबळ झाली. कुणाला वाटलें मी यामुळें विद्यार्थ्यांत जास्त प्रियता मिळवीन. त्यांत त्यांना वैषम्य वाटलें. आणि कुणी म्हणाले, " हेडमास्तरांच्या पुढेंपुढें करायला पाहिजे दुसरें काय ? " माझ्या एका मित्राचा मात्र मनापासून विरोध दिसला. तो म्हणाला, " अरे तुझ्याजवळ उत्साहाचा फाजील सांठा आहे पण इतरांजवळ तो कुठून असणार ? तूं इतकें काम करतोस म्हणून तुझा आदर्श डोळ्यापुढें ठेवायला लावून हेडमास्तर आम्हालाही काम करण्यास भाग पाडतील. तुला वेळ, ऐपत उत्साह व इच्छा सर्व गोष्टी अनुकूल आहेत म्हणून इतरांना त्या तशा थोड्याच असणार आहेत ! पण हेडमास्तर याचा फायदा मात्र असा घेतील कीं या शाळेबाहेरील अवांतर योजनांत भाग

घेण्याची सर्व शिक्षकांवर सक्ती करुन आम्हां सर्वांचं काम मात्र वाढून बसेल. बरं हें एक झालें. त्यामुळें कांहीं आर्थिक लाभ होणार आहे कां ? कल्पनांचा उत्पादक तूं म्हणून स्तुतीचे दोनचार शब्द तुला क्षणभर ऐकायला मिळतील, कदाचित वर्षाअखेर तुझ्या पगारवाढीची शिफारस ते करतील यापेक्षां त्यांच्या हातीं तरी काय आहे तुझें भलें करण्याचं ? तेव्हां नवीन कांहीं उपद्व्याप करूं नको. ११ ते ५ पाट्या टाकाव्यात आणि घरीं यावें. ज्या शाळेंत आपल्या मनाला मान नाहीं, ज्या शाळेंत मानानें आपल्याला जगतां येत नाहीं, ज्या शाळेच्या व्यवस्थेंत आपल्याला हात नाहीं त्या शाळेंत आपण तरी इतकें रक्त ओकून काम कशाला करायला हवें ? ''

त्याच्या या विचारसरणीनें मी जरा स्तिमित झालों यांत शंका नाहीं. त्याच्या विचारसरणींत तथ्य बरेंच होतें. क्षणभर मी गोंधळलो परंतु या योजना आणि शाळेंत शिकवण्याचे काम करतांना माझ्या डोळ्यासमोर विद्यार्थी असतात. मी शिकवतों म्हणजे पाट्या टाकीत नाहीं. मला अपुरा पगार मिळतो याला कां विद्यार्थी जबाबदार आहेत ? मुख्याध्यापक किंवा समाज माझी कदर करीत नाहीं याला ते बिचारे विद्यार्थी काय करणार ? माझ्यावर होणाऱ्या अन्यायाचें प्रायश्चित बिचाऱ्या ज्ञानोन्मुख विद्यार्थ्यांना कां ? घरीं पत्नीशीं खटका उडाला कीं त्याचा राग शाळेंत विद्यार्थ्यांवर काढणारे एक शिक्षक ठाऊक आहेत मला. असें होणें स्वाभाविक आहे पण आदर्श मात्र नाहीं. समर्थनीय देखील नाहीं. आपल्या पोटांत उपासमारीचा डोंब पेटलेला असतां विद्यार्थ्यांकडे लक्ष न लागणें हें स्वाभाविक आहे. पण शिक्षकाच्या पेशांत पवित्रता व उदात्तता जी निर्माण होते ती या परिस्थितीवर मात करण्यानें होते. शाळेच्या आवारांत शिरतांच शिक्षक हास्यमुखच दिसला पाहिजे. उखळांत त्यानें शिर दिलें आहे एकदां ! आतां हंसत घाव झेलले पाहिजेत.

शिवाय मी इतका विद्यार्थ्यांसाठीं धडपडतों तो कां ? प्रामाणिकपणाने मला वाटतें कीं माझ्यांत असलेला सत्‌अंश--शिक्षक रहावा. ध्येयवादाची

हृदयांतील ती मिणमिणती पणती आणखी कांहीं काळ तेवावी. इतर शिक्षक ज्याप्रमाणें शाळेव्यतिरिक्त कांहींही उद्योग करीत नाहींत तसें आपलें होऊं नये. जीवनांतील हें तेज जागतें राहावें म्हणुन ही धडपड करायची.

माझा हा दृष्टिकोन मी माझ्या मित्राला सांगितला पण तरी त्याला तो पटला नाहींच. तो म्हणालाच, " अरे तुझ्यासारखी कार्यप्रेमी माणसें ही निष्क्रिय होतात हें समाजाचें दुर्दैव -समाजाला दिसू दे. समाजाला हें तरी पटूं दे कीं तसें होण्यांत त्याच्या नव्या पिढीचें नुकसान आहे.

पण माझी शंका अशी कीं माझ्यासारखी कांहीं माणसें क्रियावान् वा कार्यप्रेमी आहेत हें तरी समाजाला कुठें ठाउक आहे ? तो तर उलटा म्हणतो-- मास्तराची जात सर्वांत अधिक निष्क्रीय ! टिळक आगरकरांच्या पिढींतील मास्तरांनीं समाजकारण, राजकारण करून दाखविलें. त्यानंतर जोशी, फडके, खांडेकर या मास्तर मंडळींनीं लेखन कार्य केलें. मास्तरांची आजची पिढी कांहींच करत नाहीं. त्यांचा ध्येयवाद अन् कार्यप्रवृत्ती केव्हांच लोपल्या आहेत. बहुसंख्य मास्तरवर्ग वर्षांतून सुट्टीचें तीन महिने आळसांत घालवायला सोकावला आहे.

असो. हा वाद चटकन संपण्याजोगा नव्हता. माझ्या अवांतर योजना इतरांना बाधक न होतील अशाप्रकारें मी आंखल्या आणि तडजोड केली. पण ही तडजोड योग्य झाली असें मात्र मला वाटत नाहीं. इतर शिक्षकांनीं कार्यप्रवण होण्याच्या माझ्या इच्छेस अतृप्तपणें माघार घ्यावी लागली. अन् रुखरुख लागून राहिली. आहे त्या परिस्थीतींत रहाण्याची धडपड व त्यासाठीं उभारलेलें तत्त्वज्ञान याची मोठी गंमत वाटूं लागली. आपला आळस, आपली निष्क्रीयता ही टिकवण्यासाठीं देखील वेदांचा आधार घेतां येईल आणि त्यांत नांवापुरतें फसवें तथ्य असूही शकेल.

## माझ्या पापाला समाज कसा जबाबदार ?

अलीकडे समाज ही अशी एक सोइस्कर वस्तू बनली आहे कीं व्यक्तीला आपली अनेक बरीवाईट कृत्यें समाजाच्या माथीं मारून मोकळे होतां येतें. मी चोरी करतों. समाज त्याला जबाबदार आहे. मी व्यभिचार करतों. सामाजिक विवाहसंस्था त्याला जबाबदार आहे. मी दुसऱ्याची पिळवणूक करतों. समाज त्याला जबाबदार आहे. ही एक नवी दृष्टी आहे. १००|२०० वर्षांपूर्वी चोऱ्या व्यभिचार होत पण समाज त्याला जबाबदार आहे असें नाहीं कुणीं म्हटलें. रामानें केलेल्या अन्याय्य त्यागाबद्दल, दुष्यन्तानें केलेल्या फसवणूकीबद्दल, शर्विलकानें केलेल्या चोरीबद्दल कुणी समाजाला नांवें ठेविलीं नव्हतीं. पण आजच्या या समाजकल्पनेनें वैयक्तिक नीतिमत्तेचीं मूल्येंच बदलून गेलीं आहेत आणि मला वाटतें यांत आपला अधःपात आहे. जगण्यासाठीं पाप करावें लागत आहे. हिंसा, काळाबाजार, भ्याडपणा करावा लागत असेल तर मरा असें गांधीजी सांगतात. पण आम्ही म्हणतों काळ्याबाजाराला आम्ही जबाबदार नाहीं. समाज आहे. हिंसा आणि अन्याय समाज करतो. म्हणून आम्ही करतो. पण हें समाज शद्बाच्या आड लपणें आहे असें वाटते मला.

अशा अनेक विचारांनीं आज झोप आली नाहीं मला.

संघटनेची साखळी वरून चांगली बळकट दिसली पण तिचा एखादा दुवा जर कमजोर असला तर ती बळकटी सारी वायाच गेली नाहीं का ? आज असाच एक प्रसंग घडला. तेव्हां या सत्याची मला खात्री पटली. आमच्या शाळेंत पुराणिक म्हणून एक साधारण मध्यम वयस्क शिक्षक आहेत. मुलांना ते कवायतीसाठीं घेऊन चालले होते. एका विशिष्ट जिन्यानें त्या वर्गांतील मुलांना न्यावें असा नियम होता. पण पर्यवेक्षकांनीं सांगितलें कीं या दुसऱ्या जिन्यानें जा. तसें ऐकून ते त्या मुलांना नेऊ लागलें. पर्यवक्षेकांनीं दिलेला हुकूम मुख्याध्यापकांना ठाऊक नव्हता. नेहमीच्या जिन्यापेक्षां दुसऱ्या जिन्यानें मुलें जातांना पहातांच मुख्याध्यापक गर्जत तेथें आले, मुलांदेखत आणि

आम्हां शिक्षकांदेखत त्यांनीं त्या शिक्षकावर तोंडसुख घेतलें. पर्यवेक्षकांचा तोंडीहुकूम त्यावेळीं मला माहित नव्हता. नाहींतर मी त्यावेळीं पुढें झालों असतों. या हुकूमाची गोष्ट दोन दिवसांनीं आम्हांस पुराणिकांनीं सांगितली. त्याक्षणीं पुराणिक अगदीं निमूटपणें शिव्या खात होते. आम्ही ऐकत होतों. आम्ही काय करूं शकलों असतों. दुसऱ्या तिसऱ्या दिवशीं ही गोष्ट आम्हास समजली. आम्ही पुराणिकांच्या वतीनें हेडमास्तरांना खरी हकिकत सांगायचें ठरविलें. पण पुराणिकांनीं कच खाल्ली. त्यांनीं आम्हाला तसें करूं दिलें नाहीं. त्यांच्या दृष्टीनें तो उध्दटपणा होता, जो आमच्या दृष्टीनें बावळटपणा होता. दुसऱ्या एका शिक्षकाला असेंच एकदां अकारण गैरवर्तन मिळालें. मुख्याध्यापकांकडून. त्यांच्यासाठीं आम्ही शिक्षक संघांत ठराव आणणार होतों परंतु त्याला वाटलें कीं न जाणो त्यामुळें आपण अधिक हडपले जाऊं– Victimise होऊं– आणि त्यांनीं माघार घेतली. ज्या गृहस्थाच्या वतीनें आम्ही भांडणार तोच माघार घेणार ! तो केवळ तटस्थ राहील असेंहि नाहीं तर वेळ पडल्यास त्याच्यावर अन्याय झालाच नाहीं असें जाहीर करून आम्हांस तोंडघशीं पाडणार ! कसें लढावें संघटनेनें त्याच्यासाठीं ?

भर्तृहरीनें सेवाधर्मातील कठीणता वर्णन केली आहे. सेवक म्हटला कीं त्याला स्वाभिमान नाहींच. स्वाभिमानाची भावना होमूनच सेवेचें जूं पत्करावें लागतें. पण ही संघटना हें सेवकाजवळ असें एकमेव साधन आहे कीं ज्यामुळें त्याचा स्वाभिमान सांभाळणें शक्य होईल.

## शिक्षक संघटनेचे वैशिष्टय

शिक्षकांची संघटना ही अगदी अपूर्व आणि अभिनव तितकीच पवित्र गोष्ट आहे. गिरणीमालकांचा संघ आपला फायदा कसा वाढेल, मजूरांना आणि समाजाला जास्तीत जास्त किती पिळवटून घेतां येईल हें पहातो. मजूरसंघ या उपद्व्यापांना प्रतिकार करण्यासाठीं–कामकरी शेतकऱ्यांचें राज्य

स्थापण्यासाठीं, हक्क, स्वार्थ, सत्ता मिळवण्यासाठीं–अशा अनेक रूपानें नटून झगडत असतो. त्याच्या उलट शिक्षक संघाचें आहे. जीवन वेतनाचा प्राथमिक प्रश्न सुटला तर संघाला कितीतरी कार्य करतां येईल. तो शिक्षणाच्या प्रश्नांचा विचार करील. नवीन पिढीसाठीं नव्या शैक्षणिक वाटा आणि व्यवस्था शोधील. आपल्या शिक्षकांची बौद्धिक पातळी वाढवील. शिक्षकसंघ नव्या युगासाठीं बियाणें जपून ठेवण्याचें, नवें जग सुदृढ व सुविद्य करण्याचें जे कार्य करूं शकतो तें दुसरें कोण करूं शकेल ! शास्त्रज्ञांच्या परिषदा आणि मेळावा राष्ट्रभक्षक योजना आंखील–अर्थशास्त्रज्ञ कांहीं नियोजन पुढें ठेवतील परंतु राष्ट्रतारक व सांस्कृतिक दृष्टीनें महान कार्य शिक्षक संघटनाच करूं शकेल. एक सर्वांगीण समर्थक शिक्षणयोजना आंखली जाईल तर अनेक प्रश्न सहज सुटतील. मजुरांच्या संघटनांना मजूर राज्य आणायचें आहे–शिक्षकांना शिक्षकांचे राज्य आणायचें नाहीं. फारच झालें तर शिकवणारांच्या मालकीच्या शाळा असाव्यात–एका धनिकाच्या, एका खासगी संस्थेच्या त्या नसाव्यात एवढेंच ते म्हणतील. किंवा सरकारनेंच त्यांच्या जीवनाचा, सुरक्षिततेचा बोजा उचलावा असें ते अधिक पसंत करतील. गिरणीमालकांप्रमाणें ते दुसऱ्याला लुबाडण्याचा विचार करणारही नाहींत. पालकांना आणि त्या अज्ञ निष्पाप मुलांना ते किती लुबाडणार आणि तशानें कितीसा धनसंचय करणार ? मुंबई प्रांतांतील ४५ हजार शिक्षकांजवळ ४५ हजार रुपयांचा धनसंचय असेल. हे ४५ हजार रु. जमवायला ४५ हजार शिक्षकांना उभें आयुष्य वेचावें लागत असते.

## अन्यायाच्या प्रतिकारासाठीं व्यक्तीचीहीं तयारी हवी

संघटनेसंबंधीं विचार करतां करतां विषयांतर केलें. त्या पुराणिकांबद्दल मी सांगत होतों. आमच्या शाळेत ते चित्रकला शिकवीत. त्यांचा मजवर फार दिवस डोळा होता. म्हणजे त्यांना एक उपवर मुलगी होती आणि मला जांवई करून घेण्याच्या दृष्टीनें ते माझ्याकडे पहात. एकदोनदां त्यांनीं बळेंच

मला ओढून घरी नेलें होतें. त्यांची मुलगी त्यांच्या चित्रकलेसारखी नव्हती तिच्यांत रंगसंगती व रंगविविधता मुळीच नव्हती. ना चाफेकळीचा कांचन वर्ण, ना गालांवर गुलाब, ना पोवळयांचें ओठ ना गर्द निळया रंगाचा केश-संभार! बिचारें साधें ब्लॅक अँड व्हाईटमध्यें असलेलें नवख्या चित्रकाराचें मुक्तहस्त चित्रकौशल्य होतें! सौंदर्याचा तो ब्लॅक और्ट मनांत भरूं शकला नाहीं. बिचारीची कींव आली. पण सहानुभूतीचा प्रवाह प्रीतीच्या प्रांतांत नेह-मींच प्रवेश करतो असें थोडेंच आहे! मी एक गरीब प्राथमिक शाळामास्तर. मला कोण रंभा उर्वशी मिळणार! आपली गरिबी आणि शिक्षण, आपला दर्जा लक्षांत घेऊन माझ्या विवाहजीवन व पत्नीविषयक अपेक्षा मी अगदी अंगासरशीं बेतल्या होत्या. पण या मुलीशीं विवाह केल्यास त्या अंगावरच बेततील असें मला वाटूं लागलें. शक्य तितक्या सहानुभूतीनें मी तिच्याकडे पहाण्याचा प्रयत्न करत होतों. परंतु पुराणिकांनीं जो दुबळेपणा दाखविला त्यामुळें ते माझ्या मनांतून साफ उतरले. अशा गृहस्थांशीं मी सोयरीक करावी हें कसेंसेंच वाटलें मला. बाप तशीं बेटी—असें असेलच असा माझा दावा नाहीं. पण त्या पूर्वींच्या सहानुभूतींत एक बेफिकिरी निर्माण झाली हें मात्र खास.

या प्रसंगानंतर जरी पुराणिक यांचेबद्दल मी नाखूष झालों तरी त्यांना सोडलें किंवा दुखावले नाहीं. संघटनेनेंच त्यांचा दुबळेपणा नष्ट होणार हें मी ओळखून होतो. आम्ही त्यांच्यांत पुरेसा आत्मविश्वास निर्माण केला, त्यांच्याशीं सदैव सहयोगितेचे आश्वासन त्यांना पटवले तर तेच पुराणिक पुराणिक न रहातां क्रान्तीचें उद्गाते व मंत्रप्रणेते होऊं शकतील. पुराण टाकून कृपाण हातीं घेतील. त्यांच्या दुबळेपणाचा सारा दोष कां त्यांच्या एकट्याचाच माथीं मारायचा? हा अविवेक होईल. संघटनासाखळींतील हा कच्चा दुवाच अधिक जपला पाहिजे. परंतु आजवरच्या पारतंत्र्यानें आणि सेवावृत्तीनें असे कच्चे दुवे समाजांत किती आहेत कुणास ठाऊक! त्यांची काळजी वाटते. भीति वाटते आणि मनाची खळबळ वाढते.

## शाळा हें उत्पन्नाचें साधन होऊं द्यावें काय ?

तुम्ही म्हणाल 'काय हो हा गृहस्थ ! याला शाळेच्या बाबतींत दोषैक दृष्टीशिवाय पहातांच येत नाहीं.' पण मला वाटतें हा माझा दोष नाहीं. जेथें ध्येयवादाचा अभाव आहे आणि जेथें अर्थादि अन्य बाबतींत असमाधान आहे तेथें दोषाधिक्यच असणार. शिक्षणसंस्थामध्यें मूलतः ध्येयवादाचा अभाव आहे. शिक्षण हें एक फायद्याचें कुरण करून ठेवलें आहे कित्येक धनिकांनीं. धनिक पैसा गुंतवतो शाळा काढण्यांत. फी व ग्रँटमधून शाळेचा खर्च नक्कीच भागतो आणि वर्षासाठीं त्याला २।५ हजारांचा फायदा घेतां येतो. मुंबईला, अमदाबादला, पंढरपूरला असे कित्येक शाळाचालक मला ठाऊक आहेत कीं जे शाळा म्हणजे शिक्षणाचें दुकान म्हणून चालवीत असतात. या वैयक्तिक मालकीच्या संस्था म्हणजे एक भयंकर दोषवर्तुल आहे. पूर्वीचे गुरुकुलाचे दिवस आतां गेले आहेत. एका व्यक्तीनें आश्रम चालवून आपली पीठिका तयार करणें या कल्पना उच्च असल्या तरी समाजांतून त्या लोपल्या आहेत. शाळेशेजारीं शाळा काढून कधीं कधीं अश्लाघ्य चढाओढ देखील दोन शाळांत चालू होऊन समाजाचें नुकसान होत आहे. व्यक्तीच्या मालकीच्या शाळांत तर नुसतां बुजबुजाट आहे. तेथें शिक्षकांची स्थिति सर्व बाबतींत अनुकंपनीय आहे. तेथें अन्यायांना तोंड फुटणें देखील कठीण आहे. एका व्यक्तीच्या, त्या हुकूमशहाच्या, तंत्रानें चालावें लागतें आणि या गुलामीनें जो फायदा व्हायचा तो मालकाचा. वशिलेबाजी व पैशाचा खोटा व्यवहार अधिकुतर कुठें असेल तर अशा शाळांतून.

मला वाटतें शिक्षण ही अशी वस्तू नाहीं कीं जिचा व्यापार, जिची खरेदीविक्री कोणीही कशीही करावी. शिक्षण हें समाजाचें महत्त्वाचें अन्न आहे, अन्नापेक्षांहि त्याचें मोल अधिक आहे. विचारवंतांनीं हें ठरवायला पाहिजे कीं काय शिकवायचें, कोणत्या पुस्तकांतून कोणत्या पद्धतीनें, कोणत्या तज्ञ मंडळींनी केव्हां, कुठें, कोणत्या प्रकारच्या विद्यार्थ्यांना किती खर्चांत,

शिकवायचे. यासंबंधीं सरकारनें ग्रँट इन कोडमध्यें नियम करून ठेवले आहेत आणि खाजगी शाळांच्या चालकांना देखील हे पाळावे लागतात. हे नियम जोपर्यंत ते पाळीत आहेत तोंवर या शाळांच्या विरुद्ध तक्रार करायला फारशी जागा नाहीं असें कुणाला वाटेल. शाळातपासनिसांचे घेरे व त्यांची देखरेख या शाळांवर आहे मग कां उगाच ओरड ?

नाहीं, ही ओरड उगाच नाहीं. खाजगी शाळांतील शिक्षकांना दैनंदिन मिळणारी वागणुक कितीहीं गैर असली, त्यांच्या नेमणूका, पगारवाढ कायम करणें रजा वगैरे बाबतींत अन्याय होत असेल तर हे तपासनीस खातें फारसें कांहीं करूं शकत नाहीं. खाजगी शाळांत टॅपररी म्हणून पगारवाढ न देतां, स्केलपेक्षां अत्यंत कमी पगारावर शिक्षक राबत असतो, ५० वर सही करून ३० हातांत घेत असतो आणि ग्रँट इन कोडचे नियम तंतोतंत पाळायला लावणारें शाळाखातें या बाबतींत कांहीं करूं शकत नाहीं. ग्रँट इन कोडमध्यें शिक्षकांबद्दल किती नियम आहेत ? फॅक्टरी कायद्यानें किंवा गुमास्ता कायद्यानें जेवढ्या प्रमाणांत कारखानदार आणि दुकानदारांवर बंधनें घालून नोकर वर्गाला संरक्षण देण्यांत आलें आहे तेवढ्या प्रमाणांत बिचाऱ्या शिक्षकाला ग्रँट इन कोडनें किंवा अन्य सरकारी कायद्यानें शिक्षकाला दिलेलें नाहीं.

## शाळा-तपासणीचा नमुना

शाळा काढायला अगोदर परवानगी लागत नाहीं. तुम्ही सरकार मान्यता मागायला गेलांत कीं मग शाळेची इमारत, शाळेचीं बांकें, वाचनाच्या सोयी, शिक्षकांच्या पदव्या याचा विचार केला जातो. शाळेच्या इमारतीचे दगड व लांकडी सामान शाळाखातें पहातें; तिथें शिकवणारे शिक्षक बी. टी. आहेत कीं नाहींत इकडे लक्ष अधिक. भरपूर अन्न मिळतें आहे, शरीरानें सुदृढ व बुद्धिनें तल्लख, शिकवण्यांत निष्ठा बाळगणारे असे

आहेत कीं नाहींत हें पहात नाहींत. हाडामांसाच्या शिक्षकांपेक्षां निर्जीव दगडी इमारती मोलाच्या. दारूच्या दुकानांना, नव्या सिनेमागृहांना परवानगी देतांना सरकार जितकी खळखळ करील तितकीही खळखळ सरकार शाळांना मान्यता देतांना करीत नाहीं. 'थिएटरला आग लागली तर'—असा विचार दूरदर्शीपणानें करून, त्या 'फायरच्या बादल्या, पाण्याची सोय, त्या गॅसच्या बरण्या—चटकन बाहेर पडण्याची सोय—अशा अनंत गोष्टी बोल. पटगृहांचा सरकारी तपासनीस पहातो—शाळा तपासनीस शिक्षकांच्या पोटांतील प्रत्यक्ष आग पाहूं शकत नाहीं, त्यांच्यातल्या असंतोषाच्या ज्वाला त्याला दिसत नाहींत. शिक्षक अवमानित अर्धपोटी आहे म्हणून शाळांची मान्यता काढून घेत नाहीं शाळाखातें. संस्थांच्या शाळांमध्येंही या गोष्टी चालतात. तेथील लामे ( लाईफ मेंबर्स ) असेच फायदेबाज आणि अरेराव असतात. शाळामास्तरला उपाशी ठेवून स्वतः भला मोठा पगार घेतात. संस्थेचा स्वार्थ व शिक्षकांचा त्याग या सोईच्या तत्त्वावर संस्था वाढत असते. संस्था आपल्या शाखा काढते, इमारती बांधते, कॉलेज काढते—त्या संस्थेतला शाळा-मास्तर मात्र त्या संस्थेच्या पायांत पुरला गेलेला दगड रहातो. आजीव सभासद, मॅनेजिंग कौन्सील, डायरेक्टर बोर्ड अशा अनेक नावांनीं धनिक मंडळी शिक्षगतश म्हणून यांत घुसतात आणि संस्थांचें संस्थान बनवतात. मला वाटतें असा काळ आतां खास आला आहे कीं सर्वच शिक्षण सरकारच्या ताब्यांत जाणें जरूर आहे.

टिळक आगरकरांच्या जमान्यांत खाजगी शाळा काढून परक्या सरकारशीं आपण झगडलों. पुढच्या काळांत शाळा कॉलेजवर बहिष्कार घालून आपण राष्ट्रीय शिक्षणाचा फैलाव केला. पण आतां सरकार आपलें झाल्या-नंतर सारें शिक्षण स्वतःच्या मालकीचें करून हा धंदा इतर सर्व धंद्याच्या आधीं राष्ट्रीय करण्याची वेळ आली आहे. सारे शिक्षण सरकारच्या म्हणजे जनतासरकारच्या मालकीचें व्हायला पाहिजे. म्हणजेच राष्ट्रीय शिक्षणाच्या पंचवार्षिक योजना यशस्वी होतील, म्हणजेच निरक्षरता झपाट्यानें दूर

करतां येईल. सार्वत्रिक सक्तीच्या शिक्षणाच्या योजना पुऱ्या होतील. शिक्षकाला पोटभर अन्न तरी मिळूं शकेल, समान दर्जा मिळेल, सर्व देशभर एक वागणूक शिक्षकाला मिळेल--सगळीकडे एका धोरणानें शिकविलें जाईल.

सारें शिक्षण सरकारच्या मालकीचें करायला, साऱ्या शिक्षकांना जीवन-वेतन द्यायला खर्च बराच येईल; पण दुसरा काय इलाज आहे? समाजाची घडी आमूलाग्र बदलली पाहिजे. तात्पुरत्या डागडुजीनें किती वेळ तग धरणार आहे हें समाजमंदिर? या कामासाठी जो खर्च येईल त्याची तोंडमिळवणी नव्या करानें, एखाद्या प्रमुख धंद्याचें राष्ट्रीयकरण करून, कर्ज काढून किंवा आणखी कांहीं मार्गानें करावी. पण हें काम प्राथमिक आणि अगत्याचें आहे.

पण हें जोंवर होत नाही तोंवर मी या शाळेंत आहें किंवा दुसऱ्या शाळेंत गेलों तरी परिस्थिति फारशी बदलणार नाही. मी डॉ. भिडे यांच्या शाळेंत जाण्यास नकार दिला तो याच हेतूनें.

माझा नकार ऐकल्यानंतर प्रभा माझ्यावर रागावली. ती म्हणाली, "कुठेंही शिक्षक म्हणून रहायचें; तर आमच्या शाळेत यायला कां नकार देतां? कदाचित् अण्णा तुम्हांला पर्यवेक्षक नेमतील--पुढेंमागें हेडमास्तर देखील नेमतील—या ना—"

डॉ. भिडे यांना मी ओळखून होतो. ओळखीचा चोर जिवानिशीं सोडतो? माझा उपयोग ते किती करतील आणि मला मोठेपणा व पैसा किती मिळवून देतील, याची कल्पना होती मला. मी नाहींच दुजारला.

आतां प्रभा नाखूप झाली. पण माझ्या जीवनांत तिच्या खुषी-नाखुषीला हंगामीच महत्त्व होतें. मग कशाला मी फिकीर करूं!

# चालकाचीं कर्तव्यें व शिक्षकाचें इमान

आमच्या शाळा चालकांची धडपड नेहमीं तपासनीस अधिकाऱ्यांना खूष ठेवण्याची असते. खासगी वैयक्तिक मालकीच्या शाळा या बाबतीत विशेष लक्ष घालतात. कोणत्याही का प्रकारें होईना, पण तो अधिकारी खूष झाला कीं भागलें त्यांचें. या इन्स्पेक्शनबद्दल खरं म्हटलं तर कितीतरी लिहितां येईल. त्यांतील तें तांबड्या फितीचं बोलणं, तांबड्या फितीचं वागणें, याचा अनुभव कुणाला नाहीं ?

पण या तांबड्या फितींतून बाहेर पडून आमच्या शहरांतले ए. ओ. प्रतिष्ठा मिळवूं पहात होते. नव्यानें कामाला लागलेल्या माणसांत उत्साह जास्त असतो या नेहमींच्या अनुभवाला ते अपवाद नव्हते. म्युनिसिपालिटीच्या प्रत्येक शाळेंत ते गेले. तेथें शिक्षकांच्या सुखदु:खाची आस्थेवाईकपणें चौकशी केली. त्या शिक्षकांच्या मनावर असं बिंबवण्याचा प्रयत्न केला कीं, "बापहो, ही शाळा तुमची आहे. तुमची शाळा आहे असें समजून वागा. तुमची खोली जशी साफ ठेवाल, तशी शाळा स्वच्छ ठेवा. तुम्ही तुमची खोली चित्रांनीं नटवाल, तशी शाळा चित्रांनीं नटवा." किती गोड आणि मिष्टास बोलले !

माझ्या शाळेंत ते आले. त्यांनीं शिक्षकांची बैठक घेतली व तो उपदेश केला. सकृद्दर्शनीं मला त्यांचें म्हणणें एकदम पटलें. पटण्यासारखेंच होतें तें. ज्या शाळेंत दिवसाकांठचे महत्त्वाचे सहा तास आपण घालवितों, ज्या शाळेंत आपल्या उपजीविकेचा पवित्र धंदा आपण करतों, त्या शाळेंत चिमण्या विद्यार्थ्यांना अमृत आपण पाजतों, ती जागा गलिच्छ असावी ? छे, हें बरें नाहीं. शाळेबद्दल आपलेपणा वाटायला पाहिजे.

साहेबांच्या आदेशानें मी भारावून गेलों. दुसऱ्या दिवशीं वर्गातील मुलांच्या तुकड्या करून शाळेचें आवार साफ करून घेतलें, वर्गातील भिंती लिंपल्या, छतावर लटकलेलीं जळमटें काढलीं. विद्यार्थ्यांच्या बरोबर जातीनें मी खपत

होतों. कांहीं वाळून गेलेल्या कुंड्यांत नवीं फुलझाडें लावलीं. घरीं कांहीं विद्यार्थ्यांच्या उपयोगीं पडतील अशीं 'इलस्ट्रेटेड विकली' मधलीं चित्रें कापून ठेवलेलीं होतीं, तीं आणून माझ्या वर्गात लावलीं. माझी ही धडपड माझे सहकारी पहात होते. त्यांत श्रीधरपंत पण होते. पण कुणी मला फारशी मदत करायला आले नाहींत. माझ्या कार्याचा गर्व मला चढत होता म्हणून मी त्यांना बोलावलें नाहीं. 'बुरसटलेले म्हातारे' म्हणून मी त्यांच्याकडे दुर्लक्ष केलें. एका व्यापाऱ्याला भेटलों. त्याच्याकडे हेलपाटे घालून शाळेसाठीं मी एक आरसा मिळवला. त्या देणगीचा जाहीर स्वीकार-समारंभ करण्यासाठीं अध्यक्ष म्हणून आमच्या ऐ. ऑ. साहेबांना मी बोलवावयाचें ठरवलें.

वास्तविक शाळाविषयक प्रश्नांकडे मी दोषैक दृष्टीनें पहाणारा—शिक्षकांच्याच बाजूनें हरएक गोष्टीचा विचार करणारा; कसा काय या बाबतींत वाहून गेलों, कुणास ठाऊक. ठरल्याप्रमाणें तो समारंभ पार पडला. अध्यक्षांनीं पुन्हा एकदां गोड शब्दांत माझा गौरव केला. त्या गौरवानें माझी छाती फुगली. मन फुललें. मूठभर मांस आलें असेल. इंद्राच्या सिंहासनावरच मी जाऊन तर बसलों नाहीं, अशी शंका आली.

मी कोटाची कॉलर वर करून माझ्या सहकाऱ्यांकडे पाहिलें. मला वाटलें, ते माझा हेवा करीत असतील. पण माझ्याकडे कांहीं अंशीं निर्विकार, तर कांहीं अंशीं उपेक्षा, अशा दृष्टीनें ते पहात होते.

संध्याकाळीं मी श्रीधरपंतांकडे गेलों. त्यांच्याकडून शाबासकी मिळण्याची मला फार भूक होती. आणि थोड्या व वेंचक शब्दांत त्यांनी माझें कौतुक केलेंहि. परंतु शेवटीं त्यांनीं इषारा दिला, "ही प्रथा मात्र वाईट पडते आहे—"

"म्हणजे ?" मी प्रश्न केला.

"अरे, आपण किती केलें तरी नोकर. सांगितलेल्या कामाचे चाकर आपण. नोकरानें नोकरासारखंच वागावें. मुलांना शिकविणें हें तुझें

काम. खात्यानें तुला सांगितलें आहे तें मन लावून कर. आणखी असं पहा–" श्रीधरपंतांना खोकल्याची उबळ आली. चांगली ५ मिनिटें टिकली ती. " माझ्या मनांत श्रीधरपंताचा दुसरा मुद्दा ऐकायचा होता; परंतु त्या थकलेल्या अवस्थेंत त्यांना त्रास देऊं नये म्हणून वरवर म्हटलें, " राहूं दे. बोलूं उद्यां— " श्रीधरपंत तक्क्याला टेकून आढ्याकडे पहात स्वस्थ पडले. मी उठलों. ते म्हणाले, " जातांना तेवढं दार लोटून घे. "

श्रीधरपंतांचें म्हणणें ऐकण्याची हुरहुर तशीच राहिली.

त्या गोष्टीला पंधरा दिवस झाले असतील नसतील, तोंच अे. आ. साहेबांनीं एक नवीन कल्पना काढली होती. त्याच्या स्पष्टीकरणार्थ त्यांनीं एक सभा बोलावली. कल्पना अशी होती : त्यांनीं शहराचे चार भाग कल्पून त्या त्या भागांतील शिक्षकांच्या सामन्यांचा वगैरे भरगच्च कार्यक्रम त्यांनीं आंखला होता. त्यासाठीं शिक्षकांनीं आपल्या विभागांतील पालकांकडे व धनिकांकडे जाऊन प्रचार करायचा आणि या सामन्याच्या बक्षिसासाठीं खर्च करण्यासाठीं पैसा जमवायचा. साहेबांनीं खेळांचें महत्त्व, सहकार्याची आवश्यकता, वगैरे बऱ्याच तात्त्विक गोष्टींचीं पुटेंहि या कल्पनेवर चढवलीं होतीं. साऱ्या शिक्षकांनीं तें ऐकून घेतलें. कांहीं अे. ओंच्या पुट्टयां-तील शिक्षकमंडळींनीं अनुकूल भाषणें केलीं आणि साहेबांची स्तुति कर-ण्याची संधि पण साधली. कांहींनीं शंका विचारल्या कीं म्युनिसिपालिटी यावर किती खर्च करणार आहे ? उत्तर देण्यांत आलें कीं म्युनिसिपालिटी कांहींहि देणार नाहीं. म्यु. जवळ पुरेसा पैसा नाहीं.

सभा संपली. दुसऱ्या दिवशीं शिक्षक-संघाची सभा घेऊन या कार्य-क्रमावर चर्चा झाली. साहेबांच्या हेतूसंबंधीं चर्चा झाली. श्रीधरपंतच मुख्यतः बोलले. त्यांनीं सांगितलें, " आपण सारे सेवक आहोंत. सांगितील तें काम आपणांस करायला पाहिजे. तें काम शाळेच्या हिताचें असेल तर तें कितीहि वाईट असलें तरी केलें पाहिजे. पण आपण पालकांकडे जाऊन स्वतःसाठीं कांहीं मागणार आहोंत. खेळण्यांतील बक्षिसांची रक्कम या फंडानें

जमवणार आहों. बक्षिसें आपल्यासाठीं आहेत. आणि आपल्यासाठीं हा पैसा मागणें हें अवश्यकच आहे. भीक मागून बक्षिसासाठीं पैसा जमवायचें इतके काय अडले आहे सामन्यांचें ? शिवाय हें स्वाभिमानाला कमीपणा आणणारें आहे. राबणार आहोंत आपण; पण मोठेपणा जाणार आहे म्युनिसिपालिटीच्या ए. ओ. साहेबांना. स्वतःच्या मोठेपणासाठीं ही दुसऱ्याची गैरपणानें केलेली ही एक प्रकारची पिळवणूक आहे. शाळा चालवणारांची कामें आहेत सामने भरवणें, शाळा झाडण्याची व्यवस्था करणें, शाळेच्या पुढें बाग करणें, शाळेंत आरसा लावणें ( श्रीधरपंतांनी माझ्याकडे एक अर्थपूर्ण कटाक्ष टाकला. ) एखादे दिवशीं हौसेनें आम्ही आमचा वर्ग झाडूं—पण तो रोज झाडलेला ठेवणें हें शाळेच्या चालकांचें काम आहे. शाळा आदर्श चालवणें वा शाळा सजवणें व शाळेंत शिकवणें हीं कामें एकाच्या माथीं कां मारतां ? ”

श्रीधरपंतांनी सभा जिंकली आणि ह्या योजनेला असहकार करायचा ठराव पसार झाला. माझी चूक मला समजून आली. सभेचें वृत्त वर्तमानपत्रांत दिलें होतें; पण तें छापून आलें नाहीं. स्थानिक म्युनिसिपालिटींत कॉंग्रेस बहुमत होतें, वृत्तपत्र कॉंग्रेसवादी होतें. ए. ओ. प्रो. कॉंग्रेसवादी होते. मग ही विरोधी सभा तेथें कशी प्रसिद्धिला जाणार ?

पण सभेनंतर दोन दिवसांनीं मी आणि इतर दोनचार शिक्षकांच्या फटाफट बदल्या केल्याचे हुकूम आले. नं. १० शाळेंतून १६ नंबरच्या शाळेंत मी गेलों. माझ्या घरापासून ती शाळा २ मैल होती. शाळेच्या पलिकडे खाटिकखाना व दुसरीकडे वेश्यागृहें होतीं !

माझ्या गौरवाचा दिवस मला आठवला. मी ज्या इंद्रपदावर बसण्याच्या बेतांत होतों. पण बसलों नाहीं, तो आज रौरवांत पडलों म्हणायचा ! ‘ असं कां ? ’ मनाला रुखरुख लागली.

# एक चिरंतन कुतूहल

माझ्या मनांत एक चिरंतन कुतूहलाची गोष्ट आहे. आणि ती म्हणजे माझ्या शेजारच्या शिक्षकांची. श्री. आडकर हे आमच्या शाळेंत आहेत व सौ. आडकर दुसऱ्या एका शाळेंत आहेत. दोघेंहि 'ट्रेन्ड' आहेत. त्यांचा एक पांचसहा वर्षांचा मुलगा आहे. घरांत मेहुणी आहे आणि तीच बहुतेक रात्रंदिवस राबत असते.

दोघांचा संसार सुखाचा असावा अशी दुरून पहाणारांची कल्पना होते. आतां ती खरी किती आणि खोटी किती, हें मलाहि माहीत नाहीं.

पण मला कुतूहल वाटतें. वाटतें, घरीं मोठें सांस्कृतिक वातावरण असेल! दोघें एखाद्या शैक्षणिक पद्धतीवर मधूनमधून चर्चा करीत असतील. शिक्षकांच्या जिव्हाळयाच्या प्रश्नासंबंधीं बोलत असतील, एकमेकांचे कॅटलॉग तयार करीत असतील. एकमेकांच्या वह्या तपासतील. आपल्या मुलाला बाल-मानसशास्त्राला धरून संगोपतील. सुशिक्षित नागरिकत्वाच्या सुशिक्षित दांपत्याचे हक्क आणि अधिकार यांना जपत असतील. 'भाग्यवान आहेत हं!' असें लोक बोलतात त्यांचेबद्दल.

याच्या उलट श्रीधरपंतांचें वैवाहिक जीवन. इतका विद्वान् गृहस्थ; परंतु पत्नी बिचारी आशिक्षित. सुंदर काव्यांतील रसाविष्कार मूर्तिमत उभा करीत ते वर्गात. पण घरांत त्याचा लवलेशहि प्रकाश पडत नसे. श्रीधर-पंतांनीं शिकवण्या कराव्यात, वह्यांचे ढीगच्या ढीग तपासावेत, शाळेच्या उन्नतीसाठीं रात्रंदिवस झटावें, स्कॉलरशिप परीक्षासाठीं फुकट शिकवून मुलें तयार करावींत, शिक्षकांच्या चळवळींत भाग घ्यावा आणि ह्या साऱ्या त्यांच्या उपद्व्यापाबद्दल तिनें चिडावें, त्यांचें महत्त्व तिला समजूं नये, त्याच्या श्रमांचें घरांत कौतुक होऊं नये, चीज होऊं नये! श्रीधरपंत दुःखी असत यापुरते व त्यांच्या पत्नी असंतुष्ट.

आणखी एक गायकवाड म्हणून शिक्षक होते. घरींदारीं ते शिक्षकच असत. त्यांच्या पत्नी पण अशिक्षित होत्या; पण त्यांनी पत्नीला सकाळपासून संध्याकाळपर्यंत सारखें शिकवावें. वागावें कसें, नेसावें कसें, इथपासून प्रत्येक बारीकसारीक गोष्टी ते शिकवीत. आपल्या भावांना शिकवीत, तेव्हां पत्नीलाहि त्यांच्याबरोबर बसवून शिकवीत. पुष्कळांचा असा अनुभव आहे कीं शिक्षक हे अत्यंत वाईट पालक असतात. शिक्षकांच्या मुलांना दुसऱ्या शिक्षकाच्या शिकवण्या लागतात. घरच्या वैद्याचें औषध घरच्या रोग्यांना लागू पडत नाही असा समज आहे ना, तसं—पण या गायकवाड शिक्षकांचा नमुना कांही वेगळाच पाहिला. त्यांच्याबद्दल आदर वाटतो मला.

शिक्षकाचे कौटुंबिक जीवन आणि वैवाहिक जीवन हें आदर्श पाहिजे. ज्या शिक्षकाला बाहेर वर्गातील मुलांना शिकवतां येतें, त्यांचें शील बनवतां येतें, त्यांना संसारांत स्वतःच्या पायावर उभें राहायला समर्थ करतां येतें, त्या शिक्षकाला स्वतःच्या कुटुंबांतल्या मंडळींना आणि स्वतःला तसें करतां येऊं नये का? शिक्षक व त्याचें कुटुंब हें मोठें शक्तिकेंद्र आहे, सच्छील प्रवृत्तीचा अखंड झरा आहे, शिक्षक ही एक विद्यासंस्था आहे.

आणि हा शिक्षक निश्चिंत राहिला पाहिजे. ' कर्णाची मांडी त्याला झोपायला मिळाली पाहिजे ! त्याच्या मखरक्षणार्थ राम-लक्ष्मण " आत्तसज्ज धनुषौ " असे उभे असले पाहिजेत. कृष्णानें त्याच्या घरीं लांकडें तोडून आणून दिलीं पाहिजेत !

गुरुगौरवाच्या भरांत मी बराच दूर गेलों. मी आडकरांच्याबद्दल सांगत होतों...त्यांचा संसार जवळून पाहिला आहे. 'एका भिंतीआड रहात होतों आम्ही. कधीं असें व्हायचें कीं सौभाग्यवतीची शाळा सकाळीं तर श्रीयुतांची दुपारीं; कधीं याच्या उलट! मेव्हणी बिचारी विधवा आश्रित. ती राबत होती. शाळेच्या वेळाव्यतिरिक्त दोघांच्या शिकवण्या. एकमेकांची एकमेकांना फक्त आर्थिक मदत! बौद्धिक सहकार्य? शून्य. शिक्षकशिक्षणविषयक प्रश्नावर चर्चा—कधींच नाहीं. एकमेकांच्या शाळांतील हकि-

गतींची पुराणें व चर्वित चर्वणें. कामाच्या बोजामुळे चिडखोर स्वभाव. धाकट्या मुलाची आबाळ !

त्या मेव्हणीला शिकण्याची संधी देऊन ती शिक्षिका म्हणून स्वतंत्र जगूं शकली असती. त्यांच्या कुटुंबांतीलच एक सामान्य घटक बनण्याची संधी तिला मिळाली असती तर—याच कुटुंबांत, मला वाटतें, कांही निराळ्या सुखासमाधानाचा प्रकाश तळपतांना दिसला असता.

जाऊं द्याना. मला त्या शिक्षकाच्या घरांतल्या सुधारणा सुचवून काय करावयाचें आहे ? दोघेंहि सुशिक्षित आहेत. मी काय त्यांना सांगावें ?

पण कधीं कधीं साध्या गोष्टीहि प्रबुद्ध माणसांना जेव्हां सुचत नाहींत, तेव्हां माझ्या मनाला एक शल्य जडतें. जाऊं द्या. माझा स्वभावच बनला आहे रुखरुख्या. गडकऱ्यांचा ' चिंतातुर जंतु ' म्हणून मला कुणी शिवी दिली असती तरी त्यांत फारसें वावगें ठरणार नाहीं !

## हेडमास्तर ही शिक्षकावेगळी जात आहे !

आमच्या एका मित्रानें ( तोही माझ्या सारखाच; पण दुय्यम शाळेंतील शिक्षक होता.) एका शाळेंत हेडमास्तरच्या जागेसाठी अर्ज केला. त्याला उत्तरहि आलें नाहीं. मला अर्ज करण्यापूर्वी जर त्यानें विचारलें असतें, तर मी त्याला अर्ज न करण्याचा सल्ला दिला असता.

हेडमास्तर हे जन्मजात असतात. हेडमास्तर हा शिक्षकांतून कुठें नियुक्त होतो ? शिक्षकांच्या संमतीने त्यानें कांही दिवसांच्या मुदतीनें हेडमास्तरच्या जागेवर कां येऊं नये ? आमच्या म्युनिसिपालिटीच्या शाळेंत आणि खेडेगांवच्या शाळांत ती जागा शिक्षकाच्या सेवेच्या मुदतीवर अवलंबून रहाते. सीनिअर, वृद्ध आणि तशांत ट्रेन्ड शिक्षकाला हा मान मिळतो; पण त्यापुढें त्याची प्रगति होऊं शकत नाहीं. आठ आण्यांवर

फेरीवाल्याचा धंदा करणारा पुढें दुकानदार होतो, कारखानदार होतो, सुवर्णतुला करून घेतो. सात रुपयांवर लागलेल्या मास्तराचें जास्तींत जास्त काय होईल? सरकारी शाळेंत लागलेला शिक्षक असिस्टंट इन्स्पेक्टर होईल, 'इन्स्पेक्टर होईल–हुशार असेल तर डी. व्ही. आय. पर्यंतही चढेल. सरकारी नोकरीची ही प्रगतीची शिडी त्याला लाभते. पगार-हि भरपूर लाभतो. खाजगी संस्थांतील शिक्षक प्रायः शिक्षक म्हणून लागतो व शिक्षक म्हणूनच जगतो. महाराष्ट्रांत अशा एक दोन संस्था आहेत कीं तेथल्या शाळांतले शिक्षक त्यांच्या संस्थेच्या कॉलेजमध्यें अध्यापक म्हणून निवडले जातात; पण अन्यत्र जणुं शिक्षकाचा छाप ज्याला बसला तो हेडमास्तर व्हायला, प्राध्यापक व्हायला, युनिव्हर्सिटीचा परीक्षक व्हायला नालायक मानला जातो. पूर्वी प्रांताचा गव्हर्नर हा इंग्लंडमधून येत असे, देशी नोकरशाहीतून चढत चढत गव्हर्नरच्या पदापर्यंत वाट नव्हती. तसेंच शिक्षकाला पुढें जायला संधी नाहीं. हेडमास्तर म्हणून एखाद्या नव्या कोऱ्या करकरीत पदवीधराची नेमणूक केली जाते. प्राध्यापकाच्या जागेसाटीं ७।८ वर्षांचा अनुभव असलेला एम्. ए. शिक्षक आणि कॉलेज-मधून नुकताच बाहेर पडलेला त्याच तोलाचा एम्. ए., यांत निवड करायची झाली तर नव्या पदवीधराची योजना केली जाते. याचें समर्पक कारण कुणी सांगूं शकेल? शाळातपासनीसाच्या जागेवर ७।८ वर्षांच्या अनुभवी शिक्षकाऐवजीं नवा पदवीधर पसंत केला जातो. सरकारी नोकऱ्यांमधून शिक्षकपेशातील मंडळींना संधी खात्रीनें कमी. असें कां? शिक्षकाचा पेशा ज्यानें पत्करला, त्याच्यामधली हुशारी आणि कार्यक्षमता संपली अशी सार्वत्रिक समजूत आहे. किती कोती आणि खोटी समजूत आहे ही! समाजानें शिक्षकाचा किती कोंडमारा चालवला आहे हा! त्याला सगळीं विकासाचीं, प्रगतीचीं दारें बंद केलीं गेलीं आहेत, या गोष्टीची खंत वाटते. शिक्षकाच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर मतप्रदर्शन करण्यासाटीं म्युनिसिपालिटींत किंवा विश्वविद्यालयांत शिक्षकांचा प्रतिनिधि नाहीं. स्कूल

बोर्डें आणि विश्वविद्यालयें या शिक्षणविषयक संस्था ! पण इथेही धनिक, अल्पसंख्याक प्रोफेसर, आणि कांहीं लोकशाहीनें निवडून दिलेले गुंड, हेच असतात. आणि बहुसंख्य मुक्या शिक्षकांवर ते हुकुमत गाजवीत रहातात. हा का न्याय आहे ?

## शिक्षकाला कसली बढती !

असें पाहिलें म्हणजे वाटतें, मास्तरकी सोडल्याशिवाय समाजांत मानाची जागा मिळणार नाहीं. या खडूच्या सरदारकीला आतां किंमत राहिलेली नाहीं. आज समाजांत मोठी असलेली अनेक मंडळी आयुष्याच्या प्रारंभीं शिक्षक होतीं. ना. शास्त्री, ना. गोखले, ना. परांजपे, ही मवाळ मंडळी किंवा पं. मालवीय, पंतप्रधान खेर, शंकरराव देव, साने गुरुजी आणि खांडेकर ही सारी एका काळची शिक्षकमंडळीच; पण या धंद्यांतून ती मोठी झाली नाहींत. हा धंदा सोडून किंवा या धंद्यांत अन्य व्यवसाय करून सारी मोटी झालेली आहेत. ही गोष्ट माझ्या म्हणण्याला बळकटी आणते. वास्तविक शिक्षक म्हणजे सर्व क्षेत्रांत त्याचें स्वागत व्हावें असा पाहिजे. कांहीं क्षेत्रांचें त्याला ज्ञान नसलें तरी शिकण्याची मनोवृत्ति, नवीन गोष्टी हस्तगत करण्याची त्याची इच्छा आणि तयारी चांगली असते; पण अनुभव मात्र उलटा येतो. 'शिक्षक' म्हटला कीं त्याला दर ठिकाणीं मज्जाव मात्र होतो. आजच्या लोकशाहीच्या काळांत संधी व समानतेची मागणी शिक्षक करीत आहेत. लायकीप्रमाणें काम आणि पगार मिळायला काय हरकत आहे ? त्याला स्वतःचा दर्जा कां नाहीं वाढवतां येऊं ?

# शिक्षकानें समाजांत दर्जा कमवायचा कसा ?

समाजांतील हा दर्जा कशावर अवलंबून आहे ? एका काळांत दरिद्री ब्राह्मणाला उच्च दर्जा होता. कुठलाही फाटका ब्राह्मण राजाकडे जाऊन त्याच्याकडून वाटेल तें मिळवीत होता. आज दर्जा जन्मावर अवलंबून नाहीं. आंबेडकर महार म्हणून कुणी त्यांना कमी लेखीत नाहीं. दर्जा पैशावर अवलंबून आहे असेंहि पूर्णांशाने म्हणतां येणार नाहीं. बाळासाहेब खेर किंवा राजाजी ५०० रु. दरमहा मिळवतात. त्यांच्या हाताखालचे कित्येक नोकर १।२ हजार दरमहा मिळवणारे आहेत. पण बाळासाहेबांचा दर्जा त्यांना येणार नाही. बाळासाहेबांपेक्षा काँग्रेसचे चिटणीस शंकरराव देव किंवा विनोबा भावे, आचार्य भागवत, साने गुरुजी, यांचे स्थान निराळया दृष्टीनें उच्च आहे. स्थानमाहात्म्यावरहि मोठेपणा थोडाफार अवलंबून असेल; पण अधिकाराची जागा नसतांनाही किंवा चार आण्यांचा संबंध नसतांनाही काँग्रेसजन गांधीजींना मोठा दर्जा देतात. काँग्रेस बाहेरच्या जयकर-मालवीयांना काँग्रेसमध्यें मान मिळतो. म्हणजे खुर्चींत मोठेपणा नाहीं हेंही खरेंच. पैशांत नाहीं, खुर्चींत नाहीं, जातींत नाहीं; तो बुद्धिमत्तेंत आहे, निष्ठेंत आहे, आणि तिच्या द्वारां केलेल्या कार्यानें येत असतो, म्हणून तो स्वयंसिद्ध आहे.

असामान्य बुद्धीनें कुठलेंही काम करा, मोठा दर्जा मिळतोच मिळतो. सुभाषनें अझाद सेना उभारली, मालवीयांनी हिंदुविश्वविद्यालय निर्मिलें, अण्णा कर्वे यांनी असामान्य कर्तृत्व गाजवलें—त्यांना मोठा दर्जा प्राप्त झाला. त्यासाठीं त्याग करावा लागेल; पण तो गौणच राहील. त्याग केला तर उत्तमच; न करतां मर्यादित स्वार्थ साधला तरी खपतो. सुभाष, जयकर, मालवीय, कर्वे, यांनीं कांहीं अगदीं लंगोटी लावून फकिरी नाहीं पत्करली. आवश्यक तेवढा स्वार्थ साधला, आवश्यक तेवढा त्यागहि केला !

शिक्षकाच्या धंद्यांत मर्यादित बुद्धीचीं माणसें येतात व चिकटून रहातात. असामान्य बुद्धीचीं माणसें आलीं तरी टिकत नाहींत. शाळेचें क्षेत्र सोडून आपल्याला योग्य क्षेत्र लवकरच शोधतात तीं. (असें मात्र नाहीं कीं याच्या उलट, शाळा सोडून जाणारे सारे असामान्य बुद्धिमत्तेचे असतात!) शिक्षकांचे कार्यक्षेत्र मर्यादित. संबंध येणार ७ ते १७ वर्षांच्या बालकांशीं—व तोही एकेक वर्ष. त्यांत काय मोठें कार्य होणार? शिक्षकांचा स्वार्थ थोडा—समजा त्याग पुष्कळ; पण नुसत्या त्यागानें मोठेपणा किती येणार त्याला? बुद्धिमत्तेची व कार्याची जोड नसेल तर—फुकट आहे! रानांतला आम्रवृक्ष दरसाल हजारों आम्रफळांचा त्याग रानांत करतो. एखादा साधू सर्वसंगपरित्याग करतो. त्याला मोठेपणा कसा येईल? त्यांत समाजोपयोगी असामान्य बुद्धि असल्याशिवाय आणि बलशाली काम केल्याशिवाय त्याचा त्याग व्यर्थ आहे!

शिक्षकाला फार मोठा दर्जा कधींही कोणत्याही समाजांत मिळणार नाहीं असें मला वाटतें तें यामुळेंच. इंग्लंड देशांतही शिक्षकाच्या पेशाची टवाळीच होते. तो एक बावळटच प्राणी समजला जातो. जॉर्ज बर्नार्ड शॉनें एका नाटकाच्या प्रस्तावनेंत एक मजेदार पण उद्बोधक गोष्ट दिली आहे:

एकदां एका रस्त्यावर एका शिक्षकाला त्याच्या विद्यार्थ्यानें चिडवलें म्हणून संतापून शिक्षकानें मुलाचा चांगला अर्धाएक फर्लांग पाठलाग केला. त्याला त्यानें पकडलें. परंतु विद्यार्थीहि चांगला खमंग आणि गुंड होता. त्यानें मास्तरशीं कुस्ती केली आणि त्यामुळे त्याच्या कपाळाला खोंक पडली. लोकांनीं मारामारी सोडवली. पण मास्तरानें त्या पोरावर फिर्याद केली. आपल्यातर्फे वकील मिळविण्यासाठीं ते पोरगें एका वकीलाकडे गेलें. त्यानें मारामारीची हकिकत वकीलसाहेबांना सांगितली. वकिलांना केस होपलेस वाटत होती. ते म्हणाले, "तुला ५ पौंड तरी दंड होईल. कुणा प्रतिष्ठित गृहस्थावर असा हात टाकणें म्हणजे—" मुलगा चटकन उत्तरला, "अहो,

मी माझ्या ओळखीच्या मास्तरांशीं मारामारी केली." "असं का—मास्तर-विरुद्ध खटला ना—मग सुटशील तूं. ताकीद मिळून फार तर अर्धा पौंड दंड होईल!"

शॉचा खवचटपणा सोडून दिला तरी गोष्टींतील तात्पर्यावर टीका करावला नको. इतर देशांपैकीं हिटलरच्या आमदानीत जर्मनीत, मुसोलिनीच्या अमदानींत इटलींत शिक्षकाचा दर्जा बरा होता असें दिसून येतें. जर्मनी-इटालींतील बायकांच्या रक्तांत फॅसिझमच्या तत्त्वाचे इंजक्शन देण्यासाटीं तेथें शिक्षकांचा उपयोग केला गेला. सामान्य बुद्धीच्या मास्तरांनीं हिटलर-मुसोलिनीनें आंखलेल्या शैक्षणिक योजना तथाकथित राष्ट्रीय शिक्षणासाटीं, नव्या युद्धासाटीं, पक्षासाटीं, सत्तेसाटीं पार पाडण्याचें कार्य केलें. त्यामुळें तेथला शिक्षकवर्ग साधारणपणें बरा होता. सर्व लहान नवी पिढी हिटलरच्या सक्तीमुळें शिक्षकाला मान देत होती.

## शिक्षक, शिक्षण व सरकार

पण हें सारं कितपत इष्ट किंवा सत्तत्त्वाला धरून झालें, यासंबंधीं विचारच करावयास हवा. शिक्षणखातें एका विशिष्ठ राज्ययंत्रासाटीं वापरलें जाणें हें योग्य कीं अयोग्य? आज कॉंग्रेससरकार आहे म्हणून शाळा-शाळांत तिरंगी झेंडे, गांधी-नेहरूंचे फोटो, त्यांच्या जयंत्यांच्या सुट्या, त्यांच्या विशिष्ट तत्त्वज्ञानावर आंखलेल्या शिक्षणयोजनांची सक्तीनें अंमलबजावणी चालू आहे. उद्यां सोशॅलिस्टांचें वा कम्युनिस्टांचें राज्य आलें तर शाळांवर लाल झेंड, मार्क्स-लेनिनचे उत्सव आणि नवेंच शिक्षण असे प्रकार चालू झाले तर अनवस्था ओढवेल. प्रगतीची वेल खुरटेल. हिटलरनें शिक्षकांना दर्जा दिला, उद्यां कॉंग्रेससारख्या संस्थेनें शिक्षकांना दर्जा दिला तर जो दर्जा वाटेल तो तात्पुरता वाटेल. तो साऱ्या समाजानें दिला पाहिजे.

आणि एवढ्यासाठीं साऱ्या शिक्षणाचें ध्येय लोकशाही हेंच असलें पाहिजे. धर्म-जाती-राष्ट्रीयता-निरपेक्ष शिक्षण देऊन श्रेष्ठ प्रकारच्या लोकशाही-साठीं नवीन पिढी तयार करणें, हेंच शिक्षकांचें ध्येय असलें पाहिजे.

नंतर असा प्रश्न निर्माण होईल कीं धर्मजातीपक्षनिरपेक्ष शिक्षण समाजाला देतां येईल का? व आलेंच तर तें अंतिमदृष्ट्या फायदेशीर होईल का?

आजवर शंभरदीडशें वर्षे धर्मभावना उद्दीपित करणारें शिक्षण आपण दिलें नाहीं. कांहीं सनातनी म्हणतील कीं म्हणून तर चुकलें. धर्म गेला—बुडाला आणि अवनति झाली. धार्मिक शिक्षणहि अभ्यासक्रमाच्या वेळेंतून बळेंच आपण वगळलें आहे. मला वाटते, त्यामुळें आपला थोडाफार फायदाच झाला आहे. हिंदुस्थानच्या राजकीय प्रगतींत धर्मभावनांचें वर्चस्व यामुळेंच १९२० सालपर्यंत झालें नाहीं. व राजकारण धर्मजातिनिरपेक्ष राहिलें. टिळकांसारख्या राष्ट्रीय शिक्षणाचा उद्घोष करणाऱ्या शाळासंस्था-पकांनींही धार्मिक शिक्षणाचा अट्टाहास बाळगला नाहीं. उलट अलिगड आणि उस्मानिया किंवा बनारस युनिव्हर्सिटी निघाल्यानंतर राजकारणाचा रंग पालटत गेला.

शिक्षण हें जातिनिरपेक्ष असेंच आपण आजवर ठेवलें आहे. ब्राह्मणा-च्या मुलाला एक शिकवण तर महार-मुसलमानाला दुसरें, असें आपण कधीं केलें नाहीं. शिक्षण सर्वांना एकच ठेवलें. शिक्षणाचा विचार प्राथमिक, दुय्यम, उच्च, असा किंवा कला, विज्ञान, औद्योगिक, शेतकी, असा करीत आलो. मुंबईसारख्या हिंदु-बहुसंख्य प्रांतांत जेव्हां मुस्लिम बोर्ड ऑफ एज्युकेशन करावें अशी किंवा उर्दू युनिव्हर्सिटी असावी अशी असेंब्लीत सूचना आली, तेव्हां मला आश्चर्याचा धक्का बसला. उद्यां लिंगायत बोर्ड ऑफ एज्युकेशन करा, परवां जैन बोर्ड करा, अशा मागण्या येतील. भाषावार प्रांतरचना होऊन भाषावार बोर्डें करावीं लागतील; पण जातवार शिक्षण देण्यानें समा-जाला धोका आहे. आज असलेली तेढ आणखी वाढेल मात्र.

## शिक्षक आणि पक्षनिष्ठा

शाळाखात्यांत पक्षनिष्ठा ही असूं नये, शिक्षक कुठल्याहि पक्षाचा नसावा, या विषयावर आमच्या शाळेंत एकदां खडाजंगी वाद झाला. शिक्षक हा जर समाजाचा घटक आहे तर त्याला राजकीय मतें असूं नयेत, या म्हणण्यांत काय अर्थ आहे? त्या चिारवंत शिक्षकाला मतें ही असणारच. पण त्यानें तीं शाळेंत वर्गात आणूं नयेत. हें तरी कसें शक्य आहे? शिक्षकाची मतें म्हणजे काय त्याचा रेनकोट आहे की तो वर्गाच्या बाहेर ठेवून त्याला आंत येतां येईल? पण समजा, भिन्न पक्षाची शिक्षक मंडळी एका शाळेंत काम करतात आणि आपलीं राजकीय मतें घेऊन ती वर्गांत जातात. त्या मतांचा परिणाम तीं अध्ययनावर व विद्यार्थ्यांवर होऊं देतात. अशा परिस्थितींत काय होईल. विद्यार्थ्यांच्या मनावर काय परिणाम होईल? कांही विद्यार्थी एका पक्षाकडे ओढले जातील, कांही दुसरीकड—कांहीं गोंधळून जाऊन निष्क्रियहि होतील. विद्यार्थ्यांच्या जीवनांत सुरुवातीसच अन्य पक्षांबद्दल असहिष्णुता निर्माण होईल. अशी होणे अर्थात्च इष्ट नाही. पक्षाभिमानांतून पक्षाचा अहंकार वाढेल. तो घातुक आहे. किंवा असें समजा कीं एका शाळेंत सगळे एकाच पक्षाचे शिक्षक आहेत तरी दुसरी अशी शाळा असेल कीं तेथें दुसऱ्या पक्षाचे लोक असतील. एका शाळेंतील सारे शिक्षक आर. एस्. एस्.चे आहेत. तर दुसऱ्या एखाद्या शाळेंत सारे पाकिस्तानवाले असतील आणि दोघांचीहि पक्षनिष्ठा विद्यार्थीजगांत म्हणजे नव्या पिढीत नव्या १०।१५ वर्षानंतरच्या जगांत दुहीचीं बीजें पेरून ठेवील.

आपल्या भारतांत अखंड लोकशाही आपल्याला नांदवावयाची आहे. मग Training for Democrocy हेंच आपल्याला आपलें धोरण, ध्येय, ध्रुव असें निर्माण केलें पाहिजे. शिक्षकानें राजकीय मतें खुशाल बाळगावींत; पण आपल्या मतांचा प्रचार विद्यार्थ्यांच्या जगांत कसलाही गैरफायदा घेऊन

किंवा दुसऱ्या पक्षाची बदनामी करीत, करूं नये. निर्लेप मनानें विद्यार्थ्यांना लोकशाहीचें शिक्षण द्यावें. ते सर्वपक्षीय पण अभिनिवेशरहित असावें. मतामतांचे सातहि रंग त्यांत असावेत; पण अशा प्रमाणांत की सर्वांचा मिळून एक शुभ्र रंग व्हावा. न कोणता एकच भडक व्हावा.

लो. टिळकांच्यापासून हें काम यशस्वीतेनें आपण करीत आलेलों आहों. राष्ट्रीय शिक्षणाचा समावेश टिळकांनीं आपल्या चतुःसूत्रींत केला. तें राष्ट्रीय शिक्षण अत्यंत उदात्त पातळीवर ठेवलें गेलें. ब्रिटिशांचा द्वेष त्यांत कधीं शिकवला गेला नाहीं. जर्मनछाप ज्यूविरोधी राष्ट्रीय शिक्षण कुठें आणि टिळक-गांधींचें आदर्श राष्ट्रीय शिक्षण कुठें?

पूर्वी शिक्षणखात्यावर खर्च होणारा पैसा अबकारी खात्याच्या उत्पन्नांतून मिळे. वास्तविक पहातां पैसा नेहमींच निर्लेप असतो. वेड्या भावनेला तो अबकारींतून—दारू-अफूंतून—आलेला दिसला आणि या वेड्या भावनेनें आपण ह्या खात्यांचा संबंध तोडावा अशी मागणी केली. मागणी वेडेपणाची असेल; पण तिच्या मागची भावना आर्यसंस्कृतीला धरून असलेली, पवित्र व सात्त्विक भावना आहे, याचा कुणाला इन्कार करतां येणार नाहीं.

इतक्या श्रेष्ठ परंपरेवर आमचें हिंदुस्थानचें शिक्षण उभें आहे. परशुराम, वशिष्ठादि तेजस्वी शिक्षकपरंपरा परवांच्या काळापर्यंत अखंड चालू होती आणि म्हणून वाटतें, आपल्या या स्वतंत्र हिंदुस्थानाला लोकशाहीचें शिक्षण देण्यासाठीं व जगाला आदर्श लोकशाहीचे धडे देण्यासाठीं एकट्या हिंदुस्थानला खराखुरा शिक्षकच समर्थ आहे.

पण शिक्षकाची कार्यक्षमता, योग्यता, शिक्षकानें प्रथम ओळखायला पाहिजे. संघटनेनें ती समाजांत प्रभावीपणें व्यक्तविली पाहिजे आणि राष्ट्राच्या नेत्यांनीं तिचा योग्य उपयोग केला पाहिजे.

पण मनचे माझे हे विचार मनांतच विरतात आणि हें सारें कधीं होणार म्हणून आशेनें भविष्यकाळाकडे पहात बसतों; झालें.

## शिक्षक-शिष्य नातें—

मंडईतून घरीं येत होतों मी. येतांना वाटेंत माझा एक विद्यार्थी दिसला. मला पाहतांच त्यानें नमस्कारासाठीं हात वर उचलला, निदान मला तसा प्रथम भास झाला. मी त्या नमस्काराचा स्वीकार करण्यासाठीं हात वर उचलण्याच्या तयारींत होतों आणि तेवढ्यांत मला आढळलें कीं त्यानें मला नमस्कार केलेला नाहीं. माझ्याजवळून चाललेल्या दुसऱ्या एका वकीलसाहेबांना तो नमस्कार होता. दोघांनीं हस्तीदंती केली. मी मनांत खूपच वरमलों. वर उचललेला हात तसाच वर नेऊन टोपी सारखी केली. आणि खालीं मान घालून पुढें सटकलों.

माझ्या मनांत विचार आले कीं खरंच त्या विद्यार्थ्यानें मला नमस्कार कां केला नाहीं? शिक्षक होतों मी त्याचा. जीवनांतील पहिली श्री मी दाखविली त्याला. त्यानें त्याला जीवनपथावरील शिदोरी बांधून दिली, मन तयार केलें, त्याच्याबद्दल इतका अनादर? होय– अनादरच! आदर तरी कां दाखवावा त्यानें? मी महिन्याला त्याच्याकडून फी घेत होतों. हा शुद्ध आर्थिक व्यवहार नव्हता का? आर्थिक व्यवहारांत भावनांना जागा कुठली? कापडवाल्यानें मला थोड्या किंमतींत कापड दिलें म्हणून आणि औषधवाल्यानें मला औषध दिलें म्हणून आणि वाण्यानें धान्य दिलें म्हणून आम्ही गाजावाजा करीत नाहीं. आमच्या जीवनाचे ते आधारच असतात. पण आम्ही त्यांच्याशीं मोठ्या आदरानें, कृतज्ञतेनें वागत नाहीं, एकनिष्ठेनें वागत नाहीं.

शिक्षकाचें व्यक्तिमत्व तरी असें कुठें असतें कीं दुसरा एखादा आपोआप त्याच्यापुढें नम्र व्हावा. प्रा. चाफेकर आणि रँ. परांजपे यांच्यासारखा आपल्या प्रभुत्वाचा अधिकार प्रत्येक शिक्षकांत कुठून असणार! चाफेकर-परांजपे यांच्या सर्व शिष्यांत जी सदा विनयाची, आदराची

पेरणी त्यांच्या विद्वत्तेमुळें तयार झालेली आहे तशी ती सर्व शिक्षकांना थोडीच साधणार ?

पण माझी अपेक्षा मात्र अशी कीं प्रत्येक विद्यार्थ्यानें मला नमस्कार करावा. कारण मी शिक्षणाचा धंदा जरी केला असला, तरी धंदेवाईकाची वृत्ति किंवा व्यापाऱ्याला शोभेल अशी फसवणूक आणि पिळवणूक कधीं केली नव्हती. प्राथमिक शाळेंतल्या महिनाकांठच्या ८।१२ आण्यांच्या फीत मी त्याला लाख मोलाचें माप घातलें होतें. ज्ञान मी कदाचित् फार फार थोडें दिलें असेल. ज्या पुस्तकांतले पाठ आणि धडे मी शिकवले तें अ आ चें पुस्तक २ आण्यांचें होतें. तें २ आण्यांचें ज्ञान घरबसल्या त्याला मिळालेंही असतें. मी जरी त्या दोन आण्यांच्या पुस्तकांतून शिकवलें होतें, तरी तें दोन आण्यांचें नव्हतें. मी त्याच्या मनाला रीत लावली होती. विचार करायला शिकवलें होतें. चांगलें वाईट निवडण्याची कला सांगितली होती. गायन, चित्रकला, हस्तव्यवसाय, यांचे द्वारां मी त्याची सौंदर्यदृष्टि जोपासली होती. जें त्याच्या जन्मदात्या मातापितरांस साधलें नसतें, तें मी त्याच्यासाठीं केलें होतें. माझ्या मनांत माझ्या प्राथमिक शिक्षकाबद्दल आदर आहे. तसाच मलाही माझ्या विद्यार्थ्यांकडून कां मिळूं नये ? कदाचित् आज जीवनाच्या साऱ्या चाकोऱ्याच बदलल्या असतील. उद्यां रस्त्यांनून जातांना नेहरू अन् गांधी भेटले तरी आम्ही त्यांना नमस्कार करणार नाहीं. आदराच्या अभिव्यक्तीची आम्हांला आवश्यकता वाटत नाहीं म्हणा किंवा आदरभावनेला बुद्धिभेदामुळें बरीच ओहोटी लागली आहे म्हणा; पण वस्तुस्थिति अशी आहे, ही गोष्ट मात्र खरी.

शिवाय असें नाहीं का, की मी त्याच्या मराठी दुसरींतला शिक्षक ! बी. ए. होईपर्यंत म्हणजे १६ वर्षांच्या अध्ययन-काळांत पन्नास एक तरी शिक्षक त्याला भेटतील. त्या पन्नासांतला मी एक. नव्हे, त्या पन्नास पायऱ्यांच्या जिन्यांतली मी म्हणजे तळाकडील दुसरी पायरी. वरवर

चढून जागागा गृहस्थ प्रत्येक पायरीसाठीं किती कृतज्ञता बाळगूं शकेल? शेवटच्या कांहीं त्याच्या लक्ष्यांत राहतील— कांहीं महत्त्वाचे टप्पे व वळणें तो स्मरेल आणि त्यांत मला जागा नसेलही.

हेंही मान्य आहे. पण माझी ही वैयक्तिक तक्रार नाहीं. साधारणपणें सारा शिक्षकसमाज असाच उपेक्षित व अवमानित आहे. असो. माझ्या ओळखीचे एक शिक्षक आहेत ते स्वतःच प्रत्येक विद्यार्थ्याला प्रथम नमस्कार करीत जातात.

पण, मी तरी या नमस्कार करण्यासारख्या क्षुल्लक गोष्टीवर एवढें भारूड कां सांगतों आहें? माझ्या मतानें, हा साधा शिष्टाचार इतका उपेक्षणीय नाही. यानें जीवन सुरेल बनणार आहे. 'थॅंक्स' आणि 'बेग युवर पार्डन' यांना काय अर्थ राहिला आहे? उपचाराचे हे चोजले आहेत. शब्दामधला भावनेचा अर्थ उडून गेल्यानंतर राहिलेला हा अक्षरांचा समूह आहे केवळ! पण किती सुटसुटीत आणि कामचलाऊ. नाहीं म्हटलें तरी जीवनांत बऱ्याच गोष्टी सोईनें होतात. अपरिचित परिचित होतात. परिचितां-च्या व्यवहारांवरचे गैरसमजांचे ढग वितळतात.

कुणी म्हणेल, शिक्षकांबद्दलचा आदर कमी होण्याचें कारण म्हणजे त्यांच्यापेक्षां कर्तबगार माणसें शिक्षणक्षेत्राच्या बाहेर बरींच आढळतात. शिक्षकच कोण असा मोठा कीं विद्यार्थ्यानें त्याला नमस्कार करावा? विद्यार्थ्याला शिक्षकाहून अनेक पटीनें श्रेष्ठ माणसें आढळतात व त्यामुळें शिक्षक त्याच्या मनाला मोहूं शकत नाहीं. मला हें पटत नाहीं. एखाद्या मुलाला बापापेक्षां श्रेष्ट माणसें दुसरीकडे खात्रीनें पुष्कळ आढळतील. म्हणून तो कांहीं आदराच्या शिष्टाचारांचें उल्लंघन करणार नाही. त्यानें करूं नये. मर्यादित जगांत शिक्षक शिष्य-संबंध पितापुत्राच्या संबंधांसारखेच नाहींत का?

आणि कदाचित् याच कारणानें मला रस्त्यांत भेटणाऱ्या ओळख बुझालेल्या विद्यार्थ्यांकडून मिळालेल्या नमस्कारांत सकारण—अकारण असा

गौरव आढळतो. समाजाला गरीब शिक्षकासाठीं पोटभर पगार पुरवणें शक्य होत नाहीं पण हा फुकाचा समाधान निर्माण करणारा नमस्कार तरी त्याला विद्यार्थीवर्गाकडून कां मिळूं नये ? ज्या विद्यार्थ्यांसाठीं आपण जीवन ओतलें त्यांना त्याची थोडीशी का होईना पण कदर आहे, याची समाधानी जाणीव त्या शिक्षकाच्या मनांत निर्माण होऊं शकेल, असें वाटतें मला.

मी तसाच पुढें घरीं निघालों. वाटेंत एक मारुतीचें देऊळ लागलें. मी नमस्कार केला. पुन्हां थोड्या अंतरावर दत्ताचें देऊळ होतें. पुन्हां हात वर उचलला आणि नंतर रामाचें...... .....

मनांत विचार आला—ईश्वराबद्दल मी कृतज्ञता तरी किती वेळां दाखवावयाची ? मी नमस्कार केला नाहीं. माझी कृतज्ञता देवाला ठाऊक होती. मघांचा विद्यार्थी—त्यानें मला नमस्कार केला नाहीं म्हणून मी रागावलों. देव तसा रागावणार नव्हता. मी एक सामान्य संसारी माणूस. विद्यार्थ्यांच्या वंदनानें माझें हृदय हरखून गेलें असतें. म्हणून तें औप-चारिक वागणें विद्यार्थ्यांकडून मी अपेक्षिलें होतें. सर्वशक्तिमान्, सर्वसाक्षी परमेश्वर किंवा त्याच्या दगडी मूर्ती अशी अपेक्षा बाळगीत नाहींत.

कांहीं असो, पण या छोट्या प्रसंगानें मनाला रुखरुख लागली हें मात्र खरें !

श्रावण महिन्याचे दिवस होते. मी वर्गांतल्या मुलांमुलींना घेऊन विपिनेश्वराच्या सहलीला निघालों होतों. शिक्षकाच्या आयुष्यांत सहल हा एक असा प्रसंग आहे कीं जेव्हां निरागस बालकांचा उपाधिरहित सुखाचा सहवास त्याला लाभूं शकतो.

पाऊलवाटेनें आम्ही चाललों होतों. पुढें जरा दूर मुलांचा घोळका दोनदोनांच्या रांगा करून कूचगीतें गात चालला होता. दोनतीन मुली माझ्याभोंवतीं घुटमळत होत्या आणि उरलेल्या सातआठ मुली मागें रेंगा-ळल्या होत्या. त्यांच्यासाठीं मधून मधून आम्हांला वेग कमी करावा लागे किंवा थांबावें लागे. मुलींच्यामध्यें दोन गट होते. ते गट कोणत्याहि तत्त्वावर

नव्हते; परंतु होते ते इतकेंच. त्यांचीं भांडणें आणि अबोला असे. छोटा गट माझ्याजवळून चालला होता.

ती पाऊलवाट साधारणशा गर्दनिळ्या वनराजींतून वेडींवांकडीं वळणें घेत जात होती. दुतर्फा भर यौवनानें नटलेल्या लता व सामर्थ्यानें रसरसलेले वृक्ष होते. विविध फुलांचा अन् फळांचा मंद सुवास मौजेनें खेळत होता. भोंवतालची काळीभोर मळ्याची जमीन ओलीचिंब झाली होती. हवेंतही ओलसरपणा व दमटपणा होता. रानवेली व रानफुलांचा तसाच विशिष्ट प्रकारच्या गवताचा वास वाऱ्याच्या झुळकीबरोबर जाणवे. उगवत्या सूर्याचीं किरणें पश्चिमेकडल्या उंच पर्वतांच्या शिखरांवर व त्यांच्या खालच्या कांहीं भागावर विशेष रंगीबेरंगीपणानें चमकत. आकाश कांहीं अगदीं निरभ्र नव्हतें; पण तुरळक अभ्रखंड किसलेल्या बर्फाच्या रंगासारखे क्षितिजाच्या एका बाजूला रेंगाळत होते व त्यांचा पांढरा रंग क्षितिजाशीं कमी कमी होत शेवटीं त्या क्षितिजाच्या कडेला असलेल्या उंच उंच डोंगरमाथ्याच्या काळसर हिरवट रंगाशीं रंगसंगती साधीत होते.

माझ्याबरोबर ज्या तीन मुली चालल्या होत्या त्यांच्यांत कांहीं कुजबुज झाली. म्हणून त्या रम्य वनश्रीकडून माझें लक्ष त्यांच्याकडे गेलें. नाहींतर मी किती वेळ त्या ढगांकडे पहात राहिलो असतों कुणास ठाऊक ! त्या तीन मुली तीन प्रकारच्या होत्या. एक अगदी लहान होती वयानें. खरें म्हटलें तर परकरांतील पोर होती; पण पातळ नुकती नेसायला लागल्यामुळें जरा अकालीं प्रौढ दिसत होती इतकेंच. चेहऱ्यावरचा भाव अगदीं बालिश होता. पुण्यामुंबईंत शाळेंत एकंदरीनें वयमान कमी असतें. पुण्याच्या शाळेंत मॅट्रिकमध्यें बहुसंख्य मुलें १५।१६ च्या आंत असतात; परंतु आमच्या गांवांसारख्या जिल्ह्याच्या गांवीं एकंदरींत मुलें मोठीं. मॅट्रिकच्या वर्गांत १८।१९ चीं मुलें व मुली आढळतात. माझ्याकडे असलेल्या स्पेशलच्या वर्गांतहि मुलें व मुली मोठीं व खेडेगांवीं रहाणीनें उफाड्याची होतीं. आतां हीच मुलगी पहा. वासन्तिका देशमुख. हिचा बांधा पाहिला कीं मला थेट मायकेल

एंजेलोच्या एका चित्रांतील स्त्री आठवते. तस्सा बांधा, तस्सा चेहरा. आणि तिसरी प्रियंवदा पाटील. हिचे केस इतके सुंदर कीं पहात बसावें घटकान् घटका. शिक्षकाऐवजीं चित्रकार असतों तर अमर केलें असतें हिचें सौंदर्य मी रंगांनीं. हिचे केस जशी मोराचीं गर्द निळीं मऊ पिसें. ती मृदुता, तो रंग, ती तकाकी. हिचे डोळे गहिरे आणि गोल. ओठ तर असे लोभस आणि मधुस्रावी कीं प्रियंवदा हें नांव अगदीं ईश्वरी पूर्व योजनेनें ठेवलें गेलेलें असावें, असेंच कुणाला वाटावें.

या तीन मुलींचा हेवा बाकीच्या मुली ज्या अनेक कारणांनीं करीत, त्यांत या दोघींचें सौंदर्य हेंही एक गुप्त कारण होतें.

सौंदर्यसमाधींतून कांहींसा जागा होत मी विचारलें, " कां, प्रियंवदा, कांहीं विचारायचं आहे वाटतें ? "

" हो—" ती म्हणाली, " पण रागावणार नाहीं ना सर ?"

" छ, विचार ना— ! "

" तुम्ही आमच्याशीं बोलत जाऊं नका. त्या मागाहून येताहेत ना त्या मुलींना आवडत नाहीं तें. "

" पण तुम्हांला आवडतं ना ? तुमची तक्रार असली तर पाहूं—"

" असं नाहीं, सर. पण उगीचच हेवा कां करावा त्यांनीं ? " प्रियंवदा मानेला नाजुकसा झटका देत म्हणाली. या झटक्यानें तिच्या मानेवरच्या शेपट्याला एक लहानसा झोका मिळाला. त्या वेणींत न आलेलीं मानेवरचीं कुंतलवलयें मजेदारपणानें हललीं. तर्जनी आणि अंगठा यांत पकडून कानावर निसटलेली एक बट पुन्हां माघारीं जागच्या जागी खोचण्याचा प्रयत्न केला तिनें आणि माझ्या उत्तराची वाट पाहूं लागली.

माझ्या मनांतून हा वाद खेळायचा नव्हता. मी म्हटलें, " बरं, बरं—बघूं, मग थांबूं या जरा. त्या पहा बाकीच्या मुली आल्याच जवळ—पण काय ग, तुमच्यापैकीं कुणी फराळाला कागद लागतील तर ते आणले आहेत का ? नाहींतर फराळ कशावर करणार तुम्ही ? "

ती चिमुरडी, पण प्रौढ दिसणारी पोर आपला प्रौढपणा विसरून एकदम उद्गारली, " हो, हो, सर—मी आणली आहे एवढी रद्दी. सर्वांना पुरेल."

" शाबास ! "

मी तिला शाबासकी दिली. मी विषय बदलला; पण मनांतून कांहीं तो गेला नाहीं.

थोडयाच वेळांत आम्ही विपिनेश्वराच्या आवारांत आलों. देवाचें दर्शन आणि इकडे तिकडे फिरणें झाल्यानंतर एका राईत आम्ही वर्तुळाकार बसलों.

मी एका ठिकाणीं त्या वर्तुळावर बसलों होतों. डाव्या हाताकडून मुलें होतीं व उजवीकडून मुली. मी मुलांना गाणीं म्हणायाला, नकला करायला विनंती केली आणि गाण्यांचा कार्यक्रम सुरूहि झाला. प्रथम सावंतनें कुठलें तरी एक सिनेमांतलें गाणें म्हटलें.

मी सर्व विद्यार्थ्यांकडे पाहिलें. शिकवतांना माझ्या मनांत काय विचार येतात ? मी प्रामाणिकपणानें आत्मनिरीक्षण करूं लागलों. आणि खात्रीनें माझ्या मनानें अशीच ग्वाही दिली कीं शिकवतांना बिलकुल पक्षपात करीत नाहीं. हा ब्राह्मणाचा मुलगा आहे, हा मराठ्याचा हा अंमलदाराचा, हा वकिलाचा, असा भेद शिकवतांना येत नाहीं. ही सुंदर मुलगी आहे, हा गोरागोमटा मुलगा आहे, त्यालाच पुन्हां पुन्हां प्रश्न विचार, त्याला गुन्हा माफ कर, असें करितां येत नाहीं. कुणी करीत असेल तें गैर आहे. आपला पाठ यशस्वी व्हावा म्हणून क्वचित् तपासणीच्या वेळीं हुशार मुलांच्या वांटणीस प्रश्न जास्त येतील. किंवा त्यांना त्यांच्या हुशारीमुळें अधिक वेळां बरोबर पाळी मिळेल, अवघड प्रश्नांचीं उत्तरें त्यांच्याकडूनच काढलीं जातील, तरीदेखील मठ्ठ विद्यार्थ्यांना पक्षपात होणार नाहीं. आणि आदर्श शिक्षक शिकवतांना गरीब-श्रीमंत, ब्राह्मण-महार, सुरूप-कुरूप हा भेद मनांत तर नाहींच आणीत.

या विचारांत मी डोकें वर काढून बघितलें, तेव्हां सरोज चव्हाणचें गाणें संपत होतें. गाणें संपतांच साहजिकच मी टाळ्या वाजवल्या. ही

सरोज दुसऱ्या म्हणजे मोठ्या गटांतील 'माझ्यावर पक्षपात करतो' असा आरोप करणाऱ्या गटांतील होती. तिला टाळ्या मिळतांच त्या गटाकडून तिचा गौरव झाला. आणि प्रियंवदाला वाटलें कीं मघाशीं तिनें सांगितल्याचा परिणाम म्हणून मी टाळ्या दिल्या. सरोजलाही समाधान झालें आणि प्रियंवदेलाही.

न कळत दोन गट दुखावले होते तसे नकळत ते सुखावत होते.

## प्रश्नांचा तास—

शिक्षकानें राजकीय पक्षाचा प्रचार करूं नये, फार तर त्याच्या ठिकाणीं पक्षनिष्ठा चालेल, अशा मनाचा मी आहें. पण त्याहिपेक्षां सत्य-निष्ठा अधिक असावी हें मी मानतों. इतिहास हा विषय असा आहे कीं येथें प्रचारी शिक्षकाला वाटेल त्या मतांचा प्रचार करतां येतो. कर-ण्याचा मोहहि त्याला होतो.

नारायणरावाच्या खुनाचा इतिहास मी परवां शिकवीत होतों. अर्थात् हा विवाद्य मुद्दा होता. मुलें प्रौढ होतीं. त्यांना त्या वेळची परिस्थिति निवेदन केली. त्याशिवाय नाना, बापू, यांचीं चरित्रें, स्वभाववर्णनेंही सांगितली, त्यासंबंधांत माझें मत सांगितलें. नाना व बापू यांची राज-कीय कामगिरी गौरवपूर्ण उल्लेखून नंतर त्यांच्या चारित्र्यांतील कलंकित कांहीं भागाचेंही दोषदर्शन घडवलें. आणि त्याच ओघांत पेशवाई इंग्रजशाहीच्या पुढे कां टिकाव धरूं शकली नाहीं, याचें विवेचन केलें.

माझ्या वर्गांत कांहीं मुलें कॉंग्रेसवादी होतीं आणि कांहीं कॉंग्रेसविरोधी तर कांहीं रा. स्व. संघांतील होतीं. एका मुलाला मी सांगितलेलें पटलें नाहीं. दर आठवड्यास मी एक तास प्रश्नांचा म्हणून राखून ठेवला वाटेल त्या विष-

यावर वाटेल ते प्रश्न विचारण्यास मुभा ठेवली होती. माझ्या मगदुराप्रमाणें मी उत्तर देई किंवा ज्या प्रश्नांवर विशेष माहिती, आंकडे, लागत ते प्रश्न मी नंतरच्या साप्ताहिक तासाला सांगें. ही पद्धत सामान्य ज्ञान वाढायला मदत करी.

त्या सप्ताहांत माझ्या त्या विरोधी भक्तानें माझ्यावर टीकेची झोड उठवली. त्यानें मला प्रश्न विचारले, " नाना, बापू, यांच्या चरित्रांची काळी बाजू कशाला सांगितली ? पेशव्यांच्या चुकांचें आतां चर्वण कशाला ? आमच्या मनांत ज्या व्यक्तींबद्दल आदर आहे तो ज्या टीकेनें नष्ट होईल ती टीका कां करतां ? "

मी म्हणालों, 'आदर अंधभक्तीवर असूं नये. खांडेकर, फडके, यांचे सर्व दोष माहिती असूनही त्यांच्यावर प्रेम करा. त्यांच्या भाषेचा अभ्यास करा. गांधी, नेहरू, यांच्या स्वभावाची माहिती असून त्यांच्या तत्त्वांचा पाठपुरावा करायला शिका. नानाबापूंचीं काळीं चरित्रें सांगितलीं, तीं त्यांच्याविषयीं आदर कमी करण्यासाठीं नाहीं; त्यांच्या दोषांपेक्षां गुण मोठे आहेत, हें दाखवण्यासाठीं. पेशव्यांच्या चुकांची आवृत्ति त्या पुन्हां होऊं नयेत म्हणून. सत्याला धरून शिकावयाचा इतिहास, तो निःपक्षपाती तिऱ्हाइतीपणानें शिकवावयाचा, आणि त्यांतून निर्भेळ राष्ट्रवाद किंवा ध्येयवाद तुमच्या मनांत पेरायचा, ह्या तीन गोष्टी म्हणजे तारेवरचा नाच आहे ! शिक्षकाला अवघड व टीकारांना टीकासुलभ असा प्रकार आहे हा !"

कुणास ठाऊक त्या मुलांचें समाधान झालें कीं नाहीं तें. पण माझ्या वाचकांचें होईल अशी आशा वाटते.

दुसऱ्या एकानें शंका विचारली, " टिळकांनीं शाळा काढली, यांत मोठेंसें काय झालें ? वास्तविक शिक्षण देणें हें सरकारचे काम टिळकांनीं आपल्यावर कशाला ओढून घेतलें ? "

शिक्षण देणें सरकारचें काम होतें; पण १८८० सालीं तें महाग होतें, अवघड होतें. टिळकांनीं तें स्वस्त व सुलभ केलें. सरकारी चाकोरींत जी सत्त्वहीनता होती, ती काढून तें जरा स्वाभिमानी व राष्ट्रीय केलें. आज जमाना बदलला आहे. सरकामध्यें फरक पडला आहे. आपलें सरकार स्वस्त, सुलभ व राष्ट्रीय शिक्षण देत असेल, तर खाजगी शाळांची आवश्यकताच नाहीं. टिळक असते तर त्यांनीं न्यू इंग्लिश स्कूल सरकारच्या हवालीं केलें असतें. सर्व शिक्षण राष्ट्रीय करण्याची करण्याची चळवळ केली असती."

आणि तिसऱ्या एका विद्यार्थ्यानें विचारलें, "सर, सगळ्यांना सारखी फी कां? या विद्यार्थ्याचा बाप लक्षाधीश आहे आणि याचा बाप गरीब शेतकरी आहे. दोघांनाही ४ रु. फी ही समानता कीं, विषमता अन् अन्याय?"

"एवढयाच साठीं तर मी म्हणतों कीं सारें शिक्षण अगदीं फुकट असावें म्हणून. श्रीमंतांना जास्त फी अन् गरिबांना कमी असाहि मार्ग आहे दुसरा. पण गरिबीवर, श्रीमंतीवर, म्हणजे उत्पन्नावर फी ठेवली तरी मूळ अन्याय नष्ट होणार नाहीं. कुणाला एक मुलगा असेल, कुणाला चार असतील. चार मुलांच्या गरीब बापाला ४० रु. पगार आहे, त्याला ४ रु. फी पडेल समजू या. दुसऱ्या एका मुलाच्या बापालाही ४० रु. पगार आहे, त्याला १ रु. म्हणजे अधिक मुलें असलीं कीं त्याचे तोटे भोगावे लागणार! यापेक्षां सगळाच शिक्षणाचा खर्च सरकारनें करावा. प्राप्तीवरील करासारखा प्राप्तीवर अवलंबून असलेला एखादा शिक्षणकर ठेवावा. म्हणजे समानसंधी मिळेल सान्यांना. सिलोन व हैद्राबादमध्यें प्राथमिक व दुय्यम शिक्षण फुकट आहे!"

एका विद्यार्थिनीनें मला विचारलें, 'सर, प्रेम करणें सोपें का प्रेम

करून घेणें सोपें ?" ( तुमचा विश्वास बसणार नाहीं—पण एका विद्यार्थिनीनें खरोखरीच हा प्रश्न अगदीं साध्या मनानें विचारला. )

" प्रेम करणें हें फार अवघड आहे. प्रेम करणें म्हणजे एकच ध्यास, एकच निष्ठा बाळगणें. त्या एकासाठीं पराकोटी सुखांचा त्याग करण्यास तयार होणें, दुःख सहन करणें. संगीतावर माझें प्रेम आहे म्हणजे त्या कलेसाठीं माझें अष्टौप्रहर जीवन, सारी संपत्ति वेंचायला मी तयार आहें. संगीतासाठीं ती तन-मन-धन वेंचायला तयार होणें, हें अवघड आहे. कारण चंचल मन, सुखलोलुप इंद्रियें आणि अन्य स्वार्थ यांना एका संगीतकलेशीं बांधतां येत नाहीं. प्रेम करून घेणें म्हणजे दुसऱ्याचें प्रेम जिंकणें असेल, तर तें अवघड आहे. पण एरवीं तें अकारण, जनान्तर सौहृदांतून जन्मलेलें, कोऽपि आंतरिक हेतूनें लाभलेलें असतें. आईचें प्रेम लाभतें—आईसाठीं कांहीं फारसें केलें नाहीं तरी—"

त्यावरून विचार आला, शिकणें अवघड कीं शिकवणें ? आणि उत्तर आलें शिकणें. शिकणें म्हणजे नव्या प्रांतांत जाणें. कुणाची मदत असेल, नसेल. पुस्तकें, शिक्षक, दीपिका, साहित्य मिळेल, मिळणार नाहीं. एकलव्याची निष्ठा दुर्मिळ आहे. उलट शिकवणें सोपें. असेल त्यांतलें थोडें शिष्याला द्यायचें. चार वर्षांचा मुलगा तीन वर्षांच्या मुलाला कांहीं गोष्टी शिकवतोच. एकानें गमतीनें लिहिलें आहे, ज्याला कांहीं येतें तो करून मोकळा होतो, ज्याला तें येत नाहीं तो दुसऱ्यांना शिकवूं लागतो, ' तें असें करावें, तसें करावें ' म्हणून. विनोदाचा भाग सोडला तरी त्यांत तथ्य आहे खास. शिवाय शिक्षणाच्याहि मर्यादा असतातच. तेथें गुरू सांगतो—जा, बाबा. येथून पुढले साक्षात्कार तुमचे तुम्ही घ्या. शिकण्याला कुठें मर्यादा आहेत ! तें कुठें कधीं संपतें !

## शिक्षकानें हरतऱ्हेनें समाजाशीं संबंध जोडावा—

डॉक्टरचा संबंध जगांतील श्रीमंत, गरीब, सर्व वर्गांशी येतो. त्यांत कांहीं गांजलेले असतात. कांही नकोत तीं पापे करून शुश्रूर्षार्थ डॉक्टराकडे आलेले असतात. कांहीं लबाड, कांहीं सरळ, अनेक तऱ्हेच्चीं माणसें भेटतात त्याला. वकिलाचेंही तेंच म्हणतां येईल. व्यापाऱ्यांचे, पोलिसांचे, आणि सरकारी छोट्यामोठ्या अधिकाऱ्यांचे बाबतीत तेंच म्हणतां येईल. त्यांच्या जीवनाचें क्षेत्र विशाल रहातें. हरतऱ्हेचे अनुभव त्यांना येतात. त्यामुळें ते सारे लोक अनुभवी होतात, व्यवहारी होतात.

बिचाऱ्या शिक्षकाचा संबंध येतो तो मात्र बालकांशीं. या छोट्या समाजांत लबाडी आणि गुन्हेगारी कमी. तेथील लबाडी असली तर अगदीं वेगळ्या स्वरूपाची आणि किरकोळ. कुणी पेन्सिल चोरली तर कुणी दांडगाई केली. बऱ्याच मोठ्या प्रमाणांत निष्पाप आणि पवित्र वातावरणांत शिक्षक वागत असल्यामुळें खऱ्या आणि मोठ्या जगाचे अनुभव त्याला विशेष येत नाहींत आणि तो फसतो. बाहेरच्या जगांत शिक्षक अनभिज्ञ व बावळट ठरतो, याचें हें एक महत्त्वाचें कारण आहे असें मला तरी वाटतें. आणि या दोषापासून शिक्षकाला जर मुक्त व्हावेंसें वाटत असेल, तर मोठ्या जगांत येण्याची संधी त्यानें वारंवार घेतली पाहिजे. ती सेवकाच्या द्वारां मिळाली कीं सोन्याहून पिवळें होईल. हिंदीचा प्रचार व साक्षरता-प्रसार या गोष्टी त्याच्या धंद्याला अनुषंगिक आहेत. याशिवाय सामाजिक कार्य करणाऱ्या वाचनालय, साहित्यसंस्था, यांमध्यें त्याला शिरकाव करून घेतां येईल. निरनिराळे छोटेमोठे संघ, भाडेकरू संघ, लहानलहान कामगार संघ, अशांमध्यें त्यानें भाग घेऊन वैशिष्ट्यपूर्ण काम जरूर करावें. बँका, सहकारी संस्था, स्थानिक स्वराज्यसंस्था, यांतही भाग घेणें शक्य झाल्यास त्यानें घ्यावा. त्याचें कुठलेंही कार्य शाळेच्या वेळेवर किंवा कामावर अनिष्ट

परिणाम करीत नसेल तर समाजदेखील फार करून कुरकुर करणार नाहीं. निदान त्यानें कुरकुरूं नये अशी माझी अपेक्षा आहे.

हल्लींच्या शिक्षण-पद्धतींत शिक्षकाकडे फार मोठें जबाबदारीचें सोंपवलेलें काम यशस्वी रीतीनें पार पाडण्याची शक्यता फारच कमी झालेली आहे. नवीन पिढी तयार करणें, बालमनांना सुसंस्कृत करणें, वगैरे पूर्वीची ध्येयें आज अधिकच दुष्प्राप्य झालीं आहेत. हॅरो, ईटन, वगैरे शाळा परंपरा निर्माण करूं शकल्या. एक तर तेथें २४ तास विद्यार्थी शिक्षकांसमवेत रहात असतात. पब्लिक स्कूल आणि गुरुकुलें यांत विद्यार्थ्यांचें शील बनवणें अधिक शक्य असतें.

पण आज विद्यार्थ्यांना समाजजीवनासाठीं वा भावी राष्ट्रासाठीं उत्तम नागरिक बनविणें शिक्षकाला अशक्य होऊन बसलें आहे. शिक्षक व विद्यार्थी एकमेकांच्या सहवासांत असतात, ते म्हणजे दिवसाकाठीं जास्तींत जास्त ५ तास. वरच्या वर्गांतून तर विद्यार्थी व शिक्षक यांचा आठवड्यांत सहवास घडणार कमींतकमी ७० मिनिटें, जास्तींत जास्त ६ तास! अनेक शिक्षकांच्या अनेक तऱ्हांचीं प्रतिबिंबें बालमनावर पडण्याची जेथें शक्यता, तेथें शिक्षक किती आणि कसला आकार देणार त्याला ?

एखाद्या शाळेचा विद्यार्थी हुशार निघाला, कीर्तिमान झाला तर त्याच्या शिक्षकांचा व शाळेचा गौरव केला जातो. यांत बराचसा अर्थवाद आहे हें शिक्षकानी लक्षांत ठेवावे. त्या विद्यार्थ्याला दिलेल्या ज्ञानाबद्दल अंशतः श्रेय तसे विशेष कष्ट त्या विद्यार्थ्याबद्दल घेतले असल्यास शिक्षकानें वाटल्यास स्वतःला किंवा शाळेला घ्यावें. परंतु त्याचें शील त्यानें कितीसें बनवलें असेल ? त्या आठवड्यांतील ८।१० तासांच्या सहवासांत शिक्षकाच्या हाताखालून गेलेले कित्येक विद्यार्थी पुढें काळा बाजार करणारे, व्यभिचार करणारे व दुर्गुणी नागरिक झाले असतील—त्याचें अपश्रेय हेंही शिक्षकांनीं उचलायला हवें. पण तसें कुणी देत घेत नाहीं.

फक्त माहिती, नियम, सनावळ्या, लेखनादि कांहीं गोष्टी त्यांनीं विद्यार्थ्यांच्या मेंदूत कोंबल्या. कांहीं विद्यार्थी चांगले निघाले, कांहीं वाईट. शिक्षक व विद्यार्थी यांचा सहवास घडतो तोही कृत्रिम वातावरणांत. अशा वातावरणांत मुलांच्या अंतरंगांतले गुणदोष दिसूनही येत नाहींत. वर्गांत ३०।४० मुलें तरी असणार. प्रत्येकाकडे शिक्षक किती वेळ लक्ष देऊं शकणार आहे ?

खरें गृहशिक्षण महत्त्वाचें. धर्माचीं व आचरणाचीं उदात्त तत्त्वें आईबापांनीं घरीं शिकवायला हवींत. पण आज काय होतें पहा.

तिकिटांच्या रांगेंत उभें रहायला नको म्हणून स्त्रियांना पुढें करून पुरुष आपलें काम साधतात. घरांत एखादा जिन्नस असूनही खुशाल नाहीं असें आपली आई शेजारणीला सांगते. लहान मुलांच्या डोळ्यांदेखत बाप दोन पैशांची काड्याची पेटी दीड आण्याला विकत घेतो. किंवा मुलाच्या देखत बाप आपल्या कोठारांतून साखर काढून चौपटीनें अडलेल्या गिऱ्हाइकाला विकतो. लहानसहान गोष्टीसाठीं, अनवश्यक वस्तूसाठीं, मोठीं माणसें खुशाल दुसऱ्याजवळ दीनपणें भिक्षापात्र पुढें करतात. त्यांत त्यांना लाज वाटत नाहीं. पैपाहुणा म्हणजे संकट वाटतें. आतिथ्यादर तर संपूर्ण नष्ट झाला आहे.

कदाचित् सध्यांच्या महागाईचा हा अनिष्ट परिणाम झाला असेल; पण न जाणों याचे कांहीं परिणाम दीर्घकाल टिकतील अशी मला साधार भीति वाटते. समाजांतील नैतिक मूल्येंच घसरलीं आहेत.

शिक्षक वर्गांत शिकवील " खरें बोलावें. गरिबांना मदत करावी. अतिथि-अभ्यागताचा सत्कार करावा. शेजाऱ्यावर उपकार करून शेजारधर्म पाळावा. दुसऱ्याजवळ 'दीनमुख पसरोनि' मागूं नये. स्वाभिमानानें रहावें." याचा परिणाम, या कोरड्या उपदेशाचा परिणाम तरी काय होणार ? स्वतः शिक्षक तरी या परिस्थितींतून वेगळा राहून आदर्श सांगूं लागला तर थोडा फार परिणाम होईल. शिक्षकाला भरपूर वेतन, त्याच्या

गरजा भागविणारें, काळा बाजार करण्याची आवश्यकता न उरलेलें असेल, तर कदाचित् अंशतः पटेल तें मुलांना. एरवीं नाहीं. आणि जोंवर शिक्षक सर्व समाजाहून रहाणीनें, दर्जानें, वेगळा असा आपण पवित्र आदर्श ठेवलेला नाहीं, व त्याला तसें रहाणें सर्व सवलती देऊन भाग पाडलेलें नाहीं, तोंवर नव्या पिढीच्या नीति-शिक्षणाची जबाबदारी शिक्षकावर नाहीं. जोंवर बाहेरचे पक्ष व लोक जातीयतेचें राजकारण खेळत आहेत, काळ्या बाजारांत लडबडलेले आहेत, तोंवर एकटा शिक्षक लोकशाहीच्या उदात्त व सत्यन्यायनीतीच्या पवित्र ग्रंथाची कितीही पारायणें विद्यार्थ्यांच्या पुढें करीत बसला तरी तें सारें निष्फळच होणार! नाहीं का?

अर्थात् नव्या पिढीचें नैतिक जीवन व त्यांतील मूल्यें घसरगुंडीला लागलीं असलीं तरी शिक्षकानें त्याच्या मगदुराप्रमाणें त्या प्रवाहाच्या विरुद्ध, सत्प्रवृत्तीच्याच दिशेनें पोहणें हें त्याचें कर्तव्य आहे. त्याला आपलें कार्य केलेंच पाहिजे. या काळ्या बाजाजाराच्या जगांत त्याच्या वागण्या-विचारांची ही एकच मिणमिणती पणती आशावती आहे.

या पणतीचें तेज शिक्षकानें मोठ्या जगाच्या व्यापक अनुभवानें व सेवेच्या कार्याच्या तपश्चर्येनें वाढवलें पाहिजे. समाजाचें पुढारीपण जेव्हां अशा श्रेष्ठ शिक्षकाकडे येईल, तेव्हांच समाजाचा खरा उद्धार होईल.

## मला एक शिकवणी मिळाली!

आज सकाळीं एका प्रतिष्ठित गृहस्थाची चिठ्ठी आली. मला भेटायला बोलावलें होतें. तें कशासाठीं, याचा अंदाज मला आला. हे दिवस शिकवण्यांचे. त्या गृहस्थांची मुलगी आमच्या शाळेंत होती. ते गृहस्थ गांवांतील प्रसिद्ध डॉक्टर. आमच्या शाळेंतील सल्लागार-मंडळांत त्यांचें मोठें वजन होतें. गांवांत कॉंग्रेस-विरोधकांचा ते आधारस्तंभ होते. घरीं लक्ष्मी पाणी भरीत होती. गांवांत प्रायमरी स्कूल चांगलें नव्हतें. आमच्या शाळेशिवाय स्वतंत्र-

पणें चालवलेली शाळा अशी ही एकच. म्हणून अशीं थोरामोठ्यांचीं मुलें आमच्या शाळेंत यायचीं. मी पोशाख केला. शाळामास्तराचा गरिबी पण स्वच्छ व नीटनेटका पोषाख केला. हो; हें मुद्दामच सांगतों आहे मी. मास्तर बावळट दिसतो. रोजीं दीड रुपया मिळवणाऱ्या डॉक्टरलाहि पोझिशनसाठीं सुटाबुटात रहावें लागतें. वकिलालाहि बाहेरचा भपका बराच करावा लागतो. शिक्षकाचा धंदा पडला पोरासोरांशीं. त्यालाहि पोशाखाची काळजी घ्यावीशी वाटत नाहीं, ती एट त्याला परवडतहि नाहीं—किंवा समाजाच्याहि काहीं विशेष अपेक्षा नाहींत, कीं शिक्षकानें अमुक एक पोषाख करावा म्हणून. युनिव्हर्सिटीच्या पदवीधराला काळा पदर—काळी पिशवी घेऊनच पदवी घ्यावी लागते. प्राध्यापकासाठीं एका काळीं आणि कांही ठिकाणीं अजूनही—गौन—झग्याची अपेक्षा बाळगली जाते. शिक्षकाच्या पोशाखाबद्दल शाळाखात्यानें आणि समाजानें कां नियम करूं नयेत ? पोषाखांतील बावळटपणा काढून टाकून मी डॉक्टरसाहेबांच्या घरीं पोहोंचलों.

डॉक्टरांची दवाखान्यांत जाण्याची वेळ झालेली दिसत होती. त्यांनी आपला पोषाख चढवला होता. कोटांतून त्यांचा स्टेथास्कोप—त्याचा धंदा—डोकावत होता. मधल्या घरांत टेबलावर डॉक्टर 'नाश्ता' करीत होते. मी नम्रपणें नमस्कार करून आंत गेलों व जरा दूर असलेल्या खुर्चीवर बसलो. दोन्ही गालांत कोंबलेलीं बिस्किटें दाबीत मिटल्या तोंडानें डॉक्टरानीं माझं खुणेनें स्वागत केलें. चहाचा कप तोंडाला लावून त्यांनीं प्रथम तो तोंडातला घास खाली लोटला आणि जरा घसा साफ करून मला म्हणाले,

"माझी मुलगी सातवींत आहे—तिला तुमची शिकवणी—तितक्यांत कुणीतरी आलें. डॉक्टरांचें वाक्य अपूर्ण राहिलें. प्रश्नार्थक चेहऱ्यानें त्यांनीं बाहेरच्या दालनाकडे बघितलें. डॉक्टरानीं मनांत तरी माझ्याशीं फक्त मुद्यापुरतेंच बोलायचें ठरवलें होतें. ऊँ! मास्तरशीं काय बोलायचें

असं त्यांना वाटलं असावं—पण कदाचित् माझाच हा गैरसमज असेल. ही काय बोलत बसायची वेळ होती ? त्यांतून डॉक्टर दवाखान्याकडे निघालेले. एरवीं व्याख्यानें व गप्पाष्टकें झोडणार डॉक्टर—पण जाऊं द्या. त्या दालनांतून एक विलायती पोषाखांतील गृहस्थ आंत आले. त्यांच्या गप्पांना सुरुवात झाली. नवे गृहस्थ येण्याबरोबर डॉक्टरांच्या गड्यानें टेबलावरच्या कपबशा आंत नेल्या. तो गृहस्थ अर्धातास गप्पा करीत होता. त्या गृहस्थाचें खास असें कांहीं काम दिसलें नाहीं. संघकार्याबद्दल तेंच तेंच बराच वेळ एरंडाचें गुऱ्हाळ चालवल्यावर व तें करतां करतां ७।८ सिगारेट्स् फस्त केल्यानंतर तो गृहस्थ उठला. माझी आठवण त्या अर्ध्या तासांत कुणालाहि नव्हती. मी खोलींतील चित्रें व फर्निचर पहात बसलों होतों. माझी त्यांना अडगळ वाटली नाहीं. मध्यें मी एकदां खांकरलों. पण डॉक्टरांनीं दुर्लक्ष्य केलें. तो माझा अपमान होता. मी तेथून उठून गेलों नसतों का ? पण मोटी शिकवणी सोडावी लागली असती. लाचारीनें बसलों झालें. तो गृहस्थ गेल्यावर माझ्याकडे वळून डॉक्टर म्हणाले— "मग येत जा, उद्यांपासून." मी जरा घुटमळलों. डॉक्टर लगबगीनें उठले. मीहि उठलों. "अरे भिमाशंकर—माझा चष्मा— !" कोटाचा वरचा खिसा उजव्या हातानें चांचपत डॉक्टर उद्गारले. मी अजून जरा बुजतों आहें असें पाहून तेच पुढें म्हणाले, "कां—आमच्या प्रभीलाच पाठवूं तुमच्या घरीं ? किती पोरं येतात घरीं ? तुम्हां लोकांची चैन आहे बुवा. एकेका तासाला ७।८ पोरें जमवून ८०।८० रुपये मिळवीत असाल. वेळहि नसेल. सकाळीं ४ पासून रात्रीं १०।११ पर्यंत चालू आहे—काय ? खरं आहे ना ? (डॉक्टर मला बोलूं कुठें देत होते !) तेव्हां तसं नकोच. तुम्हचि या. गणित, मराठी, सारें सांगायचें. पोरगी हुशार आहे. वर नंबर आला पाहिजे. किती पैसे द्यायचे ?"

आतां डॉक्टरच बोलून दमले म्हणून थांबले. मी म्हणालों, "मी ३० रुपये घेतों." "काय तीस ?" जन्मांत इतकें मोठें आश्चर्य त्यांनीं ऐकलें

नसल्यासारखा चेहरा केला. "प्राथमिक शाळेंतला मास्तर तीस रु. मागतो ? अरे वा!–" आतां आश्चर्य ओसरूं लागलें. जरा नेहमींच्या मनः-पातळीवर आले; पण लगेच त्या मनानें रागाकडे झोका घेतला. "तुम्हांला कांही वाटत नाहीं का वाटेल तो आंकडा सांगायला ?" डॉक्टरांचा स्वर उंचावला होता. मला वाटलं आतां माझी धडगत लागत नाहीं; पण पुन्हां माझें नशीब माझ्या मदतीला धांवून आलें.

एक मध्यम वयस्क गृहस्थ दारांत उभे होते. जरा घाबरे व दीन दिसत होते. कपाळावर घाम थबथबला होता–तो टिपण्याचें त्यांना भान नव्हतें. "मी बोलवायला आलों आहे–घरीं बायको प्रसूतिवेदनांनीं घाबरी झाली आहे. येतां ? कसब्यांत आहे, त्या पिंपळाच्या झाडाशेजारच्या भटांच्या वाड्यांत–टांगा आणला आहे—" किती नम्र दिसत होता. मला दया आली. "तुम्ही याच गांवचे का ? भटांच्या वाड्यांत नवे बिऱ्हाडकरू ते तुम्हीच दिसतां–" गृहस्थ आशेनें पाहूं लागला. इतकी आस्था, विचारपूस! बिनचूक माहिती ! त्यामुळें त्यालाही आपलेपणा वाटूं लागला असेल. त्या बिचाऱ्याला हें कुठें ठाऊक होतें की संघांत अशी माहिती जमा होत असते तें! डॉक्टर बोलत होते, "मी तीस रुपये घेतों आहे ना ठाऊक ?" "काय तीस ?" आश्चर्य पण दुःख व असाहायता यांनी भारावलेलें मन त्या शब्दांत पूर्ण व्यक्त झालें होतें. त्यानें खिसा चांचपला. जराशी खिन्नता पसरली. शून्यांत त्याने क्षणभर पहिलें. त्यांत त्यानें कदाचित् घरीं तडफडणारी पत्नी पाहिली असेल आणि ती डॉक्टरांच्या क्रूरतेच्या पार्श्वभूमीवर अधिकच–पण विचार करायला वेळ होता कुठें ? एक सुस्कारा टाकला त्यानें. नेत्रांच्या ओला-वलेल्या कडा पुसल्या त्यानें. "बरं, चला डॉक्टर—" तो पुढें झाला. डॉक्टर ओरडले, "भिमाशंकर, व्हिजिट बॅग घे–चल–आण लवकर." आणि माझ्याकडे वळून ते म्हणाले, "हं–जा आतां उद्यांपासून सकाळीं

येऊं लागा. प्रभा आतां बाहेर गेली आहे. उद्यां ८ वाजतां भेटेल. वेळ टरवा कोणती ती. नियमित यायला पाहिजे हं—अच्छा."

डॉक्टरांची बॅग भिमाशंकरनें टांग्यांत ठेवली होती. डॉक्टर बाहेर पडले आणि मीही. डॉक्टरांनीं एका अडल्या वेळेच्या मदतीची किंमत ३० रु. घेतली. त्यांच्या एका व्हिजिटमध्यें माझा महिना भागला. त्यांनी ३० च व्हिजिट फी कशी ठरवली? २५ वा ३५ कां नाहीं? आणि मी तरी ३० कां सांगतों? मी शिक्षक होण्यासाठीं केलेला खर्च, माझे श्रम, माझी गरज, माझें महत्त्व, गिऱ्हाइकाची गरज, वेळेचें मोल, अशा अनेक गोष्टी आहेत. असो. आज ३० रु. ची एक शिकवणी तर लागली. पाहूं. उद्यांपासून एक नवा अनुभव मिळणार आहे.

पण आज झोंपतांना मात्र मनाला रुखरुख लागली होती कीं मी तीस कां मागितले? माझा विचार न करतां डॉक्टरांनीं आश्चर्य दाखवावें आणि रागवावें कां?

## शिकवणीच्या चतुःसीमा—

काल ठरल्याप्रमाणें मी आठ वाजतां डॉ. भिडे यांच्या घरीं गेलों. शिकवणीसाठीं एकादी वेगळी खोली असेल असें वाटलें होतें मला. पण माझा अंदाज चुकला. प्रभादेवीच्या प्रशस्त खोलीतच मला नेऊन बसवण्यांत आलें. शिकविणींचे नानाविध प्रकार—दोन चार मी अनुभवले होते. एकदां मी एका सावकाराकडे जात असें. शिकवणी होती चौथींतल्या मुलाला. परंतु त्याब्ररोबर दुसरींतील त्याचा भाऊ बसे. त्यालाही सांगावें लागे. इंग्रजी चौथींतल्या थोरल्या भावाच्या गणितांतल्या अडीअडचणी असत, त्याला मदत करावी लागे. आणि सगळ्यांत छोटी सहा महिन्यांची छबी घरांत रडते म्हणून शिकवणी चालू असतांना संभाळावी लागे.

माझ्याजवळ खुशींत रहायची. बाईसाहेबांची प्रसन्न दृष्टि कधीं मधीं वळे. त्यामुळें—फक्त एवढेंच कीं त्याचा फायदा म्हणून एकादा कप चहाहि कधीं मिळाला नाहीं. उलट पुष्कळदां बाईसाहेब म्हणत, " मास्तर—येतांना मंडईकडूनच येतां ना तुम्ही? मग उद्यां न विसरतां तेवढें हें आणा. हं— पैसे देईन मी मागाहून." ही शिकवणी मी अगदीं अल्पावधींतच सोडून दिली हें सांगायला नकोच.

प्रभादेवी स्नानास खालीं गेल्या होत्या. त्यांची वाट पहात बसणें भाग होतें. एका नाटककारानें मुलींची शिकवणी करणाऱ्या मास्तराची चेष्टा केली आहे. तो म्हणतो, मुलांना शिकविणारे शिक्षक घड्याळाकडे पहात शिकवतात तर मुलींना शिकवणारे मुलींच्या चेहऱ्याकडे पहातात. नाटककार मास्तरच होता, त्यानें स्वानुभवावरून लिहिलें असेल. नाहीं तर मी त्याला उत्तर दिलेंहि असतें. खोली चांगली शृंगारलेली होती. एका बाजूला मच्छरदाणीसह मोटा लाकडी पलंग होता. मध्यें एक गोल मेज व तीन चार खुर्च्या होत्या आणि दुसऱ्या कोपऱ्यांत टॉयलेटचें टेबल होतें. हर-तऱ्हेचीं सौंदर्यप्रसाधनें त्यावर मांडलीं होतीं. अभाव होता पुस्तकांचा. कांहीं नटनटींचे फोटो भिंतीवर टांगलेले होते.

सुमारें दहा मिनिटांनी प्रभा आंत आली. प्रभाचें वय असेल १५।१६ चें. श्रीमंतींत व बेफिकिरींत वाढलेलें शरीर होतें. वर्ण गोरा होता. स्नान नुकतेंच झालें होतें. कानाजवळ असलेल्या केसांचा ओलसरपणा अजून गेला नव्हता. एखादें कमळ पाण्यांत बुचकळून बाहेर काढावें तशी तिची देहलता दिसत होती. ती आरशासमोर उभी राहिली. डाव्या उजव्या हातानें, कपाळावर उतरलेल्या बटा दूर सारल्या आणि नाजूक हाताच्या निमुळत्या तर्जनीनें कपाळावर एक सुरेखशी कुंकवाची टिकली टेकविली. मुग्धाबालासदृश तिचें वर्तन निःसंकोची, निरागस होतें.

पण मी वर्णन करतों आहें हें शिक्षकाला शोभण्याजोगें होतें का?

शिक्षकानें शिष्येचें असें वर्णन करायचें—अशोभ्य-असंमत, सदभिरुचीला सोडून तर नाहीं ना होणार? मास्तर हा चोवीस तास मास्तर असला पाहिजे. प्रेम, सौंदर्य, आणि तशा सुखद नाजुक गोष्टी त्याला सदैव वर्ज्य असल्या पाहिजेत, असें कुणी कुणी म्हणतात. असें कधींच शक्य होणार नाहीं. मला वाटतं शिक्षकाच्या भूमिकेंत म्हणजे शिकवणाऱ्याच्या खुर्चीत तो बसेल तेव्हां तो शिक्षक आहे आणि एरवीं तो सामान्य व सन्मान्य नागरिक आहे. आमच्या गांवांतले एक शिक्षक ते आपल्या पत्नीला घेऊन फिरायला जातात म्हणून टीकेचा विषय झाले होते. तर दुसऱ्या एखाला ४ आण्यांत सिनेमा पाहण्याच्या त्याच्या कृतीवर टीकेचा भडिमार सहन करावा लागला होता.

कांहीं एक कारण नसतां समाजानें मास्तरची एक वेगळी जातच कल्पिली आहे. आणि खोट्या चमकदार तत्त्वज्ञानाचीं वलयें, वागणुकीचीं बंधनें त्यावर जडवलीं आहेत. मास्तर हा कुणी कांहीं वेगळा प्राणी नाहीं. हा कांहीं जन्मजात गुणदोषांनीं जखडलेला नाहीं. एका परिस्थितींत तो मास्तरकी पत्करतो आणि अगतिकपणें तो मास्तर म्हणूनच राहतो. तो मास्तर झाला म्हणून स्वःतःचीं मतें, आवडीनिवडी तो टाकूं शकत नाहीं. नव्हे, त्यानें ती टाकूंही नयेत. काव्यांत फक्त शकुंतलेचें चित्र त्यानें रंगवावें, वाचावें; क्रमिक पुस्तकांत येणारीं सौंदर्यवर्णनें व भावना, विविधता अनुभवावी—प्रत्यक्ष स्त्रीसौंदर्याची मूर्त आविष्कृति पुढें राहिली तर मात्र त्यानें तें बोलूं नये, तें अनुभवूं नये. कारण तो मास्तर आहे आणि त्यानें असें कांहीं करणें अभिरुचीस मारक ठरेल म्हणे!

माझ्यासमोर प्रभा येऊन बसली. ती माझी शिष्या होती व मी तिचा शिक्षक. शिक्षक-शिष्या या संबंधाचा फायदा घेऊन त्यांतून दुसरें एखादें नातें स्वार्थी बुद्धीनें जोंवर मी बळेंच निर्माण करीत नाहीं, तोंवर शिक्षकाच्या बैठकीवरून मी ढळत नाहीं, तोंवर मी कांहीं गैर करतों आहे असें नाहीं मला वाटत. शिक्षकांचीं लग्नें कधीं कधीं त्यांच्या विद्यार्थिनींशीं होतात.

तर कधीं कधीं अनैतिक प्रेम त्या दोघांत जुळूं लागतें. बौद्धिक साहचर्याच्या भुकेचें वेष्टन त्यावर चढवलें जातें. त्या तशा सर्व प्रकारांचें मला समर्थन करावयाचें नाहीं. फक्त एवढाच मुद्दा विचारार्थ पुढें मांडावयाचा आहे कीं समजा. एखाद्या शिक्षकानें त्याच्या शिष्येचें अंगवर्णन केलें किंवा सौंदर्याच्या शोधांत तो सामान्य सभ्य गृहस्थाप्रमाणें वागला आणि तेंही शिक्षकाच्या भूमिकेंत तो ज्या वेळीं नसेल त्या वेळीं; तर मी म्हणतों त्यांत कुठें बिघडलें ?

प्रभा माझ्या समोरच्या खुर्चीवर बसली. प्रथम मी तिच्या अभ्यासाची सर्वसाधारण चौकशी केली. वास्तविक इंग्रजी शिकायचें सोडून ती प्रायमरीच्या सातवींत कां, याचेंही मला नवलच वाटलें. मी त्याबद्दल तिला विचारलेंहि. गेल्या वर्षापर्यंत तिच्या आजीचा शाळेंत जाण्यालाच व त्यांत इंग्रजी शिकण्याला विरोध होता. आतां ती आजी वारल्यामुळें पुढल्या-वर्षी एका वर्षांत तीन यत्ता करून इंग्रजी हायस्कुलांत जाण्याचा तिचा विचार होता.

दोनचार प्रश्नोत्तरांत प्रभा बुद्धीनें अत्यंत तल्लख असल्याची खात्री झाली. शिकवणींत हिच्यासारख्या मुली आणि मुलें फार थोडीं. शिक्षकांना शिकवणीच्या वेळीं अगदीं दगड आणि गोटे घेऊनच बसावें लागतें. त्या दगडावर फारच थोडा परिणाम होत असेल त्या अभिषेकाचा. हुशार विद्यार्थी कशाला शिकवणी ठेवतो? पास होण्यासाठीं लांच म्हणून लावलेल्या शिकवण्यांत शिक्षकाचेंही आर्थिक समाधानापेक्षां दुसरें कसलेंही समाधान होत नाहीं. शिकवण्या करण्यांत शिक्षकाला बौद्धिक श्रमहि घ्यावे लागत नाहींत. शाळेंत जे अभ्यास झाले असतील त्यावर चक्कू ताड्या घोट्या—संभाव्य अन् अगदीं खास महत्त्वाचे प्रश्न सांगणें—खटपट अधिक, योग्यता व कष्ट कमी, असा कांहीं चमत्कारिक प्रसंग असतो शिकवणी म्हणजे. शिकवण्या करण्यांत कसलीहि गंमत नाहीं हं. आतां प्रभासारखे हुशार विद्यार्थी भेटले तर थोडें समाधान वाटेल, इतकेंच.

प्रभाला उद्यांचा अभ्यास नेमून दिला. उद्यांची वेळ ठरवली. इतक्यांत नवाचे टोले पडले. मी उठलों. पहिलाच दिवस होता. कदाचित् मी १० मिनिटें अगोदरच उठण्याचें ठरवलेले होते; त्या मानानें उशीरच झाला. पण आजचा कार्यक्रम संपला म्हणून उठलो. इतक्यांत–

व्हरांड्यांत नेकटॉयची गांठ मारता मारतां तोंड वेडंवांकडे वळवीत डॉक्टर उपस्थित झाले. "काय निघालांत ?" डॉक्टर म्हणाले, "भारी बुवा नियमित. नवाच्या ठोक्याला उठलांतच की !" डॉक्टरांचा बेसूर टोमणा खिशात टाकला आणि पुढें सटकलों. मुलीला शिकवीत जास्त वेळ बसलों असतों, तर त्या मघाच्या नाटककाराची री डॉक्टरांनी ओढली असती. ठराविक वेळेला उठलों तरी उपहास वांट्याला आला अन् अगोदर उठलों असतों तर कामचुकार ठरवण्यास त्यांनी कमी केलें नसतें !

## मास्तर होणं आवडतं तरी कोणाला ?

माझें आयुष्य मोठें चमत्कारिकपणाने वेडेंवांकडे वळलेलें आहे. केव्हां तें कुठें भरकटेल, याचा नेम असा कांहींच नव्हता. मी शिक्षकाचा पेशा पत्करला कसा, याचें मला आश्चर्य वाटतें. या धंद्यांत आकर्षक असें काय आहे ? ४५ हजारांहून अधिक लोक या धंद्यांत आहेत, तें कां ? का सगळे ध्येयवादानें आले आहेत ? कांहीं आलेही असतील. शंभरांत एखादा तसा आहे. मास्तरकी केवळ कांहीं दिवस करून नंतर दुसरा उद्योग पहावयाचा. तात्पुरती सोय म्हणून कदाचित मास्तरकी कांहीं करीत असतील; पण एकंदर आंकडेवारीनें पहातां असेंच आढळेल कीं या धंद्याच्या झाडावर क्षणभर विसावा घेण्यासाठीं येऊन बसणाऱ्या व नंतर अन्यत्र उडून जाणाऱ्या पांखरांची संख्याच ज्यास्त ! सुरुवातीला कांहीं तरी करायचें म्हणून मास्तरकीनें सुरवात होते आणि पदवी व पत्नी यांप्रमाणें पेशा कायमचा

मागें लागतो. अगतिकपणा येतो. दुसरें कांहीं करण्याची शक्यता कमी होते, सामर्थ्य कमी होतें. आहे तेंच बरें वाटूं लागतें. मनुष्याच्या स्वभावांतील स्थायी भाव, म्हणजे असेल त्या परिस्थितीशीं मिसळून जायचें. तो मात करतो. फारच झालें तर एक शाळा सुटते आणि दुसरी लागते. काम कमी, सुट्या जास्त, वगैरे क्षुद्र असणारीं प्रलोभनें जीव मोहूं लागतात. एका वर्गात एका तासाला जें शिकविले तेंच दुसऱ्या तुकडींत दुसऱ्या तासाला. यंदा जें शिकवलें तेंच दुसऱ्या वर्षी आणि तेंच तिसऱ्या वर्षी ! अशीं २०।२०, २२।२२ वर्षे येतात जातात. जगाच्या धांवेबरोबर शाळेचे अभ्यासक्रम बदलत नाहींत. १९२०।२५ सालीं जें गणितशास्त्र आणि इंग्रजी मी शिकवलें, तेंच अजून शिकवीत आहें. त्यावर एक महान् युद्ध गेलें. जीवन हरतऱ्हेनें बदललें. शास्त्रांना महत्त्व आलें. जीवनोपयोगी धंदेशिक्षणाची, बेसिक पायाशुद्ध शिक्षणाची जरूर निर्माण झाली. या २० वर्षात जितक्या प्रमाणांत जीवन बदललें, तितक्या प्रमाणांत व तितक्या झपाट्यानें अभ्यासक्रम बदलले नाहींत. अर्थात् या अभ्यासक्रमांत शिकून तयार होणारे विद्यार्थी जीवनाच्या शर्यतींत मागें राहूं लागले. अर्धपोटीं राहूं लागले. शिक्षणावरील त्यांची निष्ठा कमी झाली. आणि अशा मागासलेल्या प्रकारचें शिक्षण देणारे शिक्षक तर फारच मागें पडले. समाजांत त्यांना मान राहिला नाहीं. ते डोळे बांधून जुन्या ज्ञानाच्या खुंटाभोंवतीं फिरत होते, दुसऱ्याची फसवणूक ते करीत होते आणि स्वतःची ! शिक्षण स्वस्त व सुलभ करण्याच्या उपक्रमापासून ( म्हणचे १८८५ पासून ) १९२५ पर्यंत निरक्षरता किती घटली ? ४० वर्षांच्या काळांत किंवा त्यानंतरच्या २० वर्षांच्या काळांत तरी हें प्रमाण किती कमी झालें ? सरकार परक्याचें, आर्थिक मदत नाहीं, वगैरे कारणें लक्ष्यांत घेऊनहि मी म्हणेन, शाळेच्या जगाभोंवतीं अभ्यासक्रमाचें, 'शेडयूल' डी चें, बंधन वा त्याचें कुंपण घातलें गेलें आणि शिक्षकानें तें सहनहि केलें. या बंधनानें

शिक्षकाच्या धंद्यांत पडलेला मनुष्य पंख तुटल्यासारखा झाला. अगतिक झाला. अवनत व अधःपतित झाला.

अगदीं परवांपर्यंत ही स्थिति होती. प्रा. टोंदे यांनीं जर जाग आणली नसती तर या शिक्षकांचें काय झालें असतें कुणास टाऊक? कारकुनींत आणि वकिलींत पडणारा गृहस्थ ध्येयवादाची झूल घालून धंद्याला प्रारंभ करीत नाहीं. धंदा संभाळून त्याला देशभक्ति किंवा अन्य ध्येयवाद चालवतां आल्यास चालवतो, इतकेंच. परंतु मास्तरकी करणारा खोट्या ध्येयवादानें प्रेरित होतो प्रथम–नंतर या धंद्याकडे ओढला जातो. पण शेवटीं ध्येयवाद शिल्लक रहात नाही. आणि नाही मिळत लौकिक आणि मान. शाळेच्या चार भिंतींत तो जखडला जातो. शाळामास्तर कधीं म्युनिसिपालिटींत, युनिव्हर्सिटींत आणि विधिमंडळांत आला आहे निवडून? मी तर असें निःसंशय म्हणेन की जे ११ ते ५ या दैनिक काळांत जखडले गेले आणि १ तारखेच्या पगारावर उपजीविका करूं लागले, त्यांचें भविष्य खुरटलेंच. पहा एखाद्या मास्तरांना विचारून की तुम्ही या धंद्यांत कां आलांत–तो म्हणेल "आलों झालं—"

मी आलों तो घरची गरिबी, अपुरें शिक्षण, ओळखी आणि वशिले नसल्यामुळें सरकारी नोकरी मिळण्याची असंभवनीयता–यांमुळें येथें आलों. पुढचा अभ्यास करायला वेळ मिळेल तर याच धंद्यांत, असेंहि वाटल्यामुळे प्रथम इकडे ओढला गेलों.

पण अलिकडे अलिकडे मला वाटूं लागलें आहे कीं द्यावा सोडून हा धंदा. आज प्रभा बोलतां बोलतां म्हणाली, "मला नाहीं बाई आवडत मास्तर होणें! खरंच मास्तर, तुम्ही कां नाहीं दुसरा धंदा करीत?" आणि प्रभाला द्यावयास माझ्याजवळ उत्तर नव्हतें. धंद्याचा पवित्रपणा व ध्येयवाद तिच्यापुढें उभारून मांडला; पण तो डोलारा किती पोकळ होता याची कल्पना मला आलेली होती. प्रथम प्रथम मला कुणी मास्तर म्हणून हांक

मारलेली खपत नव्हती. संस्कृतांत ‘ शिक्षक ’ कां नाहीं म्हणत हे ? असें वाटायचें. किंवा नुसतें माझ्या नांवानें ‘ साठे ’ एवढंच कां म्हणत नाहींत ? किंवा त्याला गुरुजी कां जोडीत नाहींत ? आणि राग यायचा. इंग्रजींतलें सर देखील मोठेपणाचें वाटे; पण मास्तर ही अगदीं शिवी वाटायची. हळूहळू ती अंगवळणी पडली.

आज प्रभानें जेव्हां हा विषय काढून आणि विशेषतः या मास्तरकीबद्दल कपाळाला आंठ्या घालीत नापसंती दर्शवली, तेव्हां तिच्या गोड ओठांतून आलेला तो मास्तर शब्द अगदीं कडू लागला.

माझ्या मनांत या वेळीं तिला एक प्रश्न विचारावयाचा होता—कीं “ प्रभा, नसेल तुला माझा धंदा आवडत—पण मी आवडतो ना ? झालं तर—” पण हा प्रश्न विचारण्याचा मला धीर झाला नाहीं. अजून आमची इतकी सलगी झाली नव्हती.

स्त्रियांचें प्रेम पुरुषांवर असतें म्हणजे तें त्यांच्यावर अगदीं आंधळेपणानें जरी असलें तरी पुरुषाच्या कुलाचा, रूपाचा, वयाचा, शिक्षणाचा, पैशाचा, प्रतिष्ठेचा आणि पेशाचा त्याच्यावर अजिबात परिणाम घडतच नाहीं, असें नाहीं. कुठल्याहि स्त्रीच्या आपल्या पतीच्या पेशाबद्दल कांहीं अपेक्षा असतात आणि समजा स्त्रियांना आपल्या पतीचा पेशा कोणता असावा असा प्रश्न केला तर शेकडा २ मतें तरी शिक्षकाच्या पेशाला प्रामाणिकपणे पडतील कीं नाहीं, याची मला दाट शंका आहे.

सांगायचा मुद्दा एवढाच की शिक्षकाचा पेशा अनेक कारणांनीं मागासलेला आणि अप्रिय आहे. बहुसंख्य शिक्षक तो करायचा म्हणून निर्जीवपणानें करीत आहेत. ही परिस्थिति सुधारावयाची असेल तर पैशानें आणि दर्जानें शिक्षक हा समाजांत उन्नत झाला पाहिजे.

रात्रीं स्वप्नांतदेखील तेच शब्द मला ऐकूं येत होते. ‘ मला नाहीं बाई आवडत मास्तर होणं—’ मी उजव्या कुशीवरून डाव्या कुशीवर

वळलों, तरी तेच शब्द ऐकूं येत होते–'मला नाहीं बाई आवडत मास्तर होणं!' मानेला झटका देत–दोन्ही भुवयांत अढी देत आणि ओठ दुमडत प्रभा म्हणत होती–'मला नाहीं बाई आवडत मास्तर होणें—' अखेरीस मी चिडलों. "हं पुरे आतां. मला तरी कुठें आवडतें आहे मास्तर होणें? पण मी तुला आवडतो ना?—सांग ना–मास्तरकी देऊं सोडून–सांग ना–मी तुला आवडतो ना—"

प्रभा अवखळपणानें स्वप्नप्रांतांतून उत्तर न देतांच पळून गेली. आणि थोड्याच वेळांत मी झोपीं गेलों.

## शिक्षक आणि प्रेम?

प्रेमाच्या राज्यांत शिक्षकाला मज्जाव असावा अशी माझी कल्पना झाली आहे. प्रेम हा शिकवण्याचा विषय नाहीं. प्रेम कुणी शिकत नाहीं, प्रेम कुणी शिकवीत नाहीं. साहजिकच या पेशाचीं माणसें प्रेमाच्या प्रांतांत जाण्यास अधिकारी नाहींत. प्रभावर प्रेम करावेसें माझ्या मनांत येतें–येतें कसचें मी करतोंही. पण 'मी शिक्षक आहे' या कल्पनेचा सैतानी नाग प्रेमस्वर्गाच्या नंदनवनांतून माझा पाठलाग करतो आहेसें वाटतें आणि जीव घाबरा होतो.

माझ्या एका मित्रानें पुण्यांतील एका मुलींच्या शाळेंत शिक्षकाच्या जागेसाठीं अर्ज केला होता आणि नुकताच तो तेथल्या मुख्याध्यापिकांना भेटून आला. त्या मुलाखतींत त्या बाईनीं विचारलें, "तुम्ही विवाहित आहांत का?"–आणि तो म्हणाला–"छे! नाहीं अजून." त्या बाई एकदम झपाटल्यासारख्या झाल्या! एखादें झुरळ अंगावर चढल्याच्या भासानें बावचळून त्या किंचाळल्या म्हणे! "छे–मग तुम्हांला नाहीं या संस्थेंत जागा."

अजून आणि राहून राहून या विचारसरणीचें मला आश्चर्य वाटतें. अविवाहित शिक्षक हा इतका का भयंकर प्राणी आहे कीं २८।३० मुलींच्या घोळक्यांत तो प्रेमघोटाळे केल्याशिवाय रहाणारच नाहीं ? मुलींना शिकवायला अविवाहित शिक्षक नको असं प्रतिपादन करणारे मनांत काय प्रमेय बाळगून असतात, हेंच कळत नाहीं. तो का प्रेम शिकवणार आहे ? आणि तें का शिकवून येतें ? मग मुलांच्या शाळेंत कुमारिका किंवा विधवा यांना तरी शिक्षिका कोणत्या आधारावर होतां येईल ? जे उद्योग (?) पुरुषशिक्षक मुलींच्या शाळेंत करील असें गृहीत धरलें जातें, तेच उद्योग मुलांच्या शाळेंत प्रौढ विद्यार्थी, शिक्षक व कुमारी शिक्षिका यांना करतां येणार नाहींत का ? सामुदायिक आणि वैयक्तिक नीतिमत्ता का फक्त विवाहित मनुष्य नेमण्यावर अवलंबून आहे? रेशानिंग ऑफिसमध्यें ४० कुमारिका कारकून आहेत आणि उरलेल्या पुरुष कारकुनांना ते विवाहित आहेत कीं नाहींत याची चौकशी करून नेमलेलें नाहीं.

कदाचित् असें असेल कीं मुली संवेदनाक्षम, तारुण्याच्या उंबरठ्याच्या वरील भावनाप्रधान वयांत असतील आणि कदाचित् त्यामुळें किंवा त्या शिक्षकाच्या चिथावणीनें अयोग्य मार्गाला लागण्याचा संभव आहे. त्या विद्यार्थिनींची जबाबदारी संस्था-चालकांवर आहे आणि त्यांना भडक भटक्या अविहितापेक्षां, गृहस्थाश्रमांत स्थिरावलेला विवाहित अधिक जबाबदार वाटतो. विवाहित शिक्षकहि असें कांहीं बेजबाबदार करणार नाहीं असें नाहीं; पण चुकायचेंच तर सुरक्षित बाजूला, या न्यायानें ही दक्षता घेतली जात असावी.

त्यांच्या बाजूनें विचार करूनही मनाला वाटत रहातेंच कीं अशा विचारसरणींत एक मोठा दोष आहे. शिक्षक ही का जात आहे ? मुळींच नाहीं. शिक्षक हा एक मनुष्य आहे. अविवाहित मनुष्याचे जे विकार तेच अविवाहित शिक्षकाचे. उलट शिक्षक सुसंस्कृत, सुशिक्षित, बहुश्रुत व जबाबदारी ओळखणारा असा श्रेष्ठ मनुष्य. तेव्हां माळी,

आचारी, ड्रायव्हर, पट्टेवाला, कारकून, कम्पाउंडर, खाजगी चिटणीस, ह्यांची नेमणूक करतांना जेवढी काळजी घ्यायला हवी तेवढी काळजीहि शिक्षकाच्या बाबतीत घ्यायला नको. शिक्षक हा अधिक जबाबदारीनें वागेल. त्याच्याबद्दल निर्धास्त रहायला कांहीं हरकत नाहीं. कांहीं अपवाद असतील, तर ते नियमाला पुष्टी आणण्याइतकेच अल्प असतील असा माझा भरवंसा, नव्हे खात्री आहे.

आणि म्हणूनच प्रभावर प्रेम मी करीत असलों तरी त्याबाबत मी मोठा जागृत आहे. मला माहीत आहे की प्रभावर प्रेम करणें अवघड आहे, निष्फल आहे. प्रभा गांवांतील एका धनाढ्य प्रतिष्ठित डॉक्टरांची मुलगी. सुंदर आणि पुढें मागें सुविद्य होऊं शकणारी. ही जडावाची देवी माझ्यासारख्या भिकाऱ्याला का सेवील? आणि या विचारानंतर मी शहाणा होतो. शहाण्या माणसांना प्रेम नाहीं करतां येत. वेडीं माणसेंच प्रेम करूं शकतात. प्रेम त्यांनाच वेड लावूं शकते की जी कमी बुद्धिप्रधान आहेत. प्रेमाची हिरवळ बुद्धिवादाच्या रूक्ष खडकावर नाहीं उगवत. भावनावशतेचा थोडाफार ओलावा हवाच तिला. मी भावनावशहि आहें; पण प्रेमविषयांत कां आणि कसें, हा विचार एकदां जागा झाला कीं प्रेम डोळस होतें आणि डोळस प्रेम फार काळ तग धरूं शकत नाहीं. प्रेमाला चिरंजीविता हवी असेल तर त्याला आंधळेंच व्हावें लागेल. पण माझें प्रेम आंधळे होण्यास तयार नव्हतें. याचा परिणाम काय होणार हें मी जाणत होतो. मनांत खेद होत होता; पण त्याला इलाजही नव्हता. माझ्या प्रेमाची विफलता शांत मनानें सहन करण्याची मनाची तयारी करीत होतो. प्रेमभंगानें हृदय दुभगून जाण्याइतकें तें बिलबिलित नव्हतें. माझें प्रेम तात्पुरतें आकर्षण होतें. जूनमध्यें ढग येतात, नव्यानें सृष्टि हिरवळते, फुलते—तसेंच जूनमध्यें वर्गांत नवे विद्यार्थी येतात; कांहीं मुलें हुशार असतात कांहीं खिलाडू असतात; कांहीं मुली सुंदर असतात, बुद्धीनें चुणचुणीत असतात. त्यांच्यावर इम्प्रेशन मारावें म्हणून शिक्षक

धडपडतो. हा स्नेह, हें आकर्पण सहवासानें वाढतें. वर्ष संपलें कीं विद्यार्थी निघून जातात, कितीक विद्यार्थिनी विवाह होऊन परक्या होतात, कांहीं पुढच्या वर्गांत जातात. आकर्पण ओसरतें. ते विद्यार्थी आणि त्या मुली पुन्हां भेटतात तेव्हां किती तरी अंतर निर्माण झालेलें असतें. किती वर्षे लोटतात, तीं किती वयानें, विद्येनें, वैभवानें, वाढतात. त्यांच्या आपल्यांत औपचारिकता निर्माण झालेली असते—हें सगळें मी ओळखून आहें. म्हणूनच प्रभावरचें माझें प्रेम विफल ठरणार हें माहीत असून वाईट असें फार थोडें वाटतें. पुढल्या जूनमध्यें दुसरी एक प्रभा मिळेल. आणि त्याच्या पुढल्या जूनमध्यें आणखी एक प्रभा आणि अशा प्रकारें दरसाल एका प्रभेवर असें निर्विकल्प आणि असें स्वायत्त किंवा सविकल्प प्रेम करायला काय हरकत आहे? प्रेमाचा हा नवा अर्थ आहे, नवा अनुभव आहे. माझ्यासारख्या शिक्षकाच्या वांट्यालाच तो येत असतो. त्याची विफलता माझ्या दृष्टीनें मी ओळखतो आणि हेंहि जाणतों कीं माझें प्रभेवरील प्रेम जाहीर करण्यांत, त्याला लोकांच्या नजरेला पडूं देण्यांत प्रभाला धोका आहे. जनतेला त्यांतील सात्त्विकता ओळखूं येईल याची खात्री काय? हें प्रकटीकरण माझ्या पेशाचा व प्रभाच्या भवितव्याचा पंचनामा ठरेल. आणि म्हणून माझ्या प्रेमविपयाची मी सदैव मानसपूजाच करीत आलेलों आहें. यांत ढोंग आहे असें मला वाटत नाही. फक्त योग्य ती खबरदारीच मी घेत आहें. शिक्षकाची प्रेम-प्रकरणें पुष्कळदां मामुली असतात आणि अनेक वेळां त्या शिक्षकाच्या हितशत्रूंकडून त्यांत कांहीं पदरचें तिखटमीठ लावून तीं खमंग टीकेचा सार्वजनिक विषय होऊन बसतात. आणि माझ्या मतें अशा प्रकारें बऱ्यावाईट मार्गानें शिक्षकाची बेअब्रू होणें अत्यंत वाईट आहे. एखाद्या धंदेवाल्याची, डॉक्टराची वा वकिलाची बेअब्रू होणें आणि शिक्षकाची बेअब्रू होणें यांत फरक आहे असें मी मानतों. ज्या देशांतले शिक्षक अब्रूदार नाहींत त्या देशांत नवी पिढी कशी अब्रूदार होईल? समाज कसा प्रतिष्ठित

टरेल ? एवढ्यासाठीं वर्तमानपत्रांत एखाद्या काळा बाजार करणाऱ्या व्यापाऱ्याला ५।५० रु. दंड झाला तर मला ती सामान्य गोष्ट वाटते; पण युनिव्हर्सिटींत आणि शाळांत शिक्षकानें परीक्षाच्या मार्कांत काळा बाजार केला किंवा अनैतिक वर्तनानें अब्रू घालविली, तर ती घटना समाजाच्या अवनतीची सूचक ( Index ) वाटते आणि मन अशा समाजाच्या भवितव्यतेबद्दल हुरहुरतें.

## हें परीक्षेला आहे का, सर ?

प्रभा दिवसेंदिवस मला आवडूं लागली होती यांत शंका नाहीं. माझ्या ठिकाणीं तिची एक प्रकारची भक्तीच जणुं असल्यासारखी होती. भाविकतेनें ती ऐके, मी सांगें तें तें. आणि मीही त्यामुळें उत्तेजून विशेष मनःपूर्वक शिकवीत असें. मराठी काय किंवा अन्य विषय काय, मला वाटतें, बरेंचसें ज्ञान क्रमिक पुस्तकांच्या बाहेर असतें. इतिहासांत असलेल्या शहाजी-शिवाजीच्या गोष्टी, लढाया, तद्दांचीं कारणें, परिणाम, भूगोलांतील देश व तेथील पिकें यात काय शिकावयाचें आहे ? मराठीच्या पुस्तकांत अवघड शब्दांच्या अर्थांशिवाय काय शिकवायचें आहे ? असें कुणालाही वाटेल; परंतु तसं नाहीं तें.

'आई–' कविता शिकवीत होतों मी वर्गांत. आईचें हृदय कसें असतें, हें मी समजावून देत होतों ( आश्चर्यच ! हा का समजावून देण्याचा विषय ? आईचें हृदय काय, तें अनुभवायचें. कल्पनेलाहि जाणतां येणार नाहीं तें ). तरी मी धडपडत होतो. कौसल्या आणि राम यांचे प्रेम मी कालिदासाच्या शब्दांत सांगितलें. बाललीलांनीं मातापितरांचीं मनें आणि अंगें कशीं रंजित आणि धन्य होतात हें दुष्यंताच्या शब्दांत वर्णिलें. मोरोपंताचा " पिता जरि विटे, विटो न जननी कुपुत्रीं विटे—म्हणून

म्हणती भले न ऋण जन्मदेचे फिटे" हें अवतरण घेतलें. वॉशिंग्टन आयर्विनचें वाक्य उद्धृत केलें. मातृमहिमा किती वर्णावा? अनंत मुखाचा शेष कल्प वर्षे तें वर्णन करीत राहिला म्हणून का तें पुरें होईल? स्त्रीजीवनांतील सानेगुरुजींच्या ओव्या वाचून दाखविल्या. "फुलांमध्यें फूल फूल हुंगावें जाईचें—सुख भोगावें आईचें, बाळपणीं—" मी ओवी म्हटली—वर्ग चित्रासारखा बसला होता. इतक्यांत घंटा झाली. रसभंग झाल्यासारखं मला वाटलें. या गोड रसाचा पेला ओठाचा काढून दुसऱ्या वर्गावर लव्हा रस नाहींतर खारा वारा असें कांहीं तरी शिकवायचें होतें. अत्यंत अनैसर्गिक होतें हें. वेळापत्रक केलें. कालावर बंधन घालण्याचा प्रयत्न केला कीं जीवनांत कृतिमता व नीरसता जन्माला आलीच म्हणायला हरकत नाहीं.

मी पुस्तक मिटलें. अजून तोच विषय मनांत रेंगाळत होता. ओठांवर घोळत होता. पण वर्गातून बाहेर पडून मी जाऊं लागलों, तोंच प्रभाचे शब्द माझ्या कानीं आले. मैत्रिणीमैत्रिणी बोलत होत्या. त्यांची कल्पना, मी बराच दूर गेलों असेन. ओझरती दोन तीन वाक्यं तरी मी ऐकलींच. प्रभा म्हणाली, "काय बाई—कालिदास—अन् मोरोपंत— हें काय करायचें आहे? हें का परीक्षेला आहे? एक ओळसुद्धां नाहीं शिकवली आज—"

मला ते शब्द फार लागले. जखमी आणि दुःखी झालों. दुसऱ्या भूगोलाच्या तासाला चंद्राचें वर्णन केलें. चंद्राच्या पौराणिक कथा सांगितल्या. नक्षत्रें, ग्रहमाला यांच्या अनेक गमती शिकवल्या आणि म्हटलें, "आज रात्रीं चंद्र रोहिणीच्या जवळ असेल तो पहा. व तो कसा दिसला त्याची आकृति वहींत काढून आणा." आणि एक विद्यार्थी उठून म्हणाला, "मास्तर परीक्षेमध्यें हें येणार आहे?"

आणि त्याच्या प्रश्नानें मी चवताळलों. घंटा झाली म्हणून तें पोरटें बचावलें. पुढला तास पुन्हां प्रभाच्या वर्गावर होता. तेथें जाऊन मी एक

व्याख्यान सुनावलें. काय उपयोग झाला असेल त्या व्याख्यानाचा कुणास ठाऊक? व्याख्यानांचा परिणाम थोडा व अल्पकाळ टिकणारा. परीक्षेमध्यें येणार आहे प्रश्न म्हणून का चंद्राची मौज बघायची? परीक्षेंत प्रश्न येणार आहे म्हणून का 'आई' कविता पाठ करायची? जीवनांतील ही संकुचित वृत्ति जावी म्हणून आम्ही धडपडतों. 'आई' या विषयाची रंगत कळावी—बहुश्रुतपणा यावा, मातृमहिमा ऐकून हृदय उचंबळून वर यावें, मनावर उच्च संस्कार व्हावे, या हेतूने मी शिकवीत होतो. नाहीतर यशवंतांच्या त्या 'आई म्हणून कोणी' या कवितेंत शिकवायला तरी काय आहे? मराठी बाळबोध कविता. मराठी मातृभाषा असणारांना शिकवायची म्हणजे पोरखेळ. त्यांतून हा वर्ग प्रौढ मुलांमुलींचा. बेरं म्हणजे चांगलें, सत्य म्हणजे खरें, पोटी म्हणजे मनी, यथातथ्य म्हणजे ज्या त्या प्रमाणें असें शब्दार्थ देऊन 'बेरं सत्य बोला यथातथ्य चाला'—अशा शिकवण्याचेंही त्यांचें वय नव्हतें. पण विद्यार्थ्यांना काय चव माझ्या सांगण्याची? चंद्राचें चांदणें परीक्षेला उपयोगीं पडणार असलें तर पहायचें ही मनोवृत्ति काढून टाकून खरी जीवनसन्मुखता विद्यार्थ्यांच्या अंगीं बाणविण्याचा आम्ही प्रयत्न केला पाहिजे.

व्यथित व विमनस्क हृदयानें मी शाळेंतून घरीं आलों. आज कशांत लक्षच लागेना. संध्याकाळीं आमच्या शाळेंतील एका वृद्ध शिक्षकांकडे गेलों. त्यांच्याकडे पाहिले की मला हरिभाऊंच्या कादंबऱ्यांतील श्रीधरपंतांची आठवण होते. आपल्या विषयावर गाढ प्रभुता आणि मनाचा प्रेमळपणा आणि तत्परता, कळकळ, या गोष्टी त्यांच्या स्वभावांतील विशेष म्हणून सहज लक्षांत येत. मी त्यांच्या घरीं गेलों, आजचा झालेला प्रसंग सांगितला. खरं म्हटलं तर मी अशा मताचा आहे की आपल्या व्यवसायासंबधीं व्यवसायाचा वेळ सोडून फारसें बोलूं नये. कुणाही शिक्षकाच्या घरीं दुसरा शिक्षक जमला कीं तो शाळा, हेडमास्तर, शिक्षक, पगार, शिकवण्या, या त्यांच्या जगांतल्या प्रश्नावर बोलूं लागतो. तो राजकारणावर बोलत नाहीं.

वाङ्मय आणि अन्य विषय क्वचित् घेतो; पण तें बोलणें वरवरचें—वृत्तपत्रांतील मथळे वाचून केलेलें बडबडणें असतें. दोन कारकून एकत्र जमले की कुठला तरी जी. आर. बदली—साहेब—या विषयावर त्यांना बोलायला हवे असते; पण आजपर्यंत सरकारी नोकरवर्ग आणि जनता किंवा अन्य राजकारणादि विषय यांचे संबंध तुटकपणाचे होते. आतां परिस्थिति बदलली आहे. भिन्न व्यावसायिक एकत्र येण्याचें कार्य सुलभ झालें आहे आणि त्यांनींही संघटनेचे हक्क मिळवले आहेत. मुंबई प्रांतांत सरकारी पट्टेवाले, मिलिटरी अकौंटसमधील कारकून व इतर वरिष्ठ अधिकारी यांचेही संघ निघाले आहेत. या संघटना यशस्वी होण्यासाठीं त्यांचा पाया विस्तृत, संबंध घनिष्ठ व बाहेरच्या जगांतील हालचालींशीं चटकन संवेदना पावणारे, संस्कारक्षम करणें जरूर आहे.

बाळासाहेबांच्या म्हणजे मधांच्या त्या वृद्ध शिक्षकांच्या घरीं गेल्यावर या विषयासंबंधींच बोलणें झालें. मग शाळेंतील प्रसंग मी त्यांना सांगितला. ते म्हणाले, " मुलांना कुठें आपलें हिताहित कळतें ? मुलांच्या बोलण्याकडे का आपण लक्ष द्यायचें असतें ? तुम्ही तरुण आहांत म्हणून चटकन विवश झालांत. अहो, आज त्यांच्या उद्गारांत अनादर दिसला तरी त्याचें रूपांतर आदरांतच नेहमीं होतें. हे विद्यार्थी उत्तर आयुष्यांत--तुमच्याबद्दल उदार भावनाच बाळगणार आहेत. मला २० वर्षांपूर्वी शिव्या देणारे विद्यार्थी आज माझा गौरवानें उल्लेख करतात. आपल्या शिक्षकाबद्दल--( तो अगदीं क्रूर--मारकट- कसातरी नसेल तर ) वाईट बोलणारे समाजांतील आजच्या प्रौढ मंडळींत किती सांपडतील ? तुम्ही मारलेल्या छड्यादेखील कालांतरानें भूषण होण्याची शक्यता आहे ! "

बाळासाहेबांनीं त्यांच्या परी बरेंच सांगितलें; पण माझें फारसें समाधान झालें नाहीं. दुसऱ्या दिवसापर्यंत मी अस्वस्थ होतों. दुसऱ्या दिवशीं सकाळीं प्रभाला शिकवण्यास मी गेलों. तेव्हां प्रभाचें तोंड अगदीं उतरलें होतें. उदास मनानेच तिनें आज अभ्यास केला.

अभ्यास झाल्यावर मी जेव्हां खोदखोदून तिला प्रश्न विचारले, तेव्हां ती ओंजळींत तोंड घालून रडूंच लागली. आणि शेवटीं दग्धशा अंतःकरणानें तिनें काल शाळेंत जे उद्गार काढले त्याबद्दल तिनें माझी माफी मागितली. मी तिला क्षमा केली आणि सारें विसरून जायचें ठरवलें. पण माझा मलाच राग आला एका गोष्टीचा. किरकोळ शब्दांचा इतका कां मी--मनाला लावून घेऊन -विचार करायचा ? पण म्हणतात ना स्वभावाला औषध नाहीं, म्हणून तेंच खरें.

## म्युनिसिपालिटींतल्या बदली-प्रकरणांचा एक नमुना

संध्याकाळची वेळ होती. मी गांवांतल्या मेन रोडवरून चाललों होतों. रस्त्याच्या दुतर्फा दुकानांच्या कितीतरी पाट्या होत्या जाणि त्या वेगवेगळ्या रंगांच्या विजेच्या दिव्यांनीं भूषविलेल्या होत्या. सूर्यास्त अजून झाला नव्हता; पण दुकानांच्या आंतून विजेचा खूप प्रकाश झगझगत होता. मोटारी वेगानें येत जात होत्या. कर्कश घंटानाद आणि मोटारींचें कर्ण-कटु भोंगे, यांनीं वातावरण भरून गेलें होतें. पादचारी गर्दीगर्दीनें इकडे तिकडे धांवत होते. व्यवहारी जग आपल्या व्यापारांत गुंग होतें. प्रचार, खरेदी, विक्री, घासाघीस, धांवपळ, चढाओढ, बेफिकिरी, ह्याच गोष्टी प्रामुख्याने त्या रु. आ. पै च्या रूक्ष जगांत दिसून येत होत्या.

शांतपणें रस्त्याच्या कडेनें मी आमच्या स्कूल कमिटीच्या चेअरमन-साहेबांकडे चाललों होतों. माझ्या डोक्यांत रागाचे विचार घोळत होते;. पण त्यांच्याशीं बोलतांना ते अनावर होऊं नयेत म्हणून मी त्यांना शांत-वीत होतों. माझी बदली १६ नंबरमध्यें झाली होती व ती मला बदलून घ्यायची होती व म्हणून मी त्यांना भेटायला निघालों होतों. माझ्या रुष्ट मनाची समजूत घालीत होतों.

" अरे, कुणीतरी १६ नंबरमध्यें काम करायला पाहिजेच ना? मग तो कुणीतरी तूं कां नसावास? तूं नोकर आहेस शाळेंत आणि जेथें पाटबान तेथें काम करायला पाहिजे. समज तेथला शिक्षक आजारी पडून मोठ्या रजेवर गेला असेल तर कुणाची तरी बदली त्या जागेवर करायलाच पाहिजे."

असें माझ्या मनाला मी जरी सांगत होतों तरी त्याला तें पटत मात्र नसावें. श्रीधरपंतांनी पूर्वीच्या अमदानींतील नेमणुका आणि बदल्या यांच्याबद्दल मला कितीतरी गोष्टी ऐकविल्या होत्या. आणि म्हणूनच हे बदली-प्रकरण साधें नसेल अशी राहून राहून मला शंका येत होती.

माझें असें प्रांजलमत आहे कीं शिक्षणसंस्थाच नव्हे तर सारें शाळाखातेंच शिक्षकांच्या हातीं सोपविलें पाहिजे. आणि लोकशाहीच्या तंत्रानें ह्या खात्याची व्यवस्था केली जावी. माझ्यावर, माझी बदली करून अधिकाऱ्यांनीं सूड उगवला आहे असें मला वाटतें. याच्याबद्दल मी कुठें तक्रार करावी? कोण ऐकणार माझें? पूर्वी म्युनिसिपालिटीचे अधिकारी प्राथमिक शिक्षणाचे काम पहात. तेव्हां त्याचा दुर्लौकिक बाळासाहेब खेरांनीं गुजराथमधल्या एका जाहीर सभेंत बोलून दाखविला व लगोलग कायदा करून म्युनिसिपालिटीचे अे. ओ. आणि लोकल बोर्डाचे अे. ओ. सरकारी करून टाकले. ते सरकारला जबाबदार करून त्यांची सत्ता वाढवली.

तरीदेखील हें दुखणें मिटलेलें नाहीं. हे अे. ओ. शिक्षकांना जेव्हां जबाबदार असतील, गांवांतल्या किंवा जिल्ह्यांतल्या शिक्षकांनी निवडून दिलेले अल्पवेतनावर काम करणारे शिक्षकांपैकीं कुणी असतील, तेव्हांच आजचा गोंधळ आणखीही कमी होईल.

विचाराच्या नादांत मी चाललों होतों. केव्हां मी साहेबांच्या बंगल्याजवळ येऊन थांबलों कुणास ठाऊक. दारांत म्हणजे रस्त्यावर

मोटार उभी होती ती टाळून पुढें जाऊं लागलों तेव्हां सहज लक्ष बंगल्याकडे गेलें आणि लक्षांत आलें कीं हाच बंगला साहेबांचा.

बागेंतून पायऱ्या चढून व्हरांड्यांत आलों. समोरच एक प्रशस्त हॉल होता. हॉलमध्यें मोठा मंद निळया रंगाचा प्रकाश होता. मीं व्हराड्यांतून इकडे तिकडे पाहिले. कुणाची चाहूल आली नाहीं. हॉलचें दार अर्धवट उघडें होतें. त्यांतून आंत पाहिलें.

आमचे चेअरमन साहेब एका कोचावर बसले होते. अंगांत रेशमी सैल नेहरू शर्ट होता आणि तलम पायघोळ धोतर पायांवर लोळत होतें. हातांत चहाचा पेला होता. मुद्रा विचारी दिसली.

चहा पिऊन झाल्यावर आंत जावें म्हणून मी बाहेरच थांबलों. एवढयांत त्या हॉलमध्यें एक प्रौढा आली. चेहरा फुगीर गोल अन् मोहक होता. डोळे मंद निळसर होते. कांहीं अवखळ बटा मुखमंडलावर येत होत्या. वेषभूषा साधी असली तरी ती इतकी रेखीव होती कीं त्या नेसण्याच्या चुण्यांवरून तिचें भरदार शरीरसौंदर्य एकदम नजरेत भरलें असतें. तिच्या त्या व्यवस्थित नेसण्यानें तिच्या उरोजांचा टचटचितपणा आणि मांड्यांचा रेखीवपणा झांकला गेला नव्हता. उलट तो अधिकच अभिव्यक्त केला होता.

ती हॉलमध्ये येतांच प्रथम काय म्हणाली तें मला ऐकूं आले नाहीं. पण साहेब म्हणाले, ‘ इतक्या दुरून काय तें--जवळ ये ना ! ’

ती ( कुणास ठाऊक खऱ्या कीं खोट्या ) नाखुषीनें कोचाच्या थोडी जवळ जाऊन उभी राहिली. “ काय बाई तरी हे—” असें म्हणत जणु नाखुषीने तिनें अधिक पुढे सरकण्यास नकार दिला.

साहेबांनीं कोचाजवळच्या महोगनीच्या छोट्या टीपायवर चहाचा कप ठेवला.

त्या स्त्रीनें पायानें दुसऱ्या एका कोचाचा आधार घेत सुंदर 'पोझ' घेतली होती. तिनें दोन्ही हातांचीं बोटें एकमेकांत अडकवून ते हात मागें लपवले होते. तरी तिचे फुगीर दंड उघडे होते. शरीर मागें वांकल्यामुळें सैलसर अंबाडा मागें चांगलाच कलला होता. परंतु त्यामुळेंच वक्ष:स्थलाला नाजुक अन् सुरेख बांक आला होता.

त्या ऐटबाज सौंदर्याचा दंड धरून साहेबांनीं तें जवळ खेचलें.

" अं--आम्ही नाहीं. माझ्या बदलीचं काय तें सांगा आधीं--"

मी चपापलों. ती शिक्षिका होती काय ?

" उद्यांच काढतों ना हुकूम ? आतां तर झालें—"

तसाच मागल्या पावलीं मीं परत फिरलों. तेथें थांबण्याची कांहीं जरूर वाटली नाही. हॅम्लेटच्या बापाच्या भुताप्रमाणें मी त्रस्त झालों होतों. काय करायचें ? कुणाला नांवें ठेवायचीं ?

तशाच विषण्ण मन:स्थितींत एका सार्वजनिक बागेंत रात्रीं दहापर्यंत बसलों होतों.

संसारांतील सत् नाहींसें झालें असें वाटलें. आणि एखाद्या स्मशानयात्रेहून ज्या मन:स्थितीत आपण परत येतों, अगदीं त्याच मन:स्थितींत मी घरीं येत होतों.

आणि पांच पंचवीस पावलें पुढें आलों असेन नसेन, इतक्यांत मघांचीच ती स्त्री खिन्नपणानें माझ्या पुढून संथपणें चाललेली मला दिसली. मला राग आला, उद्वेग वाटला. कींवही केली मी तिची. तरी त्या कल्लोळमय भावनांच्या आवेगांत मी पुढें सटकलों व विचारलें, " तुम्ही साहेबांच्या बंगल्यावरून आलांत ना ? झालं का तुमचें काम ?"

आकस्मिक व मर्मभेदक प्रश्नानें ती भयंकर दचकली. अगदीं पांढरीफटक झाली तिची चर्या. दोनचार मिनिटें ती तटस्थ उभी राहिली. पण तिच्या मनांतील निश्चयीपणा पुन्हां जागा झाला. ती खात्रीच्या विश्वासाच्या आवाजांत मला म्हणाली,

"साहेबांनीं अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला. माझ्यासारख्या अभागिनीला नाडण्याचा, तिला 'पवित्र गुन्हे' करायला लावण्याचा त्यांचा हेतु होता; पण माझ्या परमेश्वरानें मला या प्रसंगांतून बचावलें आहे. शिक्षणक्षेत्रांत अशी कां माणसें आहेत? कदाचित् हे अपवाद असतील. तसें असलें तर उत्तमच. मी मात्र या नोकरींतून उद्यांच निघून जात आहें. पुष्कळ इतर व्यवसाय खुले आहेत मला, की जेथें मला माझें शील संभाळायला इतके कष्ट पडणार नाहींत—" एका दमांत ती इतके बोलली. तिचें व माझें नंतर बरेंच संभाषण झालें. पण ते कशाला सांगत बसूं? त्या रात्रीनंतर पुन्हां ती मला अजून कुठे दिसली नाही किंवा तिची कांहीं बातमी पण समजली नाहीं.

माझ्या बदलीसाठीं मी साहेबांना पुन्हा भेटलो नाहीं.

## बा शिक्षका, गीतापाठ ऐक!
## कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन!

डॉ. भिडे मोठे उपद्व्यापी मनुष्य यांत शंकाच नाही. प्रभाची शिकवणी संपल्यानंतर त्यांनी मला त्यांच्या दिवाणखान्यांत बोलावून घेतलें. त्यांच्या मनांत काय होतें हे मी कसें ओळखणार? तर्ककुतर्क करीत मी दिवाणखान्यांत शिरलों, एवढ्यांत टेबलामागे असलेली डॉक्टराची मूर्ति दृष्टीस पडली. नजर वर करून डॉक्टरांनी माझ्याकडे पाहिलें. ते पुढच्या दोन दातांच्या फटींत शिसपेन्सिलीचें टोक घुसवीत म्हणाले, "इथं एक शाळा काढावयचें आलेंय् मनांत माझ्या. कशी वाटते कल्पना तुम्हांला?"

त्यांच्या कल्पनेची तोंडभर स्तुति करण्यापलिकडे मला काय करतां येणार होतें? डॉक्टर आणि त्यांचे कुणी बी. टी. मित्र शाळा उघडण्याचा विचार करीत असल्याचें त्यांनी सांगितलें. मी विचारलें,

" तुम्ही सोसायटी वगैरे स्थापन करणार आहांत काय ? " " करूंहि पुढेमागें सोसायटी; पण सध्यां वैयक्तिक मालकीची शाळा निघत आहे ही. इंग्रजी चौथीपर्यंतच काढूं तूर्त. तुम्ही याल काय या नव्या शाळेंत_"

मी म्हटलें, ' विचार करून सांगतों. ' डॉक्टरांचा निरोप घेऊन मी घरीं परत आलो. येतांना वाटेंत एका मोकळ्या पटांगणांत मला ' भिडे मिडल स्कूल पार्टी ' असलेली इमारत दिसली ! ' अरेच्या ! ' म्हणून डोळे चोळून मी बधितलं. छेः भास होता; इमारत वगैरे कांहीं नव्हतें.

पण धनिकांच्या मनांत कल्पनेची कोय पडायचा अवकाश, लगेच त्याचा आम्रवृक्ष होऊन तो बहरायला आणि फळायला किती उशीर ? माझ्या डोळ्यासमोर भिडे मिडल स्कूलच्या इमारतीचा उद्घाटन समारंभ दिसत होता. मुख्य प्रधान अध्यक्ष होते. इमारत कशी छानदार झाली होती. सभोवार छोटासा बगीचा तयार होत होता. डॉ. भिडे यांचा केवढा गौरव झाला. शिक्षणाचे पुरस्कर्ते म्हणून मुख्यप्रधानांनीं त्यांची स्तुति केली. बाळासाहेब खेरांनी ' स्वार्थत्यागपूर्वक शिक्षणाची रात्रंदिवस काळजी वाहणारे दानशूर ' इत्यादि विशेषणें मुक्तकंठानें आणि स्वैरपणानें उधळलीं. अनेक ठिकाणचे संदेश आले होते. मागाहून बाळासाहेब खेर व भिडे यांचीं मोठालीं भाषणे झालीं. बाळासाहेब म्हणाले, " शिक्षकांनीं आपलें अध्ययन, वाचन, यायोगें आपली बौद्धिक उंची वाढवावी. शिक्षक हा समाजाचा दिवा आहे. तो कसा लख्ख पाहिजे. त्याच्या ठिकाणीं अज्ञानाची जळमटें नकोत, जातीयतेचीं काजळें नकोत, रक्त जाळून त्यानें समाजाला प्रकाश द्यावा, या कामांत येणारे अडथळे आपोआप दूर होतात. प्रकाश आला म्हणजे अडचणींचा तिमिर कुठवर राहील ? पतंगासारखे क्षुद्र टीकाकार तुमच्यावर हल्ला करतील; पण तेव्हां हे क्षुद्र पतंग तुमच्या दिव्यांत आपोआप जळतील ! " टाळ्यांचा कडकडाट झाला. डॉ. भिडे म्हणाले, " शिक्षकानें स्वार्थत्याग केला पाहिजे. पैशापेक्षां ध्येयाकडे त्यानें दृष्टि ठेवावी. आम्ही आमचीं ठेव, आमचीं मुलें तुमच्या

हातांत देत आहों, त्यांच्यांतून नवे गांधी, नवे नेहरू, नवे सुभाष ( टाळ्या ! टाळ्या !! ) तुम्ही निर्माण करणार आहां—हा मान तपश्चर्येशिवाय, त्यागाशिवाय कसा मिळेल ? रु. आ. पै चें तत्त्वज्ञान टाकून द्या. आपल्या प्रांतांत शिक्षकाला सर्वांत जास्त पगार मिळतो इतर प्रांतांतल्यापेक्षां. बाळासाहेब खेर हे सौजन्यमूर्ति आहेत. त्यांच्यामुळें तुमचें कल्याण झालें आहे. ( खेरांनीं भिडे यांची स्तुति केली होती, भिड्यांनीं खेरांची करणें जरूर होतें ! ) सेवा व त्याग हें तुमचें व्रत आहे. तें चालवा म्हणजे देशाचें भवितव्य उज्ज्वल होईल यांत मला शंका नाहीं. " पुन्हां एकदां कडकडाट झाला. मी तंद्रींतून जागा झालों. सारें स्वप्न होतें.

स्वप्नांत सत्यसृष्टि आणि कल्पना यांचा कधी कधी उत्कृष्ट मिलाफ होतो. कल्पना तर सांगितली मी; पण सत्य असें होतें. डॉ. भिडे यांनीं ग्लूकोज आणि कांहीं औषधांचा काळा बाजार करून, व अशाच इतर भल्या ( ? ) बुऱ्या मार्गानें युद्धकाळांत बराच पैसा मिळविला होता. शाळा काढली होती त्यांनींच एका गृहस्थाला पुढें करून. त्या शाळेला ५ हजारांची देणगी दिली होती—का नुसती जाहीर केली होती, हें त्यांनाच माहीत ! पण या शाळेच्या सोसायटीला २५ हजार रुपयांचें कर्ज दिलें होतें आणि तेंही ८ टक्के दरानें. पैसा गुंतवला गेला भरपूर व्याजानें, ५ हजारांच्या देणगीनें नांव झालें, सोसायटीचे तेच अध्यक्ष राहिल्यानें अधिकार बराच मिळाला, शिक्षणतज्ज्ञ म्हणून लौकिक वाढला; आणखी काय हवें होतें ?

शिक्षकांनीं मात्र त्याग करायला हवा. वकील नाहीं त्याग करीत समाजासाठीं, ना डॉक्टर, ना व्यापारी—फक्त त्याग शिक्षकानें करायचा. आणि त्यानेंच तेवढा त्याग कां करायचा ? त्यानेंच तेवढें कमी पगारावर कां राबायचें ? नवीन पिढी बनविण्याचें मोठें महत्त्वाचें काम त्याच्या हातीं आहे. पण तसा पगार मात्र मोठा नाहीं. इतर प्रांतांतल्या शिक्षकांपेक्षां या प्रांतांत शिक्षकांना जास्त पगार मिळतो. असेल खरें; पण जास्त म्हणजे

किती--जीवनाला पुरून उरेल इतका? मुळींच नाहीं. पी. डब्ल्यू. डी. तल्या कारकुनापेक्षां कमी. कोर्टातल्या बेलीफापेक्षां कमी--म्युनिसिपालिटीच्या मुकादमापेक्षां न् मुंबईच्या भंग्यापेक्षां कमी! एवढयाशा पगारांत त्याला काय करतां येईल? कांहीं नाहीं--आणि त्याग तर नाहींच नाहीं. भिडे डॉक्टरांनीं व्हिजिट फी ३० ची २० केली तरी त्यांचें उत्पन्न मुळींदेखील कमी होणार नाहीं. त्यांचा त्याग त्यांचें नुकसान करणार नाहीं. शिक्षकाचा पगार ३० चा २० केला तर मात्र त्याला उपासमारीलाच बळी पडावें लागेल-- त्याचा त्याग म्हणजे देखील मृत्युच!

अशा उपासमारीच्या कडेकपारीं धोक्याच्या ठिकाणीं उभा राहिलेला हा शिक्षक जगण्याचा विचार आधीं करणार का बौद्धिक पातळीचा? त्याला पुस्तकें, वृत्तपत्रें यांसाठीं महिना १।२ रु. खर्च करण्याची ऐपत आहे का? सरकारनें तरी त्यांच्यासाठीं फुकट वाचनाची सोय केली आहे का? सरकारनें प्राथमिक शिक्षकांसाठीं चालवावें एक आदर्श साप्ताहिक--शिक्षकांना फुकट वांटावें आणि करावी त्यांत बौद्धिक पातळी वाढविण्याची सोय. चांगले लेख, माहिती, अन् चित्रें द्यावीत. युद्धकाळांत सरकार युद्ध-प्रचार-पत्रिका आणि समाचार पत्रिका फुकट वांटीत होतेंच ना? करावा तो उद्योग निराळ्या दिशेनें. नुसता उपदेश किती दिवस ऐकायचा शिक्षकांनीं? शिक्षक हा समाजाचा दिवा आहे ना? मग स्नेहाचें तरी दान कराल कीं नाहीं? तो जळण्यासाठींच जन्माला आला आहे; पण निदान या महागाईच्या प्रदोषकाळांत त्याला जगवा तरी. नव्या युगाची प्रभात होईतों, हा पहांटेपूर्वींचा काळोख नाहींसा होईतों, हा दिवा मध्यरात तरी जळूं द्या! त्याला खरंच अंधाराची भीति नाहीं, क्षुद्र पतंगाची नाहीं. समाजाची स्निग्धता आज लोपत आहे त्याची त्याला भीति आहे. स्नेह संपेल तर वात स्वतःला जाळून घेईल. शिक्षकवर्ग जळून कोळपून जाईल; पण मग समाजाला लख्ख प्रकाश कोण देईल? म्हणून केवळ जगण्यापुरतें जीवन-वेतन समाजाकडे शिक्षक मागतो आहे.

विचारांच्या तंद्रींतच मी एका हॉटेलांत घुसलों आणि एक गरम चहा मागवला. गरम गरम चहानें त्या स्वप्नानें निर्माण केलेलें मनांतलें कुंद वातावरण विरघळलें; पण दुसराच एक ज्वालामुखी पेटला.

माझी चिंतनिका—ही डायरी काय शिक्षणविषयक प्रश्नांनींच भरून जाणार आहे कीं काय कुणास ठाऊक ? बाकी शिक्षकाच्या डायरींत हें सांपडलें नाहीं तरच नवल ! पण मला राहून राहून एवढं मात्र वाटतं कीं क्षुल्लक गोष्टींवर मी फार विचार करतों.

आतां हेंच पहाना—या वर्तमानपत्रांत प्रा. दोंदे यांनीं संपाचें शिंग फुंकलें आहे. नाहीं हा महत्वाचा प्रश्न ? नको का यावर जरा खोल विचार करायला ?

## संप करायला शिक्षक का कामगार आहे ?

"शिक्षक आणि संप ? किती अनैतिक आणि भयंकर गोष्ट ! आजपर्यंतच्या आर्यांच्या हजारों वर्षांच्या इतिहासांत कधी हें झालें नाहीं. द्रोणाचार्यांच्या घरीं विश्वाचें दारिद्र्य भरलेलें असतांना, पिठांत पाणी कालवून तें अश्वत्थाम्याला द्यावें लागत असतांना देखील द्रोणाचार्यांनीं संप केला नाहीं. पेशव्यांच्या राज्यांत गांवकींतल्या मास्तराला पगारहि नव्हता; पण तो संपावर गेला नाहीं. आणि संपावर जाण्याचें अधम कृत्य आज सरस्वतीचा सेवक सुशिक्षित शिक्षक करतो आहे. धिक्कार ! धिक्कार ! ! शिक्षणाच्या पवित्र मंदिरांत संपासारख्या मलिन यंत्रयुगीन कल्पना आणणाराला फांशीच दिला पाहिजे. स्वतःच्या पोटासाठीं एक लाख मुलांच्या ओठाला लावलेला ज्ञानामृताचा पेला काढून घेत आहांत. शिकवणें हें राष्ट्रीय कार्य आहे शिक्षकाचें. त्यांत खंड पाडणें—कोणत्याहि कारणानें का होईना—पण तें निषिद्धच मानलें पाहिजे !"

असें कांहीं तरी आमच्या शाळेंतील वृद्ध श्रीधरपंत सांगतील, अशी माझी कल्पना होती. मग आपण बाळासाहेबांशीं खूप भांडूं, या कल्पनेनें मी त्यांच्याकडे गेलों होतों. पण माझा अगदीं अपेक्षाभंग झाला. त्यांचे डोळे भरून आले होते; मी जेव्हां ही बातमी सांगितली तेव्हां आनंदाचा गहिंवर त्याच्या सुरकुतलेल्या वृद्ध चेहऱ्यावर मला स्पष्ट दिसला. ते म्हणाले, "छान! दोंदेनीं फार छान संघटना केली आहे. शिक्षकांच्या शापभ्रष्ट स्थितीला हा रामच भेटला. संप! संपच केला पाहिजे. ३०।४० वर्षें हा प्रश्न भिजत पडला आहे. शिक्षकांचें असमाधान धुमसतें आहे. साठे-परांजपे योजना आणि मोरे-बागडे योजना या करण्यापलिकडे आम्ही गेलोच नाहीं. संप ही वाईट कल्पना नाहीं. द्रोणाचार्य आणि दादोजी कोंडदेव यांना ही टाऊक नव्हती. त्या वेळी तशी परिस्थितीही नव्हती. नव्या परिस्थितींत नवींच हत्यारें हवींत. अरे, पोटासाठीं अगदीं कमींत कमी आणि न्याय्य मागणी करतों आहोंत आपण! उपाशी पोटीं किती काम करूं शकेल शिक्षक? या महागाईच्या काळांत सगळा बाजार कडाडला असतां शिक्षक मात्र १५ रु. वर प्रारंभ करतो आहे, कित्येक वर्षें हंगामी म्हणून राबतो आहे आणि नंतर दरसाल एक रुपया पगार वाढ घेत ४० वर कुठें तरी मरतो आहे. फंड अपुरा—पेन्शन, विमा, यांची सोय नाहीं. पेन्शनींत जातांच म्हणजे नोकरी सुटतांच ५५ व्या वर्षी त्याला मरावेंच लागतें आहे. पुण्याच्या माटे मास्तरांनीं शिक्षकानें केव्हां मरावें यावर फार सुंदर लेख लिहिला होता. ५५ व्या वर्षी मरण्याशिवाय काय गति उरते त्याला? आणि प्रत्येक अक्षर खरें होतें त्यांचें!"

श्रीधरपंतांशीं आणखीही बराच वेळ बोललों. त्यांचीं माझीं मतें जुळल्यामुळें वादविवादाला रंग चढेल असें न वाटल्यामुळें मी त्यांचा निरोप घेऊन उठलों आणि लायब्ररींत गेलों. संपासंबंधीं उलट सुलट लेख कितीतरी आले होते.

विरोधकांनीं शिक्षकांच्या संघटनेला नाना प्रकारचीं दूषणें दिलीं होतीं. प्रा. दोंदे यांच्यावरील कॉंग्रेस विरोधी टीकाकाराचे फूत्कार मनाला वेदना देणारे होते. ते अंबेडकरवादी आहेत आणि कॉंग्रेसच्या मार्गांत विरोधी कांटे पसरीत आहेत, असा आणि वैयक्तिक दोषारोप-युक्त असा घाणेरडा प्रचार कितीतरी होता. असलें वेडेवांकडें वाचून डोकें फिरायची वेळ आली. तें वाचणें असह्य झालें आणि मी बाहेर पडलों.

थोडें अंतर चालून गेलो असेन नसेन, तों प्रभा समोरून येतांना दिसली. रस्त्यांत घनिष्ठ मैत्री किंवा नातें नसलेली, अर्धवट ओळख असलेली किंवा तोंडओळख असलेली स्त्री भेटणें हे मोठें संकट वाटतें मला. बोलण्यासाठीं थांबावं, हंसावं, नमस्कार करावा—कांही केलें तरी पंचाईत. ती स्त्री मनांत म्हणेल, “काय हो हा पुरुष थोड्याशा ओळखीवर लागला कीं पुढे पुढे सरायला. भारीच लोचट!” आणि अगदीं ओळख न देतां तसेंच पुढें सटकलें तर म्हणतील, ” किती उर्मट! किती मानी! रस्त्यांत भेटला तर ओळखहि देत नाही हा गृहस्थ!” निदान मला वाटतें कीं स्त्रियांशीं वागणें या कारणानें अवघड आहे. मी स्त्रियांशीं वागतांना म्हणूनच बावचळतो.

प्रभाशी बोलायची इच्छा; पण भेटते मात्र ती रस्त्यांत. त्यामुळें मी गोंधळलों. तीच थांबली. बालवयामुळे समाजटीकेची तिची ओळखही नव्हती; तर तिचा विखार अन् तिचा परिणाम यांची तिला कुठून कल्पना असणार? एक शिक्षक मोकळेपणानें त्याच्या विद्यार्थीनीबरोबर रस्त्यांत बोलतो, असें पाहून तो फिरायला जातो—तो तिला घेऊन हॉटेलांत जातो, परवां प्रत्यक्ष त्या दोघांना सिनेमांतल्या अंधारांत पाहिलें, असें कल्पित टीकेचे वातचक्र त्याच्या भोंवतीं उठेल. शाळेंत फळ्यावर, भिंतीवर, वाटेल तेथें, त्या दोघांच्या नांवांची वाटेल तशी बदनामी होईल. शिक्षकाला नकोसें होईल. समाज—निनांवी समाज—निनांवी पत्रें टाकील. शाळा-व्यवस्थापकांना आणि शिक्षकाला नोकरीला अन् प्रतिष्ठेला मुकावें

लागेल आणि हा निनांवी समाज नामानिराळा राहून गंमत पाहील. हें सारें उगाच होईल. प्रेम केल्याबद्दल ही शिक्षा नसेल—कारण प्रेम करण्या-पर्यंत त्याला मुदत तरी कुठें दिली समाजानें? प्रेम न करतांच बिचारा प्रेमी ठरेल आणि आयुष्याची शोकान्तिका होईल.

माझ्या या नेहमींच्या विचारसरणीमुळें माझीं पावलें घोटाळत होतीं पण प्रभाच थांबल्यामुळें मला थांबणें भाग पडलें. अगदीं आनंदानें आणि उत्सुकतेनें तिनें मला विचारलें, "मास्तर, तुम्ही पण संपावर जाणार का? मज्जा आहे बाई! मग शाळा बंद. गेल्या वर्षी आम्ही जवाहरलाल नेहरूंच्यावर काश्मीरांत हल्ला केला म्हणून संप केला होता, तेव्हां तुम्ही शाळेंत होतां. आतां आम्ही शाळेंत बसूं आणि तुम्ही शाळेबाहेर उभे राहून पिकेटिंग करणार-मिरवणुका काढणार—मज्जा, गंमत आहे बाई—मग आम्हांला शिकवायला कुणी नाहीं! हेडमास्तर पण संपावर जाणार का? आणि शाळेंतले गडी पण का?—"

कौतुकानें तिची सारी बालिश बडबड मी ऐकून घेतली. आणि संपाची बातमी ऐकून जें वाटलें त्याचा विचार करूं लागलों—पण तिला म्हटलें, "काय प्रभा, तुला आवडतें शिक्षकांनीं संप करणें—?" अननुभवी मुलीला हा प्रश्न अवघड होता. मी अपेक्षिलेलेंच उत्तर दिलें तिनें—"हो, तेवढीच गंमत!"

शिक्षक मेला तरी सुटीचा आनंद मुलांना होतो, यांत अस्वाभाविक कांहीं नाहीं. संपामुळें शाळा बंद राहणार यापेक्षां प्रभाला कांहींच कल्पना नव्हती. त्याबद्दल मी तिला दोष कसा देऊं?

पुन्हां तिला विचारलें, "मग तुझा अभ्यास बुडेल तो?"

ती—"म्हणजे, तुम्ही शिकवणीवर पण संप घालणार काय—? मग कठिण आहे बाई. शाळा बुडली तरी घरीं तुम्ही घेणारच ना माझा अभ्यास?"

" हो. तुझें एक झालं; पण इलाख्यांत ४५ हजार शिक्षक संपावर जाणार आणि त्यामुळें नऊ दहा लाख मुलें पुस्तकें मिटून बसतील, त्यांचं काय ? "

" ओ हो ! हें जर तुम्हांला कळतें आहे तर कां जातां संपावर ? तुम्ही गिरणींतल्या सारखे कामगार आहां ? "

" म्हटलें तर आहोंत कामगार, म्हटलें तर आहोंत कलावंत. बुद्धिजीवी आहोंत एका दृष्टीनं, तर एका दृष्टीनें पोटार्थी आहोंत–पण जाऊं दे प्रभा, उद्यां सांगेन तुला मी सारं समजावून. मला आत्तां दुसऱ्या एका ठिकाणीं जायलाच पाहिजे. जातों हं–अच्छा—"

असें म्हणून तेथून मी सटकलों. माझ्या सायकलच्या चाकांबरोबर मनांत विचारचक्रें तितक्याच वेगानें फिरत होतीं. शाळा गिरणी आहे का ? शिक्षक कामगार आहे का ?

## शाळा म्हणजे एक प्रकारच्या गिरण्याच !

शाळा म्हणजे गिरण्या आहेत असें म्हटल्याबरोबर काय तो गृहस्थ उखडला ! उच्चकुलीन, परंपरावादांत तयार झालेला (Auto cratic) गृहस्थ होता तो. या लोकांच्याजवळ परंपरावादांतून निर्माण झालेल्या विशिष्ट कल्पना व ठराविक तत्त्वज्ञान असतें. टिळक-आगरकरांनीं काय न्यू इंग्लिश स्कूल गिरणी म्हणून काढली ? ते म्हणाले, शिक्षणाचें ध्येय आणि गिरणीचें ध्येय वा कार्य यांत तरी किती अंतर आहे. एक मानसिक, बौद्धिक, आत्मिक उन्नतीसाटीं आहे तर दुसरी व्यापारी माल तयार करण्यासाठीं. शिक्षणाभोंवतालच्या ह्या खऱ्या खोट्या तात्त्विक चर्चेपुढें माझी विचासरणी अगदीं क्षुद्र वाटली असेल त्यांना.

गिरणींत मोठ्या प्रमाणावर उत्पादन होतें. कांहीं शाळांत दीड दोन हजार विद्यार्थी तयार होत असतात. ठराविक ज्ञानाचे हे ठोकळे बाहेर पडत असतात. गिरणींतून बाहेर पडणाऱ्या मालाचें एखादें वैशिष्ट्य असतें. हा कॅलिकोचा, हा फिनलेचा आणि हा सोलापूरचा; असें वैशिष्ट्यपूर्वक म्हणतां येतें; पण मॅट्रिकला आणि प्रायमरी स्कूल लीव्हिंगला बसणाऱ्या ६० हजार विद्यार्थ्यांना विशिष्टता नसते. अगदीं अपवादात्मक शाळांचे विद्यार्थी वगळून बाकीचे ठराविक ज्ञानाचा डोस प्यालेले रंगहीन विद्यार्थीच आढळतात. शाळेच्या या गिरणींतून बाहेर पडणारा माल कुचकामी ठरतो. स्वावलंबनाचें शिक्षण त्यांना मिळालेलें नसतें. शाळेंत मजुराप्रमाणें शिक्षक राबतो. मजूर आठ तासच गिरणीचा गुलाम असतो. शिक्षक शाळेचा चोवीस तास बंदा नोकर असतो. त्याचा उरलेला वेळ त्यानें ठराविक पद्धतीनें घालवण्याचें त्याच्यावर बंधन असतें. त्याला दोन तासा-पेक्षां शिकवण्या करतां येत नाहीत. क्लासेस चालवतां येत नाहींत. राजकार-णांत भाग घेण्याची देखील त्याच्यावर बंदी असते.

गिरणींत मजुरांचें अर्थशोषण होतें. त्यांच्या श्रमांना अत्यंत अल्प मोबदला देऊन चार धनिक कोट्यवधि रुपये मिळवत असतात. शाळेचे संस्थाचालकही शिक्षकाला उपाशी ठेवून स्वतःचे बंगले बांधतात किंवा संस्थेचें कार्यक्षेत्र वाढवतात. एक शिक्षणमंडळी नफ्यावर नफा मिळवून अनेक लहान मोठ्या शाळा-कॉलेजेस वाढविते. यांत कदाचित् एकाद्या व्यक्तीचा फायदा नसला तरी व्यापारी हेतूच अधिक प्रभावी असतो. मंडळींचे हेतु उदात्त, शुद्ध असते तर प्रथम शिक्षकाला पोटभर त्यांनी दिलें असतें आणि नंतर नव्या संस्थांचे बेत केले असते. त्यांचें कार्य सामाजिक प्रतिष्ठा या केंद्राभोवतीं फिरत असतें! वास्तविक तें शिक्षककेंद्राभोवतीं फिरणें जरूर आहे आणि गिरणींतही नेमकें हेंच होतें. तेथील व्यवस्थापकाची दृष्टि अर्थनिष्ठ असते; कामगारनिष्ठ नसते.

# आणि शिक्षक म्हणजे शाळा-कामगारच !

गिरणींतल्या कामगारांना स्वतःचें कसब आणि व्यक्तिमत्व ते तयार करीत असलेल्या मालांत ओततां येत नाहीं. समोरचा धोटा फिरत असतो–सांचा चालू असतो. त्याचें सूत, डिझाइन, वरून मॅनेजर-जॉबर-कडून ठरून आलेलें असतें. शिक्षकाचेंही बऱ्याच अंशानें तसेंच असतें. शिक्षणाच्या नियोजनेंत त्याला मत नसतें. पुस्तकें कोणतीं शिकवावींत हें शिक्षक किंवा त्यांचे प्रतिनिधी ठरवीत नाहींत. त्यांतूनही कांहीं आत्मानुभूतीचे साक्षात्कार विद्यार्थ्यांना द्यावेत, त्यांचें शील, त्यांचीं मतें बनवावींत, असें एखाद्या ध्येयनिष्ठ शिक्षकाच्या मनांत आलेंच, तर प्राथमिक शाळेंत शिक्षकाचा विद्यार्थ्यांना मामुली गोष्टी शिकवण्यांत वेळ जातो. कपडे स्वच्छ ठेवावे, नाक धुवावें, अक्षर नीट काढावे, यापेक्षां उदात्त समजण्याचें मुलांचें वयहि नसतें. वरील गोष्ट दुय्यम शाळांत शक्य आहे. कारण तेथें मुलें प्रौढ, निदान बेंरवाईट समजण्याजोगी असतात. परंतु तेथें सात दिवसांत एका शिक्षकाचा संबंध ४० मिनिटांचे सात तास इतका येणार–! त्यांत तो पाठ्य पुस्तकाचा गुलाम. त्यामुळें एखाद्या कसबी साळयाला गिरणीतल्या मागावर बसवल्यानंतर त्याला जी हळहळ लागेल, ती हळहळ शिक्षकाला लागते. तो मनांत म्हणत असेल–मी या कपड्यावर अशा सुंदर रंगसंगतीची किनार जोडली असती कीं वा ! शिक्ष-कहि मनांत म्हणत असतो, मी माझ्या विद्यार्थ्याला असें सुंदर जीवनो-पयोगी तत्त्वज्ञान, सौंदर्यदृष्टि, व पोट भरण्याचा धंदा शिकवला असता कीं वा ! पण दोघेही एकाच प्रकारच्या गिरणीतलीं यंत्रें असतात. त्यांना इकडे तिकडे हलतां येत नाहीं.

कामगार आणि शिक्षकांत इतकें साम्य आहे. कामगारांची मागणी वर्गरहित समाज करण्याची असते, उद्योगधंद्यांचें राष्ट्रीयकरण करण्याची असते, कामगारराज्य स्थापायची असते. शिक्षकाला वाटतें, सारें शिक्षण

राष्ट्राच्या मालकीचें व्हावें. लोकशाहीच्या तत्त्वावर चालावें. पिळवणूक करणारा धनिक शाळा-संस्थापकांचा वर्ग राहूंच नये.

आणि म्हणूनच शिक्षकांची संघटना ट्रेड युनियनच्या पद्धतीवर केली तर कांहीं अपवित्र गोष्ट झाली असें कुणी म्हणूं नये. कामगारांच्या संघांना तशी शिक्षकांच्या संघांनाही सवलत मिळावी.

परंतु सरकार शिक्षक हा एक धंदा आहे असें मानायला तयार नाहीं. समाज आणि स्वतः शिक्षकवर्ग या शिक्षकवृत्तीला समाजसेवा, पुण्यकर्म, अशा भल्या विशेषणांनीं गौरवीत आहे. शिक्षकवर्ग सरकार आणि समाज यांच्या कावेबाजपणाला बळी पडतो आहे. समाजसेवा आणि नवी पिढी तयार करणारा विश्वकर्मा म्हणून गौरव करीत समाज त्याला पोटभर भाकरीचा हक्क, स्वतःच्या भावना, विचार बोलण्याचा हक्क, नाकारीत आहे. शिक्षकानें स्वतःला शाळा कामगार म्हणून घ्यावें. त्यांत लाज कसली ? कामगार शब्द कांहीं वाईट नाहीं.

पण अजूनहि मध्यमवर्गीय संस्कृतीनें बरबटलेल्या, जीवन, कला, अस्मिता, आनंदवाद या शब्दांची मोहिनी शिक्षकावर पडते. असो. मी सुद्धां कधीं कधीं याच शब्दांचा गुलाम होत असेन. हे शब्द सर्रास वापरल्याशिवाय आजचें दैनंदिन जीवनदेखील पुरें होत नाहीं. परवांचीच गोष्ट !

फडक्यांच्या धड्यांत कुठे तरी 'कला' हा शब्द आला होता. प्रभानें विचारलें, 'मास्तर, कला म्हणजे काय ?' साहित्यशास्त्रांतील शब्दांच्या ठोकळ्यांनीं मी समजून देत होतो. फडक्यांनींच सांगितलें होतें, दिसायला सोपी पण खरोखर अवघड अशी ललितकृति म्हणजे कला. पुष्कळ उदाहरणें घेऊन मग मी फडक्यांची व्याख्या समजावून दिली. तिला किती समजली, कुणास ठाऊक !

शिक्षकाचें जीवन दिसायला असेंच सोपें; पण त्याची जबाबदारी व कार्यक्षेत्र लक्ष्यांत घेतलें म्हणजे तें किती अवघड आहे हें पटेल ! पण शिक्षक ही का ललितकृति आहे? कोणता रस प्रधान आहे त्याच्या जीवनांत ? तुमच्यावरच सोंपवतों या प्रश्नाचें उत्तर.

माझ्या जीवनांत प्रभा हें एक रम्य काव्य आहे. ही एक चिमुकली कविता आहे. दिसायला साधी. तिच्यांतील गोडवा, हृदयाचे नाना सद्गुण, प्रीति, सारेंच अवघड–दुष्प्राप्य. प्रभा म्हणजे खरीच एक ललितकृति आहे.

काव्य आणि कला म्हणजे जीवनाची रांगोळी आहे. पानाभोवतालची रांगोळी पाहून कुणाचें पोट भरेल ?

माझ्या जीवनाचीहि मैहिरप जीवनाच्या देव्हाऱ्याच्या बाहेर रहाणार आहे. अशा प्रीतीला माझ्या हृदयांत जागाच नाही. चार दिवसांपूर्वी "गुडबाय् मि. चिप्स"! हा बोलपट पाहिला. शिक्षक जीवनावर इतका सुंदर बोलपट मी कांही अजून पाहिला नाही. तसाच एक त्या वेळी मला फार आवडलेला शिक्षकिणीच्या आयुष्यावरचा 'ऑल धिस अॅंड हेवन टू!' हाहि एक बोलपट आठवतो. आणि वाटतं—

शिक्षकानें प्रेम करायचें नसतें. केलें तर त्यासाठी वेडें व्हायचे नसतें. आणि वेडे झालेच तर ते कुणाला सांगायचें नसते. आपली प्रीत कुणाला सांगायची नसते. तुम्ही शिक्षक नसलांत तर तुम्हांला नाही पटायचें हें सारें.

पाहिलंत मी पुन्हां जीवन, कला प्रीत, हृदय, असल्या सांकेतिक शब्दांचा नकळत उपयोग केला. जाऊं द्या झालें.

## शिक्षकांचा पहिला संप--

प्रि. दोंदे यांनीं संपाची तारीख जाहीर केली. शिक्षकदिन सर्वत्र उत्साहानें साजरा झाला. वादळी वेगानें उभ्या महाराष्ट्रांत दोंदे प्रवास व प्रचार करून आले. टिकटिकाणीं प्राथमिक-शिक्षक-संघ निघाले--त्या सघांनीं आपलीं युद्धमंडळे नेमली.

संप फोडण्याचे असंख्य बरेवाईट प्रयत्न विरोधकांकडून होत होते. प्रि. दोंदे यांच्या प्रेरणेनें आमच्या गांवांत प्राथमिक-शिक्षक-संघ निघाला आणि मी त्यांत निवडून आलों. प्रसिद्धी-प्रचार-खातें माझ्याकडे कार्यकारिणी मंडळीनें सोंपविलें.

संपाचे टीकाकार वेगवेगळया प्रकारचे होते. एका सभेत कांग्रेस आमदारांनींच शिक्षकांच्या संपाला विरोध केला. कांग्रेसच्या मार्गांत हा अडथळा उत्पन्न केला जात आहे असें त्यांचे म्हणणें--शिक्षकांची गाऱ्हाणीं आणि दैन्य शतकानुशतकें चालूच आहेत. महागाई ४० सालापासून ४।६ वर्षें वाढतच आहे. ९३ कलमी सरकार होतें तेव्हां शिक्षक गप्प बसले. आतां कांग्रेस अधिकारावर येतांच शिक्षकांनीं जोर केला. यांत शिक्षकांचे हेतु स्पष्टपणें दुष्टपणाचे आहेत. कांग्रेस मंत्रिमंडळाला शिक्षणखात्याशिवाय इतरहि खात्यांकडे पहायचें आहे, सुधारणा करायच्या आहेत. १९४२ सालच्या चळवळीत शिक्षकांनीं काय केलें ? ''

९३ कलमी सरकार होतें त्या वेळीं चळवळ करणें शक्य नव्हतें. तें सरकार कांहीं सरकार नव्हतें. विशिष्ट परिस्थितींत केलेली ती हंगामी सोय होती. कॉंग्रेस अधिकार सोडून वनवासांत नि अज्ञातवासांत गेल्यानंतर, इतर पक्षीय जबाबदार लोक-नियुक्त मंत्रिमंडळ बनणें शक्य न झाल्यामुळें ब्रिटिश सरकारचे नोकर प्रांतांची व्यवस्था पहात होते. नवीन जबाबदार निवडून आलेल्या लोकांच्या ताब्यांत--प्रजेच्या सरकारच्या

ताव्यांत–ते अधिकार देणार असे ठरलेलें होतें. शिक्षकांना या नोकरशाहीशीं झगडून काय मिळालें असतें ? नोकरशाहीपेक्षां सरकार अधिक देण्याच्या परिस्थितीत असलेलें व समर्थ होतें. जिल्ह्याच्या कलेक्टरशी भांडायचें का त्याच्यापेक्षां श्रेष्ठ असलेल्या मंत्र्यांशी भांडून कलेक्टरला आपल्याला न्याय्य देणे भाग पाडायचें ? हंगामी शक्तिहीन, परक्या व्यवस्थेशी कुरकुर करण्यापेक्षां टिकाऊ, समर्थ आणि आपल्या सरकारडे आपली दाद लवकर लागेल, त्या आपल्या सरकारकडून कांही अधिक भरीव मिळेल.

दुसरें १९४२ सालच्या चळवळीत कुठे कुणी काय केलं याचं अजून कांहीं मूल्यमापन झाले नाहीं. सोशॅलिस्ट म्हणतात, सारे श्रेय आमचे. तर वल्लभभाई म्हणतात, "मूर्ख लेकाचे ! बैलगाडीखाली चालणाऱ्या कुत्र्याला वाटतं ना कीं त्याच्यामुळें गाडी चालली आहे. तशांतलाच प्रकार हा !" कुणी म्हणेल, "सरकारने कॉंग्रेसने ठराव पास झाल्यानंतर कांही करण्यापूर्वीच तिला तुरुगांत पाठवल्यामुळें चळवळीला मिळालेलें वळण कॉंग्रेसप्रेरित, कॉंग्रेसप्रणीत नाहीं." कुणी सारे श्रेय जनतेच्या स्वयंस्फूर्त व जागृत प्रयत्नांना दिले.

तें कांहीहि आणि कसेंहि असले तरी या चळवळीला साऱ्या खेडोपाड्यांच्या शिक्षकांनीं हस्तें परहस्तें मदतच केली आहे. खुद्द अच्युतराव पटवर्धनांनी परवां हें कबूल केलं आहे, जे तुरुंगात जाऊन बसले ८ व ९ ऑगस्टला, त्यांपेक्षां जे बाहेर राहिले, भूमिगत झाले, भूमिगताना ज्यानी मदत केली, त्यांचे गुप्त आदेश बिनबोभाट पाळले. ( सातारा जिल्ह्यांतील प्रत्येक खेडगांवांतला शिक्षक त्या खेडगावांतील शक्तिकेंद्र होता-- ) त्यानें यथाशक्ति मदत केलीच होती.

संपाचे दुसऱ्या प्रकारचे एक विरोधक होते. आम्ही 'आमचे पुढारी तुम्ही व्हा' अशी याचना करीत त्यांच्याकडे गेलों असतों तर त्यांनीं आम्हांला पाठिंबा दिला असता. सर्व लोकांचें कल्याण करणे, सर्वांसाठीं

झगडणें, सर्व अन्यायांविरुद्ध नकार व चळवळी करणें, यांचा मक्ता कॉंग्रेस-मधील या लोकांकडेच आहे असें त्यांना वाटलें. प्रि. दोंदे हेच कोण नवे पुढारी एकदम लोकप्रिय झाले! अशा भावनेनें त्यांनीं शिक्षकांच्या चळ-वळीला विरोध केला.

बरीचशी वृत्तपत्रे आमच्या संपाला अनुकूल होतीं. अगदीं उघड उघड कॉंग्रेसची म्हटलीं जाणारी जीं वृतपत्रें, त्यांतूनहि थोडें तरी अनुकूल मतप्रदर्शन होतच होतें.

पालकांचें या संपानें खरें पहातां जास्त नुकसान होणार होतें. पालकांनीं थोडीफार हांकाटी करावी, सभा घ्याव्या, आम्हांला पाठिंबा द्यावा, सरकारकडे दाद मागावी, अशी आमची इच्छा होती, अपेक्षा होती. पण पालकवर्ग नेहमीं जसा उदासीन असतो, तसाच उदासीन होता. १५ लाख विद्यार्थी घरीं बसतात, त्याचें वर्ष वायां जात आहे, याची खंत १५ लाख पाल-कांना लागली नाहीं. " ऊं; होईल दोन महिन्यांनीं संप खलास. मास्तर घेतील अभ्यास भरून. त्यांचें कामच आहे ते. वर्ष वायां जातें आहे—छट् करतीलच कांहीं सोय. आणि गेलंच तर काय आपल्याच एकट्याच्या मुलाचें थोडेंच नुकसान होते आहे? जे प्रान्तांतल्या साऱ्या विद्यार्थ्यांचें होईल तें आपल्या मुलाचें. आणि नाहींतर असं समजू कीं मुलगा एक वर्ष नापास झाला तर नाही का त्याचें वर्ष जात? "

पालकांचा आळस दूर झाला नाहीं. संपाबद्दल ते पूर्ण उदासीन राहिले. जर कदाचित् वाढता पाठिंबा मिळाला असता त्यांचा, तर आम्हांला संप अधिक यशस्वी करतां आला असता.

शिक्षकांत विरोध कोणाचा नव्हता. कुणाचा पाठिंबा कच्चा होता. कांहीं प्रवाहपतित होऊन या लाटेंत वाहात आले होते. कांहीं अगदीं पेन्शनीला आलेले वृद्ध शिक्षक वयोमानाने अधिक उदास होते. पण तेही

म्हणत होते, "जें साऱ्यांचें होईल तें आमचें. आमचें काय—पन्नास गेलीं पांच राहिली. आम्ही आहों तुमच्यामागे."

मोठ्या प्रशंसेची आणि अभिमानाची गोष्ट होती कीं आम्हां शिक्षक मंडळीच्या लढ्यात जातिभेद नव्हता--कॉंग्रेसमतवाले किंवा लीगवाले असाहि फरक नव्हता. जातिधर्मपक्षनिरपेक्ष असाच हा लढा झाला.

संप सुरू झाल्यानंतर खायचें काय, हा प्रश्न प्रत्येकापुढें होता. पण कुणी तो काढला नाही. आम्ही फंड गोळा केला नाही. जे कांही पैसे स्वयं-स्फूर्तीनें आले ते प्रचार व इतर सेवकार्य यांत खर्च झाले. संपाच्या काळांत उपासमार होणार हें स्पष्ट दिसत असून त्यांत इतक्या हजार शिक्षकांनी उडी घेतली.

आज शिक्षकसंपाला पाठिंबा देणारी सभा आम्ही टॉऊन हॉलमध्यें बोलाविली होती. अध्यक्षस्थान स्वीकारण्याची विनंती...मी डॉ. भिडे यांना करण्यासाठी त्यांच्या घरीं गेलों. त्यांचा नकार येईल व शेवटीं श्रीधरपंतांनाच अध्यक्ष करावे लागेल याची मला कल्पना होती व तसेंच झालें! पण हुरहुर लागून राहिली डॉक्टर भिडे यांच्या शब्दांची. ते चिडून चिडून ओरडत होते,

"तुम्ही शिक्षक दरवडेखोर आहांत. लहान विद्यार्थ्यांची उपासमार करतां आहां तुम्ही. पालकांच्या व सरकारच्या डोक्यावर पिस्तुल रोखतां आहां—इतके दिवस कळ काढली, तर आणखी दोन वर्षे तशीच कळ सोसायला काय हरकत होती? आणि सर्वांत तुमची हरामखोरी दुसरीच आहे. इकडे संप करावयाचा व तिकडे शिकवण्या चालू ठेवून पालकांना लुटत रहायचें. वा! खासा न्याय—खासा संप!"

या माणसाशी बोलायचं तरी काय? दुसऱ्या दिवशी मी भिडे याना शिकवणी बंद करणार आहे अशी रीतसर नोटीस दिली महिन्याची. न जाणों—मध्येच, आगाऊ न कळवतां शिकवणी सोडण्यांत त्यांनीं आणखी कांहीं दोष काढला असता.

# जन्मजात जो सुशील, तोच खरा शिक्षक असूं शकेल

वर्गांत शिकवतांना सहसा शारीरिक शिक्षा करण्याचा प्रसंग येत नाहीं. छडीचा उपयोग न करण्याबद्दल आमच्याकडे कडक प्रतिबंध आहे. परंतु क्वचित् असें होतें कीं छडीचा उपयोग करणें अवश्य होतें. आणि कधीं कधीं मुलांकडून छडीची मागणी केली जाते. छडी लागल्या-शिवाय नाहीं हडसून अभ्यास होत, अशी मुलांची तक्रार मी ऐकली आहे. जुन्या शाळांत शिकून तयार झालेले पालकहि, "पूर्वी अशा छड्या मारून अभ्यास करून घेत! आतां गेलं तें सारं!" अशा तक्रारी कुरकुरी करतांना आढळतात.

आज माझ्या कांहीं विद्यार्थ्यांनीं माझ्याकडे तक्रार केली कीं "तुम्ही छडी वापरल्याशिवाय वर्गांत शिस्त रहाणार नाहीं." मला अचंबा वाटला त्यांच्या बोलण्याचा. पण नंतर वाटूं लागलें कीं ही एक विशिष्ट मनोवृत्ति आहे. स्वयंस्फूर्तीनें कामें करावयास जी एक उदात्त बैठक लागते ती कांहीं व्यक्तींची तयार नसते. मला कुणी तरी बजावलें की अमुक एक काम ५ तारखेच्या आंत झालें पाहिजे म्हणजेच तें होतें. कुणी तरी सारखें टुमणें माझ्या मागें लावलें म्हणजे माझ्याकडून तें काम खात्रीनें होतें. कामासाठीं काम, अमूर्त ध्येयाच्या हाकेला प्रत्युत्तर म्हणून, समाजासाठीं कर्तव्य म्हणून, एखादें काम स्वयंप्रेरणेनें करणें हें अत्यंत उच्च श्रेयस् होय. पण सहसा आपण कामें करतों ती वैयक्तिक सुखदुःख, स्वार्थपरार्थ, या जाणिवेनें किंवा कुणीतरी कशाला तरी ती आपणांस करायला आवश्यक म्हणून सांगितलीं आहेत म्हणून. पण याहिपेक्षां खालच्या पातळीवर येऊन कुणी मला सांगतें कीं "आमच्या शेपट्या पिरगळा म्हणजे आम्ही दौडूं. आम्हांला छड्या मारा म्हणजे आम्ही नीट वागूं–' तेव्हां माझ्या मनाला दुःख होतें. रुखरुख लागते.

या अध:पातळींतून, या पशुत्वाला नर बनवणें आणि त्या नराचा नारायण करणें हें शिक्षकच करूं शकतो, गुरुच करूं शकतो. गुरूचें असें महत्त्व वेदवाङ्मयांतून, पुराणांतून नव्या जुन्या वाङ्मयांतून ज्ञानेश्वरादिकांकडून थोडें का वर्णिलें गेलें आहे ? त्याची नाही पुनरावृत्ति करीत.

ही शिक्षकाची भूमिका मी मानतों. त्यामुळें शिक्षकाची मनोभूमि फार पवित्र ठेवावी लागते. ( आणि मनाचें, शीलाचें हें पावित्र्य त्याच्या बाह्य श्रीमंतीवर किंवा दारिद्र्यावर अवलंबून नाही. )

शिक्षकाच्या ठिकाणीं हें पावित्र्य आहे असें समाजहि गृहीत धरतो आणि म्हणून वाटेल ते बरेवाईट संस्कार करतां येण्याजोग्या वयांतली मुलेंमुली बिनदिक्कत आणि विश्वासानें समाज शिक्षकाच्या स्वाधीन करतो. शिक्षकानें ह्या विश्वासाचा घात कधीहि करतां कामा नये. पोहण्याच्या वर्गात मुलेंमुली शिक्षकाच्या निकट येतात, गाण्याच्या वर्गात, नाटकसंवादादि कार्यक्रम करण्याच्या वेळींदेखील तीं नाना प्रसंगीं नाना वेळीं विद्यार्थिनी शिक्षक यांचा संबंध येतो; पण शिक्षक त्याचा गैर फायदा घेत नाहीं. अशा बाबतीत समाज शिक्षकावर जितका निर्धोक विसंबतो तितका दुसऱ्या कुठल्याहि पेशांतल्या व्यक्तीवर तो विसंबणार नाही.

या सद्गुणाला दुतोंडी टीका करणारा समाज कदाचित् बावळटपणा म्हणेल. धर्मराज, हरिश्चंद्र, श्रियाळ, राम, यांना बावळट म्हणणारे कमी का लोक आहेत ? त्यांच्याकडे लक्ष देण्याची आवश्यकता नाही. कदाचित् राजकवि बिल्हणापासून कालच्या वर्तमानपत्रांत शिष्या व शिक्षकाच्या प्रेमसंबंधाच्या आलेल्या बातमींतील सामान्य शिक्षकापर्यंत कांहीं शिक्षकांचीं नांवें घेऊन कांहीं टीकाकार शिक्षकवर्गाला दुश्शील ठरवूं शकेल; पण तें संख्येच्या तुलनेनें केवळ अपवादात्मकच ठरतील. वैद्य,

वकील, वेश्या, जितके बदनाम आहेत तितका शिक्षकवर्ग कधींच नव्हता, नाहीं व पुढेंही नसेल !

या विचारानें प्रभावरील प्रेमाला मी बंधन घालतों, मुरड घालतों. बौद्धिक भुकेच्या नांवाखालींही तें मी येऊं देत नाहीं. क्षणिक वाटणाऱ्या आकर्षणापेक्षां वरची पायरी मी चढूं देत नाहीं आणि माझा हा असा आब राखल्यामुळें प्रभा ( ती त्या बाबतींत मुग्धाच आहे ) किंवा इतर कोणतीहि मुलगी माझ्या वाटेला जाऊ शकत नाहीं.

गेल्या गॅदरिंगमधला प्रसंग चांगला आठवतो. माझ्या वर्गातील मुलींचा मी एक नाट्यप्रवेश बसवला होता. ऐतिहासिक नाटक होतें. कुसुम राजकुमारी झाली होती. कुसुम म्हणजे शाळेंतील सौंदर्यसम्राज्ञी होती. तिच्या सौंदर्यावर मी खूष असें. पण स्वतःशीं, मनांत सौंदर्य-पूजनाच्या भावनेंत. तिला मात्र फार गर्व होता सौंदर्याचा ! राजकुमारीचा पोशाख केल्यानंतर ती माझ्याकडे आली आणि थोड्या लडिवाळपणानें, ( थोड्या लघळपणानेंही ) मला ती विचारूं लागली, " सर, कशी दिसतें मी ?—सांगा, सांगा ना ! " तिचा अभिनय प्रेमवेडीचा होता. तिचे डोळे अनेक संमिश्र भावनांनीं धुंद होते. तिच्या भावनांना उत्तेजन देणें अगदीं शक्य होतें.

पण निर्विकारपणें मी म्हटलें, " मला सुंदर दिसून काय उपयोग आहे ? बाहेरच्या प्रेक्षकांना तुझें रूप, त्याहिपेक्षां तुझी अभिनयकुशलता पटली पाहिजे. " आणि तेथून मी सटकलों.

असो. आत्मगौरवाचा भाग यांतून सोडून द्या; पण मला वाटतें की त्या अमूर्त ध्येयवादाच्या हांकेनें, नराचा नारायण करण्याच्या प्रवृत्तीनें शिक्षक वागला पाहिजे. केवळ मी असा वागलों तर मला समाज छडी मारील, शिक्षा करील, या भावनेनें जर तो वागेल तर त्याचा अधः-पात आहे.

अर्थात् त्यानें कुणावरच प्रेम करूं नये असा नाहीं या साऱ्या म्हणण्याचा अर्थ. आपल्या प्रेयसीवर वा पत्नीवर त्यानें जरूर प्रेम करावें. शिक्षक व प्रियकर या नात्यांचीं त्यानें अपवित्र गल्लत करूं नये, इतकेंच.

## श्रीधरपंतांची जीवनयात्रा संपली ! पोरांना सुट्टी मिळाली.

पावसाळ्याची कंटाळवाणी झिमझिम सुरू होती. उदासवाण्या पागोळ्या घरळत होत्या. एक विमनस्क वातावरण निर्माण झालें होतें. श्रीधरपंत कण्हत होते. ते जीवनाला जितके कंटाळले होते, तितकेच ते धूसर मेघवर्षावाला कंटाळले होते. जिकडे तिकडे पावसाच्या तुषारांनीं कुंदता निर्माण झाली होती. लवकर हें सारं संपेल तर बरं, असं माझ्या मनांत येई. निसर्गाच्या यातना माझ्यानें बघवत नव्हत्या. गढूळलेलें पाणी मंदपणानें वाहत होतें, तर कुठें सांचून राहिलें होतें. रस्त्यांत चिखलाचा रबडा झाला होता आणि एखाददुसरा पादचारी मोठ्या काळजीनें जातां येतांना दिसत होता.

अशी संध्याकाळची वेळ होती. मी श्रीधरपंताच्या उशागती बसलों होतों. शेजारीच कंदिल होता. तोहि असाच काजळला होता. मंदावलेल्या वातीवरहि काळजीची छाया पसरलेली दिसत होती. दूरवर कुठेंतरी एक कुत्रें लांब सूर काढून रडत होतें. सारें मोठें अभद्रसूचक वाटत होतें मनाला.

श्रीधरपंताच्या पत्नी दोन वर्षांपूर्वीच निवर्तल्या होत्या. श्रीधरपंतांचा एक मुलगा आतां नुकतांच पोलिस खात्यांत लागला होता. त्याला श्रीधरपंतांच्या प्रकृतीबद्दल मी पत्र पाठवलें होतें. पण मुंबईत चालू असलेल्या दंग्यामुळें त्याला रजा मिळाली नाहीं व अजून तो येऊं शकला नव्हता.

श्रीधरपंतांची मुलगी अंजनपूरच्या कुळकर्ण्यांकडे दिलेली होती. तिला दोन मुलें होतीं व त्यांना घेऊन तीच श्रीधरपंतांच्या शुश्रूषेला आली होती. घरांतली व्यवस्था ती पाही व डॉक्टर व औषधपाणी यांची सोय मी करीत असें.

श्रीधरपंत सुरवातीला सांगली संस्थानांत शाळा मास्तर होते. ६ रु. पगार होता. तोही वेळेवर मिळत असे असें नाही. कस दिवस काढत असतील तें त्यांचें त्यांना ठाऊक. त्यांची पहिली पत्नी जरा देखणी आणि थोडीफार शिकलेली होती. पण तिचा सुस्वरूपपणा हा त्या संस्थानांत दुर्गुण व संकटांचें निमंत्रण ठरतो की काय अशी भीति पडून श्रीधरपंतांनीं संस्थानांतील नोकरी सोडली. ती नोकरी सोडतांना खूप त्रास झाला त्यांना. ट्रेनिंगसाठीं संस्थानाकडून मिळालेल्या स्कॉलरशिपचे सगळे पैसे एक रकमीं त्यांना भरावे लागले!

खालसामध्ये आल्यावर १९१८ च्या प्लेगमध्ये त्यांची पत्नी वारली. कांहीं दिवस तसेच काढले; पण नतर त्यांनी विवाह केला. त्यांची मुलें विद्याधर आणि सखू मोठीं कुशाग्रबुद्धीचीं होतीं. पण श्रीधरपंतांच्या अपुऱ्या पगारामुळे त्यांना शिक्षण देणे शक्य झाले नाही त्यांना. एका खाजगी मालकीच्या शाळेंत ते होते. तिथला मालक म्हणजे गुलामांचा व्यापारी होता, असे म्हणतांना मी अनेकवार एकलें आहे. त्या मालकाच्या शेंबड्या पोरांना मांडीवर घेऊन एका शिक्षकाने खेळवलें नाही एकदां—म्हणून त्या शिक्षकाला नोकरीला मुकावे लागले होतें! हेडमास्तरांकडे चैत्राचें हळदीकुंकू किंवा मंगळागौर अन् सत्यनारायण असला की शाळेंतल्या मास्तरांच्या बायकांना त्यांच्या घरीं करायला वाढायला जावें लागे!

त्यांच्याच शाळेंत त्यांच्या विद्याधराला फी द्यावी लागे. म्हणजे पगारांतून मुलाच्या फीचे पैसे परस्पर वसूल केले जात. १५ रु. तून १२॥ रु. पगार मिळे.

ही नोकरी सोडून श्रीधरपंत या आमच्या शाळेत दाखल झाले. आणि आज २२ वर्षे या शाळेतच नोकरी करीत आहेत.

जरा मंद कण्हण्याचा आवाज झाला म्हणून मी तंद्रीतून जागा झालों. श्रीधरपंतांचा आवाज खोल गेला होता. क्षीण स्वरानें त्यांनी मला हांक मारली. मृत्यूचा भयाण अंधःकार त्यांच्याभोवतीं पसरत चालला होता. ती तेजोहीनता त्यांच्या डोळ्यांतहि आतां प्रतिबिंबित होऊं पहात होती. मी अगदीं जवळ गेलों. त्यांचा क्षीण हात हातांत घेतला. निर्जीव, लुळा पडला होता तो.

त्यांच्या मनांतून थोडेंसें बोलायचें होतें. आणि त्या बोलण्याला त्यांना कष्ट पडणार आहेत हे जाणूनदेखील मी त्यांना प्रतिबंध केला नाहीं. ते थांबत थांबत, अत्यंत खोल, कष्टानें शब्द उच्चारीत होते.

"चाललों मी. नाहीं सहन होत. माझ्या जवळ होतं ते मी...साऱ्या विद्यार्थ्यांना...आजवरच्या २५ वर्षांत हजार दोन हजार विद्यार्थ्यांना वांटलें आहे. आतां मागे ठेवायला काही नाहीं...विद्याधर आला का ? विद्याधर पोलिस झाला आहे ! दुर्दैव. त्याला मात्र काहीं देऊं शकलों नाहीं. तुम्ही किती काळजी घेता माझी ! विद्याधराच्या जागीं मी मानतों तुम्हांला...निघालें पाहिजे मला. ती माझी पुस्तकें प्राणाहून प्यार आहेत. दुर्मिळ आहेत. आजवर त्यांनी आनंद दिला. आशा फुल-वल्या, दुःखांत आसरा दिला. ती तुमच्या ताब्यात घ्या...ती पेटी उघडा... त्यांत सरस्वतीची प्रतिमा आहे...एकाद्या हुशार विद्यार्थ्याला बक्षिस द्या..."

श्रीधरपंतांना श्वास लागला होता. ओठ सुकले होते. त्यांना दोन घोट पाणी पाजलें आणि दमून श्रीधरपंत शांत पडून राहिले. शाळा-मास्तराच्या जीवनाचा शेवटचा अंक मी पहात होतो. आणखी अर्धा तास गेला. घड्याळाची कंटाळवाणी टिक टिक फक्त ऐकूं येत होती. पण नंतर श्रीधरपंत बडबडूं लागले...

" पान २२ धडा आठवा...बारा एके बारा बारा दुणे चोवीस... त ला र त्र—नवरात्र...नवरात्र संपलें दसरा उजाडला...हें घरघर फिरतें नभांतरीं—हें विमान फिरतें अधांतरीं...१६८० शिवाजीचा मृत्यु—१६८० शिवाजीचा मृत्यु...कैलास हें हिमालयाचें उंच शिखर...हें फुलपांखरूं— दिसतें हें फुल...

नऊ रात्र जळणारी त्यांची प्राणज्योत आज स्वर्गीय दसऱ्याच्या प्रकाशांत विलीन होत होती. त्यांना कैलासावर न्यायला विमान आलें होतें का ? त्यांच्या आत्म्याचें फुलपांखरूं आतां कुठला आनंद लुटायला निघालें होतें ? एक शाळामास्तर...मृत्यूला भेटायला निघाला होता.

मी सखूला हांक मारली व थोडी गंगा आणण्यास सांगितलें. सखूनें एक संध्येची पळी भरून त्यांच्या ओठांत घातली. आणि श्रीधरपंतांनीं तें आचमन घेतांच एक आंचका दिला.

एकदम जोराचा वारा आला आणि खिडक्यांचीं दारें एकमेकांवर आदळलीं व फाडकन खोलीचें दार सताड उघडलें गेलें.

× × ×

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी व्यथित मनानें माझ्या खोलीच्या खिडकींत दांत घाशीत उभा होतों. खालून दोन पोरें बोलत चाललीं होतीं.

" अरे गोप्या, तो श्रीधर...मास्तर मेला म्हणे ! आज सुटी असणार आपल्या शाळेला ! "

दुपारीं शाळेला एक तासानंतर सुटी मिळाली. दुखवट्याची सभा झाली. दोघाचौघांचीं भाषणें झालीं. उभें राहून दुखवट्याचा ठराव पास झाला पण—

काय उपयोग होता या साऱ्याचा ? ओठांची सहानुभूति ही. श्रीधरपंताच्या दुखण्यांत २०० रु. खर्च झाला होता. विद्याधरपंतांना कुणी

आर्थिक मदत देऊन ही सहानुभूति ओली केली असती तर किती चांगलें झालें असतें ! समव्यावसायिकांचें हें कर्तव्य नव्हतें का ?

## संप संपला; पण—

संप सुरू होऊन दीड महिना झाला. प्राथमिक शिक्षक संप लढवीत होते. संपामुळें पगार मिळाले नाहींत. दोन महिने पगाराशिवाय रहायचें म्हणजे ८० टक्के शिक्षकांना जगणें अत्यंत कठिण होतें. तरी त्यांनीं त्या हाल-अपेष्टांना तोंड दिलें. बडोदा संस्थानांत तर शिक्षकांना रेशन बंद केलें गेलें; तरी शिक्षक शरण गेले नाहींत. एकजूट कायम राहिली. धर्म, पक्ष, जात यांच्या पलीकडे जाऊन आर्थिक पायावर अन्यायाविरुद्ध हा संप होता.

प्रि० दोंदे तर याला सत्याग्रह म्हणत आणि तें बरोबर होतें. प्राथमिक शिक्षकांना एकजूट अवघड होती. कारण ते फार पांगलेले होते. तरी ती घडून आली. अन्याय व गरिबी यांची इतकी पराकाष्ठा त्यांनीं आजवर सहन केली होती कीं, यापुढें ती त्यांना सहन झाली नसती आणि म्हणून हें सत्याग्रहाचें शस्त्र त्यांनी उपसलें होतें.

सर्व शिक्षकांना सरकारविरुद्ध झगडावयाचें होतें. त्यामुळें एकजूट लवकर झाली. सार्‍यांचा प्रतिस्पर्धी एक होता. दुय्यम शिक्षकांच्यांत संघटना न होण्याचें कारण हें आहे की, प्रत्येक शाळेंतील शिक्षकाच्या नोकरीच्या शर्ती, पगाराचें मान, वागणुकीची पद्धत वेगळी आहे. दुसरें प्राथमिक शिक्षक हा खराच गरीब आहे. त्यामुळें संघटना चटकन. आर्थिक स्वरूपाची चळवळ प्रभावी करूं शकते. दुय्यम शिक्षक वरच्या मध्यम वर्गांतला आहे व त्याला दारिद्र्य लपवून खोट्या मिजाशीनें रहाण्याची संवय लागलेली आहे. तिसरें म्हणजे प्राथमिक शिक्षक खराच अज्ञानी व भावनावश आहे. बुद्धिवाद्यांत पक्षोपक्ष फार. विचिकित्सा फार. म्हणून संघटना कमी.

जें दुय्यम शिक्षकांच्याबद्दल सांगतां येईल, तेंच प्राध्यापकवर्गाबद्दल. अवघ्या १०० रु. पगारावर त्याला किती ऐटीनें रहावें लागते ! अस्तु.

संपाच्या प्रदीर्घ काळांत शिक्षकांचे हाल झाले. एकवार वाटलें, या रिकाम्या काळांत त्याना कांही तरी काम पुरविण्याची सोय व्हायला हवी होती. इतक्यांना फंड कुठवर पुरेल ? चरखे चालवणें, साक्षरता वर्ग घेणे, हिंदीचा अभ्यास करणे, या किंवा अशा एखाद्या अधिकृत कार्यात जर शिक्षकाना गुंतविण्यात आलं असते तर त्यांचा कदाचित् आर्थिक पण मानसिक वा बौद्धिक फायदा निश्चित झाला असता.

या काळांत ठिकठिकाणी परिषदा होऊन शिक्षकांच्या मूलभूत मागणीचा खलिता तरी मान्य करून घ्यायचा होता. राहून राहून वाटत होतं मला कीं असा एखादा चार्टर करायला हवा. समाजांतील पुढारी, राजकीय नेते आणि शिक्षक यांनी एकत्र बसून उभयपक्षीं एक करार, एक सनद, एक चार्टर मान्य करायला काय हरकत आहे ? त्यांत शिक्षकाचा सामाजिक दर्जा, शिक्षकाचे हक्क, शिक्षकाला मिळणाऱ्या सवलती, शिक्षकावरील जबाबदाऱ्या, शिक्षणसंस्था व सरकार यांची कर्तव्यें, शिक्षकाने मुलाशीं, पालकाशी किंवा समाजांत वागतांना पाळावयाचे नियम—या आणि अशा अनेक गोष्टी एकदां होऊं द्या मुक्रर. बॉबे प्रॉव्हिन्शियल सेकंडरी टीचर्स फेडरेशनने १९४१ साली असा एक खलिता तयार केला होता. अशा हक्कासाठी, मूलभूत मागणीसाठीं झगडणें जरूर होतें. पगाराचा प्रश्न महत्त्वाचा होता; पण तो तात्कालिक होता. शिक्षकाच्या मुलांना फुकट शिक्षण, आजारीपणाचा विमा, बेकारी भत्ता, फंड आणि पेन्शन, पुढील अभ्यासासाठी आर्थिक मदत, सुटीचा पगार, कामाचे तास, अशा अनेक गोष्टी पुष्कळ महत्त्वाच्या आहेत. या सर्व आस्ते आस्ते होतील. पण मूलभूत हक्क प्रस्थापित प्रथम करूं या.

एकदां सन्माननीय जीवनवेतनाचा प्रश्न धसाला लावला पाहिजे. महागाई भत्त्यानें तो कितीसा सुटणार आहे? युद्धकाळांतील महागाई आपल्या नियंत्रणानें आटोक्यांत येणारी नव्हती. परदेशी माल येणें अशक्य झाल्यामुळें दर भराभर वाढत होते. युद्धांत बरेच देश गुंतले होते. या महागाईशीं झगडण्यास आपण महागाईभत्ता मागितला. आतां युद्ध थांबलें. आणि आमचे व्यापारी, कारखानदार काळाबाजार करून महागाई टिकवून धरीत आहेत. यावर पुन्हां महागाईभत्ता वाढवून काय फायदा? पुन्हां महागाई वाढेल—पुन्हां भत्ता वाढेल. छे—एकमेकांना समांतर धांवणाऱ्या या रेषा कशा भेटतील? आता महागाईभत्ता नको—महागाई कमी करा, अशासाटीं चळवळ करायला हवी. भरमसाट वाढलेल्या किंमती १९३९ च्या मानानें पूर्ण १०० टक्क्यांना नव्हे; पण निदान त्याच्या दुपटीनें ( आज चौपट आहेत ) स्थिरावायला पाहिजेत. त्यासाटीं संरक्षणें, आयात, नवी उत्पत्ति, समान वांटणी, नियंत्रणें, काय वाटेल ते उपाय योजा; पण महागाई आवरा असे म्हटलें पाहिजे; तरच खरी पगारवाढ झाली. आज १०० रु. पगार तर १०० रु. खर्च; असें आहे. तो ७० रु. पगार पण ६५ रु. खर्च; असें झालें तरच भागणार आहे. किंमती उतरवून, योग्य तें चलन प्रचारात ठेवून खरा रुपया-वाढलेल्या बाजारभावांच्या बाजारपेठेंतला नव्हे—जर हातीं आला तर त्यांत अधिक फायदा आहे. वाढता पगार व उतरत्या किमती यांची कुठें तरी गांठ पडून त्याचें योग्य तें प्रमाण बसलें पाहिजे. क्षमस्व. हे जरा विषयांतर झालें. असो.

मुख्य प्रधानांनीं आश्वासन दिलें. बिनशर्तपणें संप मागें घेण्यांत आला. तीन महिन्यांत कांहीं तजवीज, फेरविचार, बाळासाहेब खेर स्वत: करणार होते. सभ्य माणसाच्या शब्दावर विश्वास ठेवला गेला. उन्हाळ्याच्या सुटींत शिक्षकांनीं काम करून मुलांचे बुडालेले अभ्यास भरून काढायचें ठरवलें. शिक्षकांची ही कर्तव्यनिष्ठा खात्रीनें प्रशंसनीय होती.

## शिक्षकाची जीवनसरिता निरपेक्षपणें वहात रहाते.

प्रचारासाठीं संपाच्या काळांत मी जिल्हाभर हिंडलों. आणि समाज-स्थितीचें सूक्ष्म अवलोकन केलें. या धामधुमींत प्रभाला मी एकदांहि भेटूं शकलों नाहीं. आज सकाळीं प्रभा मंडईत भाजी खरेदी करण्यास आलेली दिसली. शेजारी त्यांचा गडी भीमाशंकर पण उभा होता.

प्रभा माझ्याकडे पाहून हंसली. व म्हणाली, " सर, संपला ना संप ? आतां येणार का शिकवणीला परत ? "

तिच्या त्या आस्थापूर्वक प्रश्नानें बरें वाटलें. " येईन कीं; पण डॉक्टरांनीं पुन्हां बोलवायला नको का ? "

" हो. तेंही खरंच. विचारीन मी त्यांना. बरं नमस्ते. "

प्रभेबद्दल माझ्या अंतकरणांतील भावनांची पुसटदेखील ओळख बिचारीला नव्हती. दोन तीन दिवस प्रभाच्या वडिलांकडून चिठ्ठी येईल म्हणून मी खूप वाट पाहिली. पण नंतर एक दिवस कळलें की डॉक्टरांनीं मला काढून टाकून दुसरा कुणी शिक्षक नेमला आहे.

त्यामुळें प्रभाची आणि माझी कायमची ताटातूट झाली.

आपल्या हाताखालून शिकून मुलें पुढें जातात आणि तीं मागें वळूनदेखील पहात नाहीत. मनांत राग आला तरी हा सृष्टीचा क्रम आहे असें मानून भावना आवराव्या लागतात. " सुंदर स्त्रिया आपल्या कांठीं येतात. गोड अशा कंकणरवाच्या साथींत प्रेमगीतांचे शब्द गुण-गुणतात. जीवन आपल्या आपल्या घटांत भरून घेतात आणि चालूं लागतात. त्या आपल्याजवळ कायम रहात नाहींत. " अशा भावनेनें झरा आटतो का ? ओढा झुरतो का ? सरिता करते का कधीं खन्त ?

**समाप्त**